वर्ष चौथे, अंक पाचवा, जानेवारी, २०११ मासिक अंकाची किंमत रु. पाच
वार्षिक वर्गणी रुपये १००/- (विशेषांक रु. २५/-)

# 'स्व'-रुपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१०



परिस्थितीला शरण जाऊनी
कोण कधी विजयी झाले?
एकरुप-एकात्म भारती,
हेच एक दैवत अपुले
निवेदितांचे शब्द तेज हे
जन जागविण्या नित्य स्मरु ।।
दुर्बलतेला दूर सारुनी
अन्यायाशी झुंज हवी
चिंतन-शिक्षण-प्रबोधनातून
वाट सापडे नित्य नवी
कितीही असू दे प्रवाह बळकट
उलट पोहूनी पार करु ।।



स्फुरो कल्पना शक्ति, अभ्यास यत्ने
बनो शुध्द-बुध्दि ही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती ध्यास हा ।।
नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमि महा ।।



" शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी !! "

श्री माऊली विश्व आयुर्वेद संशोधन केंद्र
माऊली.... एक मायेची सावली.

## श्री माऊली विश्व आयुर्वेद संशोधन केंद्र

**स्त्रियांसाठी सर्व आजारांवर शास्त्रोक्त आयुर्वेद व पंचकर्म उपचार**

**डॉ. विनेश चंद्रकांत नगरे**
(स्त्री रोगतज्ञ / आयुर्वेद वाचस्पती)
**९८८१२५७७९७, ९४२२००१५८५**

- पंचकर्म चिकित्सेची वेळ : सकाळी ८ ते सायं. ८
- डॉक्टरांना भेटण्याची वेळ : मंगळवार ते शनिवार सकाळी १० ते १ आणि सायं. ६ ते ९
- मुंबई (दादर) : प्रत्येक महीन्याचा २ रा रविवार
- नवी मुंबई (खारघर) : प्रत्येक महीन्याचा ३ रा रविवार

## आकांक्षा
एक नवे स्वप्न.... नवी दिशा

**सौ. मेघा नगरे** शालेय मानसशास्त्र तज्ञ
**९८८१४९६४७७**

### विशेष मार्गदर्शन

- अभ्यास कौशल्य
- स्मरण शक्तीवाढ
- व्यक्तिमत्व विकास
- बौध्दिक चाचणी
- कल चाचणी

- भेटण्याची वेळ : सोमवार ते शुक्रवार : सकाळी १० ते १ व सायंकाळी ४ ते ७ / शनिवार : दुपारी २ ते सायं. ५ २ रा, ३ रा रविवार : सकाळी ९ ते १

pallaviads.com

फ्लॅट नं. १९, पहीला मजला, सामदा निवास, हरेकृष्ण हॉटेल समोर, पेरूगेट चौकीच्या बाजूला, सदाशिव पेठ, पुणे - ३०. अपॉइंटमेंटसाठी फोन : ०२० - ६४००१९९२, ६५२४७६५३, ९६८९४७१३१५

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०१०

**संस्थेचे पदाधिकारी**
श्री. जयसिंहभाई मरिवाला
श्री. रमेश जोशी
श्री. श्रीकांत सामळ
श्री. शिरीष पटवर्धन
**संपादक**
श्री. जयंत कवठेकर
**संपादकीय मंडळ**
श्री. सुनील कुलकर्णी
सौ. सुवर्णा पाठक
**दूरध्वनी संपर्क**
श्री. जयंत शंकर कवठेकर
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४
(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०
मो. : ९०११३८६३८६
किंमत रूपये ५/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/-
(विशेषांकासह)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त
चेक अथवा ड्राफ्ट ‘स्व’-रूपवर्धिनी या
नावाने काढावा.

## *अंतरंग*

- हृद्गत
- मुखपृष्ठ कथा
- संक्षिप्त वार्षिक वृत्त
- विशेष लेख
- आर्थिक स्थिती व आवाहन



**छपाई**
प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक ‘स्व’-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ** : श्री. अवधूत फडणीस **काव्यरचना** : डॉ. अनघा लवळेकर

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

*पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर *श्री. प्रमोद चौधरी *श्री. प्रतापराव पवार

### *संस्थापक सदस्य*

- *कै. श्री. पु. व. श्रॉफ*
- *श्री. श्री.शं. सामळ*
- *श्री. रा. प. देसाई*
- *कै. ल. पटवर्धन*
- *कै. अ. न. गोगावले*
- *कै. दत्तोबा तांबे*
- *कै. गि. शहा*
- *श्री. कृ. गो. लवळेकर*

### *विद्यमान कार्यकारी समिती*

***अध्यक्ष***
*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

***उपाध्यक्ष***
*श्री. उदय गुजर*
*श्री. आर. ए. मेहता*
*श्री. श्रीकांत सामळ*
*श्री. कल्याण वर्दे*

***कार्याध्यक्ष***
*श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी*

***सहकार्याध्यक्ष***
*श्री. शिरीष पटवर्धन*
*श्री. रामभाऊ डिंबळे*

***कोषाध्यक्ष***
*श्री. कन्हैयालाल बलदोटा*

***सहकोषाध्यक्ष***
*श्री. विलास कुलकर्णी*

***कार्यवाह***
*श्री. ज्ञानेश पुरंदरे*

***सहकार्यवाह***
*श्रीमती पुष्पाताई नडे*
*श्री. विश्वास कुलकर्णी*
*श्री. अमोल उंदरे*

***सदस्य***
- *प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर*
- *श्री. अजय कदम*
- *श्री. अरविंद केळकर*
- *डॉ. प्रदीप आगाशे*
- *श्री. सुनील कुलकर्णी*
- *श्री. विनोद बिबवे*
- *श्री. संजय तांबट*
- *सौ. मेघना अत्रे*
- *कु. लता टिळेकर*
- *डॉ. विनेश नगरे*
- *श्री. पराग लकडे*
- *कु. दीपाली पवार*
- *श्री. किशोर सोंडूर*
- *ॲड. सौ. निलिमाताई गोखले*
- *सौ. बागेश्री पोंक्षे*
- *श्री. अविनाश जोशी*

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**
संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१०, मो. :९०११३८६३८६
**100% Exemption available under Sec. 35-AC of the Income Tax Act 1961**
**(For the period 2008-2009 to 2010-2011) PAN No. : AAATS 5461K**
**50% Exemption available under Sec. 80G of the Income Tax Act 1961**
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई-मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org
**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत

*बघता बघता वर्धिनीच्या स्थापनेला ३१ वर्षे पूर्ण झाली. शिक्षण, संस्कार, संघटन, महिला सबलीकरण या राष्ट्रीय उत्थानाच्या विषयांना केंद्रस्थानी मानून वर्धिनीचा प्रवास चालू आहे. कै. किशाभाऊ पटवर्धन सर व त्यांच्या तत्कालीन सहकाऱ्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक वर्धिनीची उभारणी केली. वर्धकांमधून कार्यकर्ते घडविले. त्यांच्याशी निरंतर दृढ संपर्क राखून घट्ट विचारांचा पाया भरला. याच भक्कम पायावर वर्धिनीच्या कार्यरूपी मंदिराचा गाभारा, सभागृह व ऐसपैस अंगण क्रमशः विकसित होत गेले. इथे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनमंदिरात 'भारतमाता' हेच एकमेव दैवत अधिष्ठित झाले.*

*पण शेवटी एकदाचे कलशारोहण उरकून पूर्णाहुतीची कल्पना सरांना मान्य नव्हती. कलशारोहणाचे मंगल पर्व अखंड चालू राहावे अशी त्यांची इच्छा होती. हे कोणते आगळे-वेगळे कलशारोहण?*

*हे कलशाराहण म्हणजे कार्यकर्त्यांच्या विविध क्षेत्रांमधील पराक्रमाचे प्रतिकरूप दर्शन होय.*

*ब्रह्मचर्याश्रमात नानाविध ज्ञान-कला, शस्त्र-शास्त्रांमध्ये पारंगत होऊन नंतर केवळ गृहस्थाश्रमात नव्हे तर कर्तव्याश्रमात प्रवेश करून भारताला सर्वार्थाने सामर्थ्यवान बनविण्यासाठी अखंड प्रयत्नरत राहणारा कार्यकर्ता वर्धिनीला अभिप्रेत आहे.*

*कुणी न राहो दुबळा येथे। मनी असा विश्वास जागवू।।*

*हे गीत प्रत्यक्ष जगतानाच समाजाच्या सर्व स्तरांना ऊर्जित करणारा वर्धक इथे घडवायचा आहे. 'विश्व स्वधर्मसूर्ये पाहो' ही ज्ञानदेवांची अपेक्षा पूर्ण करण्यासाठी, 'वर्धिष्णूविश्ववंदिता' या शिवमुद्रेस प्रमाण मानून, नित्य विस्तारसिद्ध असा वर्धिनीचा युवागट, विश्ववंद्य अशी कार्यपद्धती दृढमूल करण्यासाठी पुढे सरसावला आहे. पहिल्या तुकड्यांतील कार्यकर्ते आता 'मूलाधार गटाच्या' माध्यमातून वर्धिनीचे वैचारिक व क्रियात्मक नेतृत्त्व करत आहेत. अनेकांना सवे घेऊन आगामी वर्षांमध्ये शाखा, प्रकल्प, उपक्रम यांचा बहुआयामी विस्तार हा वर्धिनीचा अग्रक्रमाचा विषय राहणार आहेत.*

*वर्धिनीच्या हितचिंतक, पालक व स्नेहीजनांनी या कर्मयज्ञात आपली समिधा जरूर अर्पण करीत राहावे ही विज्ञापना. भगिनी निवेदितांच्या स्मृतीशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे प्रेरणादायी विचार तळटीपांमध्ये उद्धृत केले आहेत. भारताच्या सार्वभौमत्वासाठी लढल्या गेलेल्या पानिपत महासंग्रामाचे हे २५० वे स्मृतीवर्ष आहे. खरंतर पानिपत संग्राम अजूनही चालूच आहे. दहशतवाद, प्रांतवाद, जातीभेद, भाषावाद यांच्या रूपाने राष्ट्राचे हितशत्रू जणू दत्ताजी शिंद्यांप्रमाणे प्रतिदिन आम्हासही खिजवत आहेत, ''क्यूँ पटेल, और लढेंगे?''*

*उत्तर आम्ही द्यायचंय. विस्तृत वाचन, साक्षेपी चिंतन, प्रत्यक्ष कार्यानुभव या गुणवैभवाने समृद्ध झालेला आपला कार्यकर्ता उथळ माध्यमांच्या गदारोळात न हरवता प्रत्यक्ष शत्रूंवर चाल करेल. समरांगणावर विदेशी अब्दालींना तो सणसणीत प्रत्युत्तर देईल.*

*''बचेंगे- सबको बचायेंगे - लढेंगे और विजयी बनेंगे''*

*।। भारत माता की जय।।*

**सर्व जगासाठी शेकडो वर्षे आपण भारतीयांनी जो उदात्त अध्यात्म विचारांचा ठेवा जपला आहे, त्यात भारतीयांची पुराणप्रियता दिसते. या विचारांनी आकर्षित होऊनच उत्कट सेवाभाव मनात बाळगून मी भारतीयांची सेवा करण्यासाठी येथे आले आहे.**

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त २०१०

## मुखपृष्ठ कथा




वर्ष २०१०-११ हे भगिनी निवेदिता यांचे स्मृतीशताब्दी वर्ष आहे. त्यांनी भारतमातेची जी सेवा केली आहे त्याला अभिवादन म्हणून या वर्षांचे मुखपृष्ठ त्यांना अर्पित केले आहे. जन्माने आयरीश, धर्माने ख्रिश्चन असलेली मार्गरिट नोबल नावाची एक तरुणी, मानवी जीवनाचा अर्थ शोधत होती, त्यासाठी वेगवेगळ्या धर्मांचा अभ्यास करीत होती, तो अर्थ तिला स्वामी विवेकानंदांनी मांडलेल्या वेदांत धर्मामध्ये गवसला. तिने मनोमन निर्णय केला की मानवी जीवनाकडे पाहण्याचा हा उदात्त अर्थ ज्या धर्माने मांडला, ज्या देशात हा विचार जन्माला आला त्या देशाचीच आपण सेवा करावी. स्वामी विवेकानंदांजवळ तिने आपला निर्धार व्यक्त केला. स्वामी विवेकानंदांनी घेतलेल्या कठोर परीक्षांमध्येही ती उतरली आणि मग स्वामी विवेकानंदांनी तिला नुसतेच भारतात यायला अनुमती दिली नाही तर मानसकन्या म्हणून तिचा स्वीकार केला. मार्गरिट नोबलची भगिनी निवेदिता झाली.

नावाप्रमाणेच खरोखरीच समर्पित वृत्तीनेच भगिनी निवेदितांनी आयुष्याच्या अखेच्या श्वासापर्यंत भारतमातेच्या सेवेचे काम केले. स्वामी विवेकानंदांप्रमाणेच भगिनी निवेदिता यांनाही फार आयुष्य लाभले नाही. जेमतेम ४० वर्षांचे आयुष्य लाभले. भगिनी निवेदिता यांचे भारतात आगमन झाले तेच मुळी १८९८ मध्ये. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचा अवघ्या चार वर्षांचा सहवास त्यांना लाभला पण त्यातील प्रत्येक क्षणांचे त्यांनी खरोखरीच सोने केले. हिंदू तत्त्वज्ञानाचा त्यांनी प्रचंड अभ्यास केला. या हिंदू तत्त्वज्ञानाची ओळख करून देणाऱ्या त्यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद साने गुरुजींनी 'राष्ट्रीय हिंदू धर्म' या नावाने केला आहे. अत्यंत सोप्या परंतु प्रभावी भाषेत त्यांनी हिंदू धर्माची महती जगासमोर मांडली आहे. 'कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यु ही विश्रांती' ही काव्यपंक्ती बहुदा त्यांच्या जीवनाकडे पाहूनच कवीला सुचली असेल. इंग्रजी सत्तेला आव्हान देणाऱ्या अनुशीलन समिती या जहाल क्रंतिकारकांच्या संघटनेत त्या सक्रीय होत्या. जहाल क्रांतिकार्यात असलेल्या याच निवेदिता प्लेगसारख्या साथीत स्वच्छतेच्या किमान गोष्टीही न जाणणाऱ्या बंगालमधील गरीब जनतेची सेवासुश्रुषा करीत होत्या, प्रसंगी रस्ते घरं झाडीत होत्या. भारतातील महिला आणि मुलींचं शिक्षण कोण किती महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन आणि भारतीय महिलांमध्ये मुळातच असलेल्या गुणांना संधी मिळावी म्हणून त्यांनी बंगालमध्ये मुलींसाठी शाळा सुरू केली.

राष्ट्रध्वज हा प्रत्येक देशाचा एक अभिमानाचा, गौरवाचा विषय असतो. पारतंत्र्यात असलेल्या भारताचा राष्ट्रध्वज आपल्या शाळेतील मुलींच्या मदतीने त्यांनी तयारही केला होता. जगदीशचंद्र बोस यांच्यासारख्या शास्त्रज्ञाने लावलेल्या शोधांना जगाने स्वीकारावे यासाठी त्यांनी जगदीशचंद्रांना सर्व प्रकारची मदत केली व त्यांचा उत्साह वाढविला. भारतातील सर्व कला (विशेषत: चित्रकला, शिल्पकला) या युरोपातील देशांपेक्षा किती वेगळ्या आहेत, प्रगल्भ आहेत हे पटवून देणारी अभ्यासपूर्ण कलासमीक्षणे त्यांनी लिहिली आहेत. ही समीक्षणे वाचताना खरंच वाटून जातं की असे विचार मांडणाऱ्या निवेदिता या जन्मानेसुद्धा भारतीयच असल्या पाहिजेत. त्यांनी केलेल्या अफाट कार्यातून प्रेरणा घेऊन उद्याचा सामर्थ्यसंपन्न भारत घडवूया.

**मातृभूमी हा स्वामी विवेकानंदांच्या प्रेमाचा एकमेव विषय होता. एखाद्या नाजुक घंटिकेतून जसा सूक्ष्म आंदोलनानेसुद्धा ध्वनी निघावा त्याप्रमाणे मातृभूमी विषयीची बारीक सारीक वेदनाही त्यांच्या हृदयाचा तारा छेडी.**

# संक्षिप्त वार्षिक वृत्त

## शाखा विभाग

### संक्रांत उत्सव

दि.२४ जानेवारी रोजी शनिवार वाड्याच्या प्रांगणात या विभागाचा उत्सव संपन्न झाला. निवृत्त एअर मार्शल श्री. भूषण गोखले हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी 'आपले सण-आपले उत्सव' या विषयावरील महानाट्य या प्रसंगी सादर केले. प्रत्येक सणामागे, उत्सवामागे भारतीय विचार काय आहे, अपेक्षा कोणत्या आहेत हे या नाट्याद्वारे प्रस्तुत करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. अध्यक्ष या नात्याने बोलताना श्री. गोखले म्हणाले 'कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशाच्या संरक्षण यंत्रणेवर अवलंबून असते. ज्या देशाची संरक्षण यंत्रणा मजबूत असते त्या देशाची सतत प्रगती होत असते. लष्करी पोषाख घालणे प्रत्येकाला शक्य नसते मात्र आपल्या भागातील संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्याची माहिती लष्करी यंत्रणेला दिल्यास त्यांचे कार्य लष्करासारखेच ठरेल'.

### यशस्वी भव!

१२वी आणि १०वीच्या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी दि.१३ फेब्रुवारी रोजी कार्यक्रम संपन्न झाला. रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या रात्र प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अविनाश कुलकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्री. कुलकर्णी यांनी त्यांचे विचार मांडले. परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना श्री. कुलकर्णी यांनी उपयुक्त सूचना केल्या.

### इन्फोसिस कंपनीला भेट

हिंजवडी येथील इन्फोसिस कंपनीला वर्धिनी मधील इयत्ता ९वी मधील ६० विद्यार्थी व युवक कार्यकर्त्यांनी १३ फेब्रुवारी रोजी भेट दिली. भेटीबाबत मुलांच्या प्रतिक्रिया खूप बोलक्या आहेत-

* अचंबित करणारी वर्तुळाकार वास्तुरचना पहिल्यांदाच पाहिली.
* क्षणभरात प्रत्येकाचे फोटोसहीत ओळखपत्र तयार झालेले पाहून खूप मजा वाटली.
* कमालीची स्वच्छता, पुन्हा-पुन्हा स्वच्छता करण्याची व्यवस्था... केवळ अप्रतिम.
* आय. टी. क्षेत्राची परिपूर्ण माहिती मिळाली. छान वाटले.
* पदपथावरुनच चालायचे, लांब पडले तरी झेब्राक्रॉसिंगवरूनच रस्ता ओलांडायचा, ही शिस्त खूप भावली.
* या कंपनीच्या आवारात खूप झाडे आहेत, सुंदर हिरवळ आहे. पर्यावरणाविषयीची ही जागरुकता सगळ्यांनीच दाखवली तर?
* उत्तम शारीरिक तंदुरुस्तीसाठी आधुनिक व्यायामाची साधने, सर्व क्रीडा प्रकारांसाठी उपयुक्त मैदाने व साधने या सर्व सोयी पाहून मला या कंपनीत यायला मिळावे अशी मनात इच्छा निर्माण झाली.

### छत्रपतींचे व्यवस्थापन कौशल्य

ज्येष्ठ अभ्यासक श्री. अजीत आपटे यांचे 'छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य' या विषयावर रविवार दि.१४ फेब्रुवारी रोजी व्याख्यान

**पाश्चात्यांच्या भारताविषयीच्या अज्ञानाचे वर्णन 'निरक्षरता' या एकाच शब्दात करता येईल.**

झाले. 'स्व'-रुपवर्धिनी आणि राजे शिवराय प्रतिष्ठान यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. वेगवेगळ्या सार्वजनिक मंडळांचे कार्यकर्ते आणि महाविद्यालयीन विद्यार्थी असे सुमारे २५० श्रोते या व्याख्यानाला उपस्थित होते.

शिवजयंतीच्या निमित्ताने वर्धिनीच्या युवक कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम आयोजित केले होते.

## सहली- चक्क नियोजनाच्या?

१०वी-१२ वी च्या वर्धकांच्या परीक्षा संपल्यावर ३-४ महिन्यांची हीऽऽ मोठ्ठी सुटी. मग काय? १२ वी च्या २० युवकांची ढाक भैरी येथे तर १० वी च्या ३० वर्धकांची हरिश्चंद्रगड येथे सहली झाल्या. सुट्टीत साकारायची शिबिरे अभ्यासदौरे, कौशल्यांचे प्रशिक्षणवर्ग, छंद वर्ग आणि काही उद्योग-व्यवसायसुद्धा यांचेही नियोजन करून मावळे मंडळी उत्साहात पुनवडीत परतली.

## आपले काम आणि आपली भूमिका...

वर्षप्रतिपदेच्या निमित्ताने झालेल्या उपासनेच्या कार्यक्रमाला श्री. भैयाजी जोशी (सरकार्यवाह-रा. स्व.संघ) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी मांडले विचार...

डॉ. हेडगेवार यांनी संघाचे काम सुरू केले तेव्हा ते म्हणाले की, ''आम्ही काही नवीन असे सांगत नाही. हिदुत्वाची धारणा आपल्या समाजात आहेच.'' अनेक वेळा हिंदुत्वावर सांप्रदायिक असल्याची टीका केली जाते. पण हिंदुत्व सांप्रदायिक नाही. संप्रदाय म्हटल्यावर त्याचा प्रवर्तक एक माणूस असतो. एकच ग्रंथ असतो, एक विशिष्ट आचार असतो. हिंदू हा असा 'संप्रदाय नाही'. शेंडी, गंध इ. गोष्टी ही हिंदूची वरवरची ओळख झाली. हिंदू चिंतनात धर्माचा अर्थ व्यापक आहे. सुप्रिम कोर्टानेही हिंदू धर्माचा अर्थ संकुचित स्वरूपात नसल्याचे सांगितले आहे. हिंदूंची दृष्टी संकुचित तर नाहीच पण अत्यंत व्यापक आहे. शत्रूचा संहार करणे म्हणजे 'शत्रू-बुद्धीचा,' 'दुष्ट प्रवृत्तीचा' संहार करणे असे हिंदू धर्म मानतो संहार व्यक्तीचा करायचा नसून त्याच्यातल्या 'दुष्ट प्रवृत्तीचा' करायचा असतो असं हिंदू संस्कृती मानते. अशा व्यापक भूमिकेतून आपण काम करायचे आहे. ते निरपेक्ष वृत्तीने करायचे आहे. काही प्राप्त होण्याकरता, गौरव प्राप्त होण्याकरिता आम्हाला काहीही करायचे नाही. आमचे काम हा 'Thankless Job' आहे. सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याचा, सर्व जगाला बरोबर घेऊन जाण्याचा विचारच जगावर प्रभाव टाकील.

### माडगावकर पुरस्कार २०१०

*मुंबई येथील मधुकर माडगावकर ट्रस्टने ठेवलेल्या कायमनिधीच्या व्याजातून गेल्या आठ वर्षांपासून सर्वोत्कृष्ट वर्धक-वर्धिका पुरस्कार दिले जातात. वर्ष २०१० साठी खालील दोघा जणांची या पुरस्कारासाठी निवड समितीने निवड केली आहे. या दोघांचेही मनःपूर्वक अभिनंदन.*

*१) कै. मधुकर माडगावकर सर्वोत्कृष्ट वर्धक-वर्धिका पुरस्कार (उच्च माध्यमिक गट) - **गुरुप्रसाद सुधाकर मुळे** (स्वामी ब्रह्मानंद शाखा)*

*२) कै. मधुकर माडगावकर सर्वोत्कृष्ट वर्धक-वर्धिका पुरस्कार (माध्यमिक गट) - **प्रसाद सुभाष देशमुख** (स्वामी दयानंद शाखा)*

**आदर्श गुरु वैयक्तिक संबंध नाहीसा करून शिष्याला विश्वात भरून राहिलेल्या सत्याचा साक्षात्कार कसा घडवतो, हे मला (स्वामीजींमुळे) कळले.**

## उन्हाळी शिबिरे

एप्रिल महिन्यामध्ये संपन्न झालेल्या शिबिरांमध्ये खालील वक्त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| *८ वी ते १२ वी वर्धक शिबिर* | |
| | **प्रेरणासत्रे** |
| ज्ञानेश पुरंदरे | राष्ट्रीय व सामाजिक आव्हाने |
| प्रमोद कुलकर्णी | सद्य स्थितीतील आव्हानांचा मुकाबला |
| रामभाऊ डिंबळे | सामर्थ्य विकास व आव्हानांची तयारी |
| | **करिअरनामा** |
| विवेक वेलणकर | शास्त्र शाखेतून करिअरच्या संधी |
| प्राचार्य सी.एन रावळ | वाणिज्य शाखेतून करिअरच्या संधी |
| प्रा. विजय नवले | कला शाखेतून करिअरच्या संधी |
| | **पुण्याच्या समस्या आणि आपण** |
| स्थळभेटी : | * उरळी देवाची कचरा डेपो, |
| | * आनंदनगर ग्रीन ब्रीज प्रकल्प (नाला स्वच्छता प्रकल्प) |
| | * एरंडवणे मैला नि:सारण प्रकल्प, |
| | * ओला कचरा आधारित मिथेन गॅस प्लांट (मॉडेल कॉलनी) |
| | * रामनदी परिसरातील स्वच्छता मोहीम |
| | **व्याख्याने** |
| श्री. संदीप जोशी | ग्रीन ब्रीज प्रकल्प अनुभव |
| श्री. अनील गायकवाड | राम नदी स्वच्छता मोहिमेतील नागरी सहभाग: अनुभव |
| श्री. विनोद बोधनकर | पुण्याची स्वच्छता आणि आपली जबाबदारी |
| | **प्रेरणासत्रे** |
| विलास कुलकर्णी | बालपणीचे ए.पी.जे. अब्दुल कलाम, |
| शिरीष पटवर्धन | आपले गुण आपली ताकत (ध्रुव बाळ, नचिकेत, अभिमन्यू, गोपाळ ग. आगरकर, नानासाहेब परुळेकर इ.) |
| निलेश धायरकर | छ. संभाजी महाराजांचा दक्षिण दिग्विजय |
| | **व्याख्यानसत्रे** |
| अनील लचके | शास्त्रज्ञांचे बालपण |
| संदीप आठवले | बालपणीचे डॉ. हेडगेवार |

**'आध्यात्मिक वृत्ती' हा एक विशिष्ट गुण आहे. माणसात तो असणे महत्वाचे आहे.**

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| मोहन शेटे | मिदनापूरची हॅट्रीक |
| श्री. दत्ता टोळ | थोरांचे बालपण |
| ज्ञानेश पुरंदरे | वीर सावरकर |
| शशीकांत ठोंबरे | स्वामी विवेकानंद |
| श्री. नीलेश धायरकर | छ. शिवाजी महाराजांचे बालपण |
| दिप्तीताई कोल्हटकर | संस्कारकथा |
| चेतन महिंद्रीकर | शिवरायांच्या पराक्रम कथा |
| | **कृतीसत्रे** |
| मानसीताई मोरे | आईस्क्रिम कांड्यांचे सुशोभन |
| श्रीमती नांदुरकर, भुवड व पोफळे | कापडी तुकड्यांचे व चिंध्यांचे पक्षी बनविणे |
| ज्ञानेश पुरंदरे | स्मरणशक्तीचे खेळ |
| ***व्यक्तिमत्त्व विकास शिबिर (लातूर)*** | |
| श्री. संजय कांबळे | कचरा व्यवस्थापन व कुष्ठरोगी पुनर्वसन कार्य, लातूर |
| श्रीमती इंदुमती सावंत | स्फूर्तीदायी बालगीते व संस्कार कथा |
| डॉ. चंद्रशेखर अष्टेकर | स्वच्छता व आरोग्य |
| संदीप जगदाळे | स्वामी विवेकानंद चरित्र |
| संदीप मनवल | शिवरायांचे संघटन |
| वेदांग कुलकर्णी | निसर्ग अपुला सखा |
| श्री. अप्पाराव | वंद्य वंदे मातरम् |
| अभिजित शिंदे | कथा जिद्दीच्या |
| हर्षल सोनार | गुरुभक्ती कथा |
| कु. मीनल गावडे | सुधामूर्ती यांची 'मातृत्व' ही कथा |
| कु. हर्षाली फुलावरे | संस्कार कथा |
| ज्ञानेश पुरंदरे | देश हा देव असे माझा |
| शिबिर समारोप | डॉ. निलेश क्षीरसागर, उपजिल्हाधिकारी-लातूर<br>सौ. शिवमाला वाघमारे, सरपंच-हरंगुळ आणि<br>श्री. जयप्रकाश दगडे-उपसंपादक दै. लोकमत |

**ईश्वरी अनुभूती, त्याग आणि शांत स्वभाव म्हणजेच स्वामी विवेकानंद.**

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| ***अभिव्यक्ती विकास शिबिर : भगिनी निवेदिता शाखा*** | |
| अभिव्यक्ती चित्रकलेतून | : श्री. मिलिंद देशपांडे |
| कवितेतून | : सौ. आशाताई साठे |
| गायनातून | : सौ. सुधाताई देव |
| अभिनयातून | : सौ. सुरेखाताई व दीपाताई लागू |
| कृतीसत्रे : ऑरगंडीची फुले | : वैशाली कानतोडे |
| ओरिगामी | : विवेक साने |
| प्रेरणासत्रे : | |
| भगिनी निवेदिता चरित्र | : सौ. आर्याताई जोशी |
| शिक्षणक्षेत्रातील भगिनी निवेदितांचे योगदान | : जयंतराव कवठेकर |
| क्रांतिकारक भगिनी निवेदिता | : सौ. सुरुची पांडे |
| देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे | |
| घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे | |


## संपदा सहकारी बँक लि.

***मुख्य कार्यालय :***
***७१७ बुधवार पेठ, कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११ ००२***
***फोन नं. : (०२०) २४४५१८३०, २४४५९७०८, फॅक्स : २४४९३२६१***

* २००९-२०१० सालासाठी बँकेस ऑडिट 'अ'वर्ग प्राप्त
* निव्वळ एन.पी.ए.०%,
* सिंहगड रोड वासियांच्या सेवेत धायरी शाखा नुकतीच सुरू,
* सर्व शाखा संपूर्णत: संगणकीकृत,
* सोने तारणावर त्वरीत कर्ज उपलब्ध,
* सभासदांना लाभांश जाहीर,
* अन्य वाहन कर्जासाठी ११% व्याजदर
* सर्व शाखांमध्ये लॉकर उपलब्ध
* सकाळी व संध्याकाळी कामकाज
* महिलांसाठी खास कमी (१०%) व्याजदराची 'भगवती वाहन कर्ज योजना'

**आपले,**

| सुभाष रावळ | दिलीप नलावडे | सी. ए. विवेक मठकरी |
|---|---|---|
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |

* बुधवार पेठ शाखा, पुणे — फोन नं. ०२०-२४४५६०८३, २४४५१८३०
* चाकण शाखा, जिल्हा पुणे — फोन नं. ०२१३५-२४९९३८, २५९७३३
* सुभाषनगर शाखा, पुणे — फोन नं. ०२०-२४४९५०२२, २४४९५४३४
* कर्वे रोड शाखा, पुणे — फोन नं. ०२०-२५३९५८७६, २५३९४०६२
* धायरी शाखा, पुणे — फोन नं. ०२०-२४३९१४७१


**लोकांनी, लोकांसाठी दिलेल्या लहान देणग्याच जास्त उपयुक्त ठरतील. या पद्धतीने पैसा जमा केल्यास कार्याला द्रव्याची केव्हाच उणीव भासणार नाही. दान देणारा व घेणारा कार्यकर्ता दोघांनाही आनंद वाटेल.**

**शिबिरातील विशेष**

● ५वी ते सातवीच्या वयोगटातील विद्यार्थ्यांचे शिबिर १०वीची परीक्षा दिलेल्या युवकांनी संचलित केले. थोरांचे बालपण हा त्याचा विषय होता.

● दुपारच्या वेळेत झालेल्या कृतीसत्रात शिबिरस्थानी उपलब्ध असलेल्या व स्वत: आणलेल्या वस्तूंचा वापर करून एखादी रचना तयार करण्याची स्पर्धा घेतली होती. यामध्ये ५ वी मधील विद्यार्थ्यांनी टॉवेल, चादर, बॅग यांच्या साह्याने मंदिराची प्रतिकृती तर ताट, वाटी, पेला यांच्या साह्याने गणपती बनविला होता. ७ वीच्या गटाने वर्धिनीचे बोधचिन्ह तयार केले यासाठी त्यांनी फक्की, विटांचा चुरा, झाडांची पाने, चादरी यांचा वापर केला होता.

● या शिबिरामध्ये बालसाहित्यिक श्री. दत्ता टोळ यांनी व्याख्यानानंतर सर्व शिबिरार्थीकडून पुस्तक वाचनाची प्रतिज्ञा करून घेतली. सत्रानंतर त्यांचे आभार मानण्याचे काम आकाश पोळेकर या शिबिरार्थी विद्यार्थ्यांकडे होते. ज्या धिटाईने व सफाईने त्याने हे काम केले ते पाहून श्री. दत्ता टोळ यांनी त्याचे विशेष कौतुक केले.

● आठवी ते बारावी वयोगटातील शिबिराचा मुख्य विषय होता 'पुण्याच्या समस्या आणि आपण'. शिबिरातील पहिला दिवस हा स्थळ भेटींचा होता. यामध्ये रोज १५०० टन पुण्याचा कचरा ज्या डेपोत टाकला जातो तो उरळीचा डेपो मुलांनी पाहिला. कचऱ्याचे डोंगर पाहून मुलांना आश्चर्य तर वाटलेच पण आपण किती कचरा निर्माण करतो व त्याची विल्हेवाट लावताना किती निष्काळजी असतो याची जाणीव मुलांना या भेटीमुळे झाली. परतीच्या प्रवासात कचरा डेपोत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना काय काय त्रास होत असतील यावर चर्चा नकळत होत होती.

● एरंडवणे येथील मलनि:सारण प्रकल्पाच्या भेटीत आपण पुणेकर याही बाबतीत किती निष्काळजी आहेत यांचे दर्शन घडले. पुण्याची गरज ३० मलनि:सारण प्रकल्पांची असताना केवळ ६ ते ७ एस.टी.पी. प्लांट आहेत हे कळल्यावर धक्काच बसला. इतके कमी प्लांट असल्याने पुण्याचा जवळपास ५० टक्के मैला नदीमार्गाने उजनी धरणापर्यंत जातो. यामुळे मोठ्या प्रमाणावर मासे मृत होतात, काठावरच्या गावांमधील लोकांना पोटाचे आजार होतात पण याची कल्पना किती पुणेकरांना असेल?

● या स्थळभेटींमध्ये जसे पुण्याचे प्रश्न पाहिले तसे स्वयंस्फूर्तीने हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारे काही प्रकल्पही पाहिले. त्यामध्ये बाणेर रस्त्यावरील राम नदीच्या स्वच्छतेसाठी लोकसहभागातून चालणारे प्रयत्न मुलांनी पाहिले. मॉडेल कॉलनी परिसरातील नागरिक व हॉटेल उद्योग यांच्याकडून दररोज ओला कचरा गोळा करून त्याच्या साह्याने उभा राहिलेला व प्रत्यक्ष चालू असलेला मिथेन प्रकल्प पाहिला. येथे मिथेनच्या साह्याने परिसरातील रस्त्यावरचे सुमारे १५० दिवे लागतात. सिंहगड रस्त्यावर 'सेरी' या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून एका नाल्यावर ग्रीन ब्रीज प्रकल्प चालविला जातो. ज्या नाल्याशेजारी उभे राहणेसुद्धा शक्य नाही अशा नाल्यामध्ये अगदी साधे तंत्रज्ञान व नैसर्गिक साधनांचा वापर करून हा प्रकल्प उभा राहिला आहे. त्यामुळे नाल्याचा वास गेला, पुढे वाहणारे पाणी चांगल्या पद्धतीने स्वच्छ झालेले मुलांनी पाहिले तसेच या पाण्यामुळे या नाल्याभोवती हिरवाई निर्माण झाली आहे.

● एरंडवणे येथील मलनि:सारण प्रकल्पावर

**शिक्षण पुरे झाल्यावर लग्न करावे की राष्ट्राची सेवा करावी, हे प्रत्येक मुलीला ठरविण्याची मोकळीक असावी.**

अभियंता म्हणून काम करणारे श्री. संतोष लाटणेकर व श्री. जगताप साहेब यांनी गोमूत्राचा उपयोग या प्रकल्पामध्ये पाणी शुद्धिकरणासाठी केला आहे. त्यांनी केलेल्या प्रयोगामध्ये त्यांना चांगले यश मिळाले असून यावर अधिक संशोधन करून त्याचा वापर करण्याचा त्यांचा मनोदय आहे. हे प्रयोग त्यांनी स्वयंस्फूर्तीने केले आहेत हे अधिक आनंद देणारे वाटले.

१. **सुटीतील उपक्रम :** १४ एप्रिल ते १४ जून अशी जवळपास दोन महिने उन्हाळी सुटी होती. या काळात वर्धिनीच्या शाखांवर शिबिरांव्यतिरिक्त विविध उपक्रम घेण्यात आले. त्यापैकी काही कार्यक्रम खालीलप्रमाणे झाले.

★ १४ एप्रिल ते ३० एप्रिल या काळात वर्धक वर्धिकांची निवासी शिबिरे संपन्न झाली.

★ पोहणे - शाहू तलावावरती वर्धिनीमधील १६० विद्यार्थ्यांनी दोन महिने पोहण्याच्या व्यवस्थेचा लाभ घेतला. यापैकी ४० वर्धक नव्याने पोहणे शिकले. तर पोहणे येत असलेल्या १२० वर्धकांनी पोहण्यातील कौशल्ये शिकण्याचा प्रयत्न केला.

२. **कार्यक्रम विविधा :** जवळपास सर्व शाखांवर वेगवेगळ्या स्पर्धा, खेळ व विविध उपक्रम घेण्यात आले.

- स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीच्या निमित्ताने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतीगृहातील त्यांच्या निवासकक्षाला भेट.
- महाराष्ट्र दिनानिमित्त विविध गुणदर्शन कार्यक्रम
- माहिती संकलन प्रकल्प (विषय:) साप, जलचर व भूचर प्राणी, पक्षी, तीन अपरिचित क्रांतिकारक, तीन खेळाडू इ. यांची माहिती संकलीत करणे.
- महिषासुरमर्दिनी स्तोत्र पाठांतर
- पुस्तक वाचन - गोष्टी माणसांच्या, माझा साक्षात्कारी हृदयरोग, पुण्यभूमी भारत,
- प्रशिक्षण - तबला व पेटी (अखंडानंद शाखा), कॅलिग्राफी (श्रद्धानंद शाखा)
- छत्रपती संभाजी महाराज जयंती कार्यक्रम निमित्त कथाकथन.
- श्री. सुनील कुलकर्णी यांच्याशी वैज्ञानिक गप्पा गोष्टी
- मूकनाट्य - विषय: शेतकरी आत्महत्या, कचरा व्यवस्थापन.
- इतिहास संशोधक मंडळ - शस्त्रप्रदर्शनाला भेट
- पाढे पाठांतर, नाट्य स्पर्धा, जाहिरात स्पर्धा, आदर्शगाव स्पर्धा.

३. **दुर्गदिन कार्यक्रम :** १ मे च्या दुर्गदिनानिमित्त वर्धिनीच्या ९ शाखा सरसगड, सिंहगड, रोहिडा, तोरणा, सज्जनगड या पाच गडांवर गेल्या होत्या. एकूण १५० वर्धकांनी दुर्गस्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. यामध्ये प्लॅस्टिक पिशव्या-बाटल्या, काचेच्या बाटल्या, कचरा दूर करणे, गडावरील मंदिराची स्वच्छता, छत्रपती शिवरायांची आरती, तळ्यांची स्वच्छता, बुरुजांची स्वच्छता, प्रेमवीरांनी पवित्रगडांवर उमटवलेल्या खुणा पुसणे अशी अनेक कामे वर्धकांनी केली.

**माझं वैयक्तिक जीवन ! कुठं आहे ते? निरुपयोगी वस्त्रासारखं मी ते दूर भिरकावून दिलं. स्वामीजींच्या पायाशी बसण्यासाठी.**

४. **युवक शिबिर वृत्त :** १० जून संध्याकाळ ते १३ जून संध्याकाळ या कालावधीत आय. एल. एस. लॉ कॉलेज येथे युवकगटाचे शिबिर संपन्न झाले. शिबिरात झालेली सत्रे खालीलप्रमाणे

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| डॉ. प्रदीप आगाशे | नवे शैक्षणिक धोरण आणि वर्धिनीचे काम |
| शिरीष पटवर्धन | वर्धिनीच्या प्रार्थनेचा भावार्थ |
| डॉ. नीलेश क्षीरसागर (उपजिल्हाधिकारी - लातूर) | प्रशासन देशासाठी |
| श्री. रमेश सेठ | राजकारण देशासाठी |
| ज्ञानेश पुरंदरे | जिज्ञासा समाधान |
| प्रा. शिरीष आपटे | श्रेष्ठ करिअर कोणते? |
| श्री. सुनील देवधर | शाखा हाच पर्याय |

वार्षिक नियोजन : सर्व शाखांनी आपापला आढावा तसेच नव्या वर्षाचे नियोजन सर्वांसमोर सादर केले.
समारोप : सहकार्याध्यक्ष श्री. रमेश जोशी यांच्या मार्गदर्शनाने या तीन दिवसांच्या शिबिराचा समारोप झाला.

CHEM-TECH

With Best Compliments From

*M/s. Chemtech Specialities*
*&*
*M/s. Chemtech Laboratories*

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex, Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com

आदर्शाचं स्पष्ट दर्शन आणि पूर्ण श्रद्धा यांचं मोल इतर कोणत्याही भावनेहून अधिक आहे.

### (१) अभिव्यक्ति विकास प्रकल्प

या वर्षीच्या उन्हाळी शिबिरांमध्ये भगिनी निवेदिता शाखेचे याच विषयावरचे शिबिर झाले. या शिबिराचे संयोजन ज्येष्ठ अभिनेत्री दीपाताई लागू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. शिबिरार्थी आणि संयोजक दोघांनाही शिबिर खूप आवडले.

### (२) शैक्षणिक साहित्य भेट प्रदान कार्यक्रम

स्वामी विवेकानंद शाखेवर शनिवार दि.१० जुलै रोजी एका छोटेखानी कार्यक्रमात इन्फोसिस फौंडेशनशी संबंधित मंगलम न्यासाच्या वतीने वर्धकांना १६ डझन वह्या भेट देण्याचा कार्यक्रम झाला. अशाच स्वरूपाची सेवासहयोग संस्थेकडून, दप्तरे भेट मिळाली. वेगवेगळ्या प्रकल्पांतील गरजू विद्यार्थ्यांना ती देण्यात आली.

### (४) गुणगौरव समारंभ १८ जुलै, २०१०

टाटा मोटर्सचे श्री. प्रशांत अहीर (GM-HRD), यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांच्या भाषणात स्वत:चा सूर ओळखणं व स्वत:ची शक्ती ओळखणं याचे महत्त्व त्यांनी विशद केले. यावर्षी सुमारे १५० विद्यार्थी बक्षिसाचे मानकरी ठरले.

### पथनाट्य करताना...

*स्वारगेट नंतर मुलांनी जवळच सारसबागेत दोन ठिकाणी पथनाट्यं सादर केले. हे करताना एक वेगळाच अनुभव युवकांना व मुलांना आला. सारसबागेत पथनाट्य करताना एक जोडपे मन लावून ते पथनाट्य पाहत होते. पथनाट्य झालं आणि प्रेक्षकांनी कौतुक करून दाद दिली.*

*पण एवढ्या मोठ्या जनसमुदायामध्ये मोठ्याने बोलून मुलांचा घसा कोरडा पडला होता आणि मुलांना तहानही लागली होती. मुलांनी पाण्याची मागणी केली आम्ही पाण्याचा शोध घेऊ लागलो. आमची ही धावपळ त्या जोडप्याच्या बहुदा लक्षात आली असावी. काही वेळात ते जोडपे आमच्या जवळ आले व त्यांनी ५० रुपयाची नोट युवकाच्या हातावर ठेवून सांगितले की 'मुलांसाठी पाण्याची सोय करा.' आमच्यासाठी हा अनुभव निराळाच होता. जाताना त्या जोडप्याशी गप्पा झाल्या त्या वेळेस ते म्हणाले 'समाजात चांगलं काम चालू आहे कारण ते तुम्ही चालू ठेवलं आहे.' वर्धिनी करत असलेल्या चांगल्या कामाची ही एक पावती होती. गणपती उत्सवात विविध ठिकाणी केलेल्या पथनाट्याच्या सादरीकरणामध्ये हा अनुभव अविस्मरणीय व जोमाने काम करण्यासाठी प्रेरणादायी आहे.*

***-गणेश पवार***
***स्वामी अखंडानंद शाखा***

❖❖❖

**ज्यांना आपल्या साधनेने दैवी शक्ती प्राप्त होते तेच, असत्य जगातले सत्य काय हे सांगू शकतात. त्यांनाच मर्त्यातून अमृततत्त्व शोधता येते.**

- **स्वामी श्रद्धानंद शाखा :** घरातील कचऱ्याचे व्यवस्थापन, परिसराचे सर्वेक्षण करणे (पालकसभा) - वक्त्या : श्रीमती मनिषाताई पाठक (गटकार्य)
- **स्वामी ब्रह्मानंद शाखा :** नियोजन - वक्ते - गुरुप्रसाद मुळे. भारतासमोरील समस्या (लघुपट). विश्वास नांगरे पाटील (लघुपट). जलशुद्धीकरण केंद्राचे काम कसे चालते? (केंद्र भेट).
- **स्वामी अखंडानंद शाखा :** महाराणा प्रताप जयंती (चरित्रकथन) - वक्ते : अभिजीत पिटले. नवे शासकीय शैक्षणिक धोरण (पालकसभा) - वक्ते : डॉ. प्रदीप आगाशे. शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम (चरित्रकथन) - वक्ते : योगेश्वर घोघले. लेखन वाचन कौशल्य - वक्त्या : सौ. मेघाताई नगरे. कथाकथन - वक्ते : ज्ञानेश पुरंदरे.
- **स्वामी विवेकानंद शाखा :** धर्मवीर संभाजी महाराज जयंती (चरित्रकथन) - वक्ते : विजय धोत्रे. शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम (मशाल फेरी व प्रबोधन)-वक्ते : निलेश धायरकर. गुरु हरगोविंदसिंह जयंती (चरित्रकथन) - वक्ते : हर्षल सोनार. राजर्षि शाहू महाराज जयंती (चरित्रकथन)- वक्ते : नंदकिशोर एकबोटे.
- **स्वामी दयानंद शाखा :** दैनंदिनी लिखाणाचे महत्त्व - वक्ते : सुमित डोळे. छत्रपती श्री शिवराय (चरित्रकथन) - वक्ते : चेतन महिंद्रकर.

**मशालफेरी**

*स्वामी अभेदानंद शाखा आणि स्वामि विवेकानंद शाखा यांनी संयुक्तपणे शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने एका मशालफेरीचे आयोजन केले होते. यामध्ये पांडवनगर, गोखलेनगर परिसरातील स्थानिक तरुणही सहभागी झाले होते. विद्यार्थी, पालक व स्थानिक तरुण असे सुमारे १५० जण या कार्यक्रमाला उपस्थित होते. याप्रसंगी श्री. निलेश धायरकर यांनी शिवरायांचे प्रेरणादायी चरित्र मांडले.*

*With Best Compliments From*

THE POONA MOTOR GOODS TRANSPORT

**** Fleet-Owners & Transport Contractors * Full load and part load service for Pune to Bombay & Vice Versa * Full truck load service for Maharashtra & Gujrath State***

❖❖❖

Head Office : 780, Sadashiv Peth, Pune 411 030.
Phone : 24473222, 24477621, 24476914

❖ Branch ❖

137, Transportnagar, Sector 23, Nigdi, Pune 44.
Phone : 27656925, 27656935
13 B, Sadashiv Cross Lane, Kandewadi, Girgaon, Mumbai 4,
Phone : 23822538, 23862210
Ramraj Yadav Chal, Gala No. 2, 90 Ft. D.P. Road, Sakinaka,
Near Ganesh Temple, Andheri, Mumbai 400 072, Phone : 28513018

**हे ऐक्य फक्त भूतकालीन नाही किंवा भविष्यकालीनही नाही. वर्तमान कालातही सर्व भारतीय एकच आहेत. फक्त आपल्याला त्याची जाणीव नाही इतकंच.**

## शाखांवरचे उपक्रम

**गुणगौरव कार्यक्रम – ५ वी ते ७ वी गट**

सर्व शाखांमधील ५वी ते ७वी मधील वर्धक वर्धिकांना गेल्या वर्षातील सरस कामगिरीबद्दल शाबासकी देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. असा स्वतंत्र व भागश: कार्यक्रम या वर्षी पहिल्यांदा झाला. वर्धिनीच्या सर्व शाखा एकूण चार विभागात विभागल्या असून त्यांचे भागानुसार काही कार्यक्रम एकत्र व्हावेत असा प्रयत्न आहे. गुणगौरव कार्यक्रम हा त्यातील एक होता. या कार्यक्रमांना पुढील अतिथी लाभले होते.

**भाग १ :** (शाखा- रामकृष्ण श्रद्धानंद व योगानंद शाखा) सौ. ज्योत्स्नाताई सरदेशपांडे (नगरसेविका)

**भाग २ :** (शाखा- अखंडानंद, दयानंद व सहकारनगर शाखा) सौ. ज्योतीताई केमकर (समुपदेशक)

**भाग ३ :** (शाखा - ब्रह्मानंद, सुबोधानंद व राजर्षी शाहू शाखा) श्री. रवींद्र पाथरकर

**भाग ४ :** (शाखा - स्वामी अभेदानंद आणि स्वामी विवेकानंद शाखा) प्रकाश पारखी (बालनाट्य चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते)

**आरोग्य तपासणी –** पुणे विद्यापीठाच्या शरीरशास्त्र विभागाच्या सहकार्याने भगिनी निवेदिता शाखेतील ५० मुलींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. सर्व वर्धिकांची उंची, वजन, मनगट, हिमोग्लोबिनचे प्रमाण अशा सर्व गोष्टींची तपासणी करण्यात आली.

## गुरुपौर्णिमा

या दिनाच्या निमित्ताने खालील कार्यक्रम शाखांवर घेण्यात आले.

अखंडानंद शाखा : सौ. स्नेहल कुलकर्णी बाई व सौ. विजया पुजारी बाई यांनी विद्यार्थ्यांच्या अंगी कोणते गुण असावेत या विषयावर आपले अनुभव सांगितले व यासंबंधीचे आपले विचार मांडले.

अभेदानंद शाखा : श्री. श्यामराव कराळे सर यांनी कृष्ण सुदामाची कथा सांगत सांगत गुरुशिष्याच्या नात्यावर प्रकाश टाकला.

रामकृष्ण शाखा : विविध व्यक्तिमत्त्वांच्या वेषभूषा करून नाटिकांच्या माध्यमातून गुरुशिष्यांच्या गोष्टी सादर करण्यात आल्या.

विवेकानंद शाखा : श्री. राजेश काटकर यांनी व्यासपीठ म्हणजे काय? गुरू कोण असतो? ध्यानाचे महत्त्व अशा विषयावर आपले विचार मांडले.

★★★

**भारतीय जीवनात संकलनाची थोर कल्पना आहे. या अतुलनीय संकलनात अपार सामर्थ्य साठवलेलं आहे, त्यात भव्यता आहे, सुप्त कुवत आहे.**

**अखंडानंद शाखा :**

दि. २१ ऑगस्ट : शाखेवर लहान गटासाठी कथाकथनाचा कार्यक्रम घेतला. श्री. चेतन महिंद्रकर यांनी मुलांना मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांना 'पुरंदर'ची शौर्यकथा सांगितली.

कै. नारायण सुर्वे यांना श्रद्धांजली म्हणून मोठ्या गटासाठी कविता रसग्रहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. शाखेतील युवकांनी निवडक कवींच्या कविता वाचून त्यांचे रसग्रहण करून भावार्थ स्पष्ट केला.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | चार शब्द | कै. नारायण सुर्वे | अभिजित पिठले |
| २) | कणा | कुसुमाग्रज | सागर कांबळे |
| ३) | देणाऱ्याने | कै. विं. दा. करंदिकर | विशाल हवाले |
| ४) | पैठणी | कै. शांता शेळके | हर्षद कुलकर्णी |
| ५) | आहे बुद्धीशी इमान | कै. बा. सी. मर्ढेकर | विनायक घोटकुले |

२८ ऑगस्ट : मुलांसाठी व्याख्यान - वक्ते श्री. अरविंद साठे.

'वाढती लोकसंख्या व गरिबी' हा विषय मुलांशी गप्पागोष्टी स्वरूपात मांडला.

२५ ऑगस्ट : 'सकाळ टाईम्स' या वर्तमानपत्रासाठी अभिजित पिठले, चेतन महिंद्रकर, चेतन ठाकरे, गणेश पवार या युवकांची मुलाखत 'एकता कट्टी' या शाखेतील ताईंनी घेतली.

दि. ४ सप्टेंबर १० रोजी हार प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. शाखेतील युवक कार्यकर्ता श्री. अतुल बिबवे याने मुलांना विविध हार बनविण्यास शिकविले. याचा फायदा असा झाला की गणपतीमध्ये मुलांनी स्वत: तयार केलेले हार घरच्या गणपतीला घातले. तसेच मूर्तिकला प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. हा वर्ग शाखेतील इ. ७ वीतील विद्यार्थी आश्विन कुंभार याने घेतला. भिंतीवर चिकटविण्यात येणारे गणपती कसे बनवायचे हे त्याने मुलांना शिकविले.

दि. ५ व ६ सप्टेंबर २०१० रोजी ज्ञान-प्रबोधिनीच्या सौ. लिखिते मॅडम यांनी गणेश-प्राणप्रतिष्ठा वर्ग घेतला. ८ वी, ९वीतील विद्यार्थी व परिसरातील नागरिक व पालक वर्गाला उपस्थित होते. त्याप्रमाणे गणेश चतुर्थीला मुलांनी एकूण १० ठिकाणी श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा केली.

दि. ५ सप्टेंबर २०१० रोजी श्री. अनिरुद्ध गायकवाड या युवकाने गणेश-सजावट प्रशिक्षण वर्ग घेतला. मुलांनी त्याप्रमाणे आपल्या घरच्या गणपतीची सजावट केली. गणेशोत्सवाच्या काळात गणित प्रकल्प घेतला. मुलांना १२१ विविध प्रकारची गणिते सोडवायला दिली होती.

शाखेत इयत्ताश: 'विज्ञान-संकल्पना-प्रकल्प' घेण्यात आला. या दिवशी मुलांना त्यांच्या विज्ञान पाठ्य पुस्तकातील काही संकल्पना दिल्या होत्या. या संकल्पना मुलांनी वर्गाला समजावून सांगितल्या.

२३ सप्टेंबरला गणेशोत्सव दिन घेण्यात आला.

**वक्ते-** मा. श्री. मोहन शेटे. **विषय-** 'आधुनिक गणेशोत्सव'.

गणेशोत्सव काळात अष्टविनायकांपैकी सहा गणपतीच्या ठिकाणांची माहिती दिली.

या वर्षीच्या गणेशोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे 'पथनाट्ये'! 'जागृती' हा विषय घेऊन सामान्य माणसाला छळणाऱ्या ५ समस्या या नाट्यातून मांडल्या होत्या. भ्रष्टाचार, दारिद्र्य, व्यसनाधिनता, दहशतवाद,

**ऐक्याची बलशाली कल्पना, जीवंत आणि समर्थ राष्ट्रीय भावना, एक वारसा, एक जीवन व एक झगडा, यातून प्रगट होईल. सर्वांच्या आशा-आकांक्षा समान होतील.**

गरिबी या समस्या माणसाला कशा छळतात हे मुलांनी नाट्यातून सादर केले. यामध्ये २२ मुले व १ युवक यांचा सहभाग होता. वनराज मित्र मंडळाने शाखेस पु. ल. देशपांडे यांची काही पुस्तके भेट म्हणून दिली.

४ नोव्हेंबर : शाखेत जाहिरात स्पर्धा घेतली होती. त्यात एक विनोदी व एक प्रबोधनपर जाहिरात सादर केली. स्पर्धेच्या परिक्षणाचे काम श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी पाहिले.

५ नोव्हेंबर : शाखेत लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम केला. मुलांना लक्ष्मीपूजनाची माहिती सांगून मुलांनी काही पद्ये सादर केली.

२६ नोव्हेंबर : 'कोण बनेल शिवभक्त?' ही एक अभिनव स्पर्धा घेण्यात आली.

आठवडाभर शाखेत शिवचरित्राचे वाचन सुरू होते. यावर आधारीत स्पर्धेसाठी आवाजाची वाचिक अभिनयाची चाचणी घेण्यात आले. या चाचणीमधून सहा स्पर्धक स्पर्धेसाठी पात्र ठरले.

१) गौरव भारत चौधरी - इ. ७ वी
२) अश्विन सुनील कुंभार - इ. ७ वी
३) अनिकेत अनिल महांगडे - इ. ६ वी
४) अजय दिगंबर हवाले - इ. ६ वी
५) गौरव नवनाथ चौधरी - इ. ८ वी
६) वैष्णव सुखदेव आबनावे - इ. ७ वी

अजय दिगंबर हवाले इ. ६ वी हा वर्धक स्पर्धेत विजयी ठरला.

**समर्थ रामकृष्ण शाखा :**

१६ ऑगस्ट : श्री. राहूल कोकिळ यांचे व्याख्यान आयोजित केले.

'कारगिलचा रणसंग्राम'. स्लाईड शो द्वारे अत्यंत प्रभावी सादरीकरण. नंतर प्रश्नोत्तरे. मुलांवर विषयाचा प्रभाव विशेषत्त्वाने जाणवला.

२२ ऑगस्ट : पालक सभा - वक्ते - श्री. रामभाऊ डिंबळे विषय : आदर्श पालकत्व.

**भगिनी निवेदिता शाखा :**

आशाताई व सुधाताई यांनी ७ ऑगस्ट रोजी शाखेत एक कार्यशाळा घेतली. विषय होता 'रविंद्रनाथ टागोर'. रविंद्रनाथ टागोर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष एप्रिल २०११ मध्ये पूर्ण होणार आहे. त्यांच्या 'शांतिनिकेतन' या शाळेबद्दल तसेच त्यांनी लिहिलेल्या 'जन-गण-मन' या आपल्या राष्ट्रगीताचा अर्थ सांगून त्यांच्या छोट्या छोट्या गोष्टी व कविता वाचून दाखविल्या.

२८ ऑगस्ट रोजी दिपा लागू यांनी मुलींच्या शाखेवर अभिनय कार्यशाळा घेतली.

कोजागिरीचा कार्यक्रम म्हणून भगिनी निवेदिता शाखेने भगिनी निवेदितांच्या जन्मशताब्दी वर्षाचे निमित्ताने २३ ऑक्टोबर २०१० ला एका एकपात्री कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

एकपात्री नाट्याच्या सादरकर्त्या- श्रीमती उषाताई कुलकर्णी विषय - समर्पिता निवेदिता

१४ नोव्हेंबर २०१० हा दिवस देशभर 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो. भगिनी निवेदिता शाखेने

**स्वामीजींचा संदेश पुन्हा एकदा त्यांच्याच शब्दात मी देते, ''उठा, जागे व्हा, समरांगणात उतरा. ध्येय साध्य होईपर्यंत विश्रांतीचे नावही काढू नका.''**

हा दिवस एका नाटकाने साजरा केला. ३० वर्धिकांनी नाटकात भूमिका केली.

नाटकाचे नाव - ''बालदिन झिंदाबाद'' नाट्यलेखन - श्रीमती आशाताई साठे

सूत्रधार - श्रीमती दीपा लागू व सहकारी

**<u>स्वामी दयानंद शाखा</u>**

या वेळेस शाखेने गणेशोत्सवात एकूण ४ पथके बसवली होती.

१) झांज, २) लेझीम, ३) घुंगुरकाठी, ४) मर्दानी खेळ

पहिल्या दिवशी गणेशचतुर्थीला शाखेने हिंद तरुण मित्र मंडळ-कँप या मंडळापुढे झांज-लेझीम-मर्दानी खेळाचे सादरीकरण केले.

५ व्या दिवशी विंचुरकरवाडा- सदाशिव पेठ, येथे घुंगुरकाठी व मर्दानी खेळाचे शानदार सादरीकरण झाले. सातव्या दिवशी कानिफनाथ मित्र मंडळ, धनकवडी येथे चारही पथकांनी उत्तमरीत्या सादरीकरण केले. अनंत चतुर्दशीला पुण्याच्या मानाच्या ४थ्या तुळशीबाग गणेश मंडळापुढे लेझीम, घुंगुरकाठी व मर्दानी खेळाचे सादरीकरण केले. नागपूरच्या 'महालचा राजा' या गणेश मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत झांज व मर्दानी खेळांचे वैविध्यपूर्ण सादरीकरण केले.

**<u>सहकारनगर शाखा</u>**

शाखेने गणेशोत्सवात 'दहशतवाद विरुद्ध मी' हे पथनाट्य 'पद्मावती वसाहत' व 'तळजाई वसाहत' या दोन ठिकाणी सादर केले. या वेळी शाखेने 'आदर्श वर्धक' ही स्पर्धा घेतली. आदर्श वर्धक म्हणून 'शुभम् भायजे' याची निवड झाली.

**<u>स्वामी विवेकानंद शाखा</u>**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने ९ ठिकाणी अथर्वशीर्ष पठण व शाखेत १० दिवस दररोज २१ गणिते सोडविणे, २१ म्हणी सांगणे, २१ शब्दांचे स्पेलिंग पाठ करणे, २१ सूर्यनमस्कार घालणे, २१ सुविचार सांगणे, २१ वर्गमुळे-घनमूळ पाठ करणे इ. कार्यक्रम घेण्यात आले.

गणेशोत्सव काळात ३ दिवस 'संस्कृत-संभाषण-वर्ग' घेतला. संस्कृत भारतीचे श्री ओंकार जोशी यांनी मार्गदर्शन केले. कात्रण प्रकल्प- गणेशोत्सवाच्या १० दिवसामध्ये विविध वर्तमान पत्रांत आलेल्या गणेश देखाव्यांच्या फोटोंचे कात्रण काढून वहीत चिकटवून त्याचे प्रदर्शन मांडले होते.

गणेश पुराणातील १० प्रश्न दररोज मुलांना सांगण्यात आले.

५ सप्टें. शिक्षक दिनाच्या निमित्ताने हनुमान टेकडीवर १०५ वृक्षांची लागवड करून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी मुलांनी घेतली आहे.

४ सप्टें. रोजी मॉडेल कॉलनी येथील बायोगॅसवर चालणाऱ्या Power Plant ला भेट देण्यात आली. तेथे श्रेयाताईंनी मुलांना Plant ची संपूर्ण माहिती सांगितली. व या ठिकाणी तयार होणाऱ्या विजेवर पदपथावरील दिवे चालतात हे सांगितले.

**भारताचा भविष्यकाळ पुरूषांपेक्षा स्त्रियांच्याच कर्तृत्त्वावर अधिक प्रमाणात अवलंबून आहे असं स्वामींचं मत होतं.**

१५।११।१० : शाखेत वर्धकांचे गट पाडून नाट्य स्पर्धा व जाहिरात विडंबन स्पर्धा घेतली. याला मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

२१।११।१० : त्रिपुरी पौर्णिमेच्या निमित्ताने पाताळेश्वर मंदिरात दोन लाख दिवे लावण्याचा संकल्प केला होता. समस्ते हिंदू आघाडीने हा कार्यक्रम आयोजित केला होता. शाखेच्या ३५ मुलांनी यामध्ये भाग घेऊन पन्नास हजार दिवे लावण्यास मदत केली.

२७।११।१० : शाखेत एक दृक्श्राव्य व्याख्यान आयोजित केले. होते.
वक्ते - श्री. मिलिंद सबनीस विषय - राष्ट्रध्वजाची वाटचाल
व्याख्यानासाठी एकूण ७२ जण उपस्थित होते.

**स्वामी अभेदानंद शाखा**

ज्योत्स्नाताई तावडे यांनी मुलांना इंग्रजी सुधारण्यासाठी पुस्तके दिली व आपल्या घरी येऊन अभ्यास करण्यास मुलांना परवानगी दिली आहे.

शनिवारी व रविवारी मोठ्या गटासाठी संघाच्या दवाखान्यात अभ्यासिका सुरू केली आहे.

२६ सप्टें.ला श्री. विक्रांत दिघे यांनी वेळेचे नियोजन व दैनंदिनी कशी असावी, याबद्दल वर्धकांना मार्गदर्शन केले.

अयोध्या निकालाच्या पार्श्वभूमीवर श्री. विक्रांत दिघे यांनी अयोध्येबद्दल मुलांना सविस्तर माहिती दिली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने रविवारी चित्रकला व कोलाज कामाची स्पर्धा घेण्यात आली.

**स्वामी श्रद्धानंद शाखा**

५ सप्टेंबरला शाखेत शिक्षकदिन साजरा केला. ९ वी, १० वीचे वर्धक शिक्षक बनले. लहान वर्धकांनीही त्यांचा योग्य मान ठेवत या निमित्ताने भरपूर प्रश्न विचारून त्यांच्या 'शिक्षकपणाची' परीक्षा घेतली.

मुलांना गणपती उत्सवात विविध मंडळांचे देखावे दाखवून त्याप्रमाणे शाखेत सादरीकरणाची स्पर्धा घेण्यात आली. मुलांनी स्वत: नाट्यलेखन करून उत्तमरीत्या देखावे सादर केले. परिसरातील १६ मंडळांसमोर 'दहशतवाद' या राष्ट्रीय समस्येवर जागृती निर्माण करण्यासाठी प्रभावी पथनाट्ये सादर केली.

शाखेतील मुलांनी भगवत्‌गीतेचा १४वा अध्याय पाठ केला. शाखेत वृत्तपत्र समिती स्थापन केली आहे. शाखेत होणाऱ्या दररोजच्या घडामोडींचे वृत्त व पुढील नियोजनाचे वृत्त शाखेच्या 'श्रद्धानंद एक्सप्रेस' वृत्तपत्रात येते.

शाखेत पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली.

२४।११।१० शुभम् जगताप वेळेचे नियोजन

२८।११।१० ज्ञानेश पुरंदरे इस्राईल

०३।१२।१० सुनील गोडबोले नाट्य व चित्रपट क्षेत्र

मुलांना इतिहासाची गोडी लागावी, मुले कार्यरत राहावीत, त्यांच्या बुद्धीला चालना मिळावी म्हणून इतिहास विषयावर त्यांना रोज पाच प्रश्न दिले जातात व एक कोडे घातले जाते. दुसऱ्या दिवशी मुलांना

**विद्यार्थिजीवनाचे जे आदर्श या देशानं निर्माण केले आहेत तसे आदर्श इतर कुठल्याही देशानं निर्माण केलेले नाहीत.**

या प्रश्नांची उत्तरे व कोड्याचे उत्तर सांगितले जाते. पानिपत रणसंग्राम या प्रदर्शनास सर्व शाखांच्या मुलांनी भेट दिली.

**दीपत्कार :** न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर संस्कार भारतीच्या वतीने जुन्या नव्या अशा ३०० दिव्यांचे प्रदर्शन भरले होते. एकूण ४० मुलांनी या प्रदर्शनास भेट दिली.

**स्वामी सुबोदानंद शाखा**

शाखेत वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये लहान गटातील पाचवीतील समर्थ आढाव याचा प्रथम क्रमांक आला.

**ब्रह्मानंद शाखा :**

९ ऑगस्ट : 'क्रांतीदिन' साजरा केला. श्री. निलेश धायरकरांनी क्रांतीदिनाची माहिती सांगून हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली.

✻ ✻ ✻

## अथर्वशीर्ष पठण



*या वर्षी प्रथमच शारदामणी महिला विभागातर्फे पारगे चौकात सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम ऋषीपंचमीच्या दिवशी १२-९०-२०१० रोजी आयोजित केला होता. कार्यक्रमाला १०० च्या वर महिला उपस्थित होत्या. महिलांनी ११ वेळा गणपती अथर्वशीर्षाचे पठण केले. वातावरण फारच भारावून गेले होते. तेथील गणपती मंडळाच्या महिलांनी असा कार्यक्रम रोज गणपतीपुढे व्हावा अशी इच्छा व्यक्त केली व आज रोज अशा १०० च्या वर महिला जमून अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम सुरू आहे व दिवसागणित महिलांची संख्या वाढत आहे.*



✻ ✻ ✻

भारतीय स्त्रिया करू शकणार नाहीत असं एखादं तरी कार्य दाखवता येईल का, असं स्वामीजी विचारीत.

**शिबिर वृत्त :** वर्ष २०१० मध्ये शिबिरे खालील प्रमाणे संपन्न झाली.

| शाखा | शिबिर ठिकाण | शिबिराचा विषय | कालावधी | शिबिरार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| युवक विभाग | जनकल्याण विद्यालय हरंगुळ (जि. लातूर) | व्यक्तिमत्त्व विकास | १५ ते १९/४/१० | ८५ |
| भगिनी निवेदिता शाखा | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था पुणे | अभिव्यक्ती विकास | १६ ते २२/४/१० | ५५ |
| शाखा विभाग मोठा गट | शिशुविहार प्रशाला पुणे विद्यापीठ | पुण्याच्या समस्या आणि आपण करिअरनामा ८वी ते १२वी | २० ते २४/४/१० | ४० |
| वीर अभिमन्यू बालशाखा | सरस्वती विद्यामंदिर शाहू कॉलनी, कर्वेनगर | कलाकौशल्य | १९ ते २२/४/१० | ४० |
| शाखा विभाग लहान गट | शिशुविहार प्रशाला पुणे विद्यापीठ | थोरांचे बालपण | २५ ते २९/४/१० | २०० |
| भगिनी निवेदिता शाखा | शिशुविहार प्रशाला पुणे विद्यापीठ | भारतातील विविध प्रांतांची ओळख (पूर्वांचल, गुजरात, केरळ) | ८ ते ११/११/१० | ४० |
| शाखा विभाग भाग १ | वाघिरे विद्यालय सासवड | छोटा गट- भारतीय योद्धे मोठा गट- युद्ध व युद्धशास्त्र | ८ ते ११/११/१० | १२५ |
| शाखा विभाग भाग २ | छत्रपती शिवाजी विद्यालय, पौड | छोटा गट- निसर्ग विश्व मोठा गट- आदर्श व्यक्तिमत्त्व | १० ते १५/११/१० | १२५ |

**स्फूर्ती देणं, त्यांची श्रद्धा बळकट करणं आणि त्यांना नवीन दृष्टी देणं हे कार्य स्त्रीयाच करतात.**

| शाखा | शिबिर ठिकाण | शिबिराचा विषय | कालावधी | शिबिरार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| सिंधुदुर्ग | मालवण | थोरांच्या कथा | २० ते २१/११/१० | १०० |
| शाखा विभाग भाग ३ | दांगट हायस्कूल वडगाव, पुणे | छोटा गट- कला<br>मोठा गट- क्रिडा | ८ ते ११/११/१० | १०० |
| वीर अभिमन्यू बालशाखा | प्राथमिक विद्यालय मौजे शेरेगाव, पुणे | बालगीते व अभिनय | १२ ते १५/११/१० | ३५ |

## हिवाळी शिबिरामध्ये झालेली व्याख्यान सत्रे

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| ❖ **भगिनी निवेदिता शाखा शिबिर** | |
| श्री. शशिधर पुरुषोत्तम भावे | पूर्वांचल प्रांत |
| श्री. एन्. पी. राजन | केरळ प्रांत |
| श्री. यशवंतराव लेले | भारतीय सण समारंभ व भारतीय संस्कृती |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | रामजन्मभूमी |
| श्रीमती आशाबेन ठक्कर | गुजरात प्रांत |
| ❖ **भाग १ शिबिर-सासवड** | |
| कर्नल (नि.) साळुंखे | उद्‌घाटन सत्र |
| श्री. अशोक ओव्हाळ | |
| श्री. मिलिंद सबनीस | वीर पांड्य कट्टबोम्मन |
| श्री. न. म. जोशी | महाराणा प्रताप |
| श्री. विद्याधर रायरीकर | शिवरायांचे युद्धशास्त्र |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | रामजन्मभूमी मुक्ती संग्राम |
| श्री. प्रकाश दामोदरे | श्री. छ. शिवाजी महाराज व गुणवंत मावळे |
| श्री. सुनील कुलकर्णी | आधुनिक युद्धशास्त्र (स्लाईड शो) |
| श्री. श्रीनंद बापट | पानिपतचे युद्धशास्त्र |
| श्री. पराशर मोने | राजा छत्रसाल |

**स्त्रीच्या तपस्येवरच घर उभं असतं.**

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| श्री. मिलिंद एकबोटे | प्रतापराव गुजर व गोरक्षण (गोसेवा) |
| कर्नल (नि.) अनिल आठले | स्वातंत्र्योत्तर भारतीय युद्धे |
| **❖ भाग २ शिबिर-पौड** | |
| सौरभ कर्डे | छ. शिवाजी- एक आदर्श |
| ज्ञानेश पुरंदरे | १) भगिनी निवेदिता<br>२) आयुष्य एक युद्ध |
| मोहन शेटे | श्रीराम व श्रीकृष्ण :<br>भारतीय आदर्शाची प्रतिके |
| शिरीष पटवर्धन | किशाभाऊ पटवर्धन |
| गणेश पवार | स्वा. सावरकर |
| मेदिनी डिंगरे | पक्षीविश्व |
| आदित्य पोंक्षे | प्राणीविश्व |
| नरेंद्र पितळे | पर्यावरण |
| शौनक गायधनी | आर्य चाणक्य |
| अमोल उंदरे | प्रेरणासत्र |
| सबनीस सर | वंदे मातरम् |
| अवचट मॅडम | उद्‌घाटन सत्र |
| दत्तात्रय शेडगे | समारोप सत्र |
| मंदार परळीकर | आपली लोककला |
| **❖ भाग ३ शिबिर-वडगाव** | |
| श्री. राहूल सोलापूरकर | उद्‌घाटन सत्र |
| श्री. विकास (नाना) दांगट पाटील | |

## श्री गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठापना वर्ग

'स्व'-रूपवर्धिनीने ज्ञानप्रबोधिनीच्या संत्रिका विभागाशी समन्वय साधून गणेशमूर्ती प्रतिष्ठापना कार्यशाळा घेतली. ६ व ७ सप्टेंबर या दोन दिवसात पुस्तिकेच्या सहाय्याने मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना कशी करावी, त्याचे विधी, पूजेचे साहित्य याचे प्रशिक्षण दिले. या दोन दिवसात १०० जणांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. इ. ८ वी पासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांची उपस्थिती होती. घरातील/सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना विविध जातीधर्माच्या व्यक्तींच्या हस्ते करण्याचा पायंडा या वर्गामुळे पाडला गेला. ❖❖❖

**प्रत्येक भारतीय गृहिणी म्हणजे एक शांत व अबोल तपस्विनी असते.**

| वक्त्याचे नाव | विषय |
|---|---|
| श्री. अरविंद केळकर | लहान गट - कृतिसत्र (ओरीगामी) |
| श्री. श्रीकांत यादव | अभिनय कौशल्य |
| श्री. ज्ञानेश पुरंदरे | भगिनी निवेदिता |
| कु. आरती बाळ | व्हायोलीनवर देशभक्तिपर गीते |
| श्री. विनायक रायकर | मोठा गट - आहार व आरोग्य |
| श्री. मोहन शेटे | प्रेरणासत्र- पानीपतचा रणसंग्राम |
| शाहीर हेमंत मावळे | लोककला |
| श्री. जयंतराव कवठेकर | सूर्यनमस्काराचे महत्त्व |
| श्री. चंद्रकात भोसले | प्रेरणासत्र- माझी जडणघडण |
| ❖ **बालशाखा शिबिर-शेरे** | |
| उद्घाटन | मौजे शेरेगावचे सरपंच श्री. सुरेश तिकोने ग्रामसेवक- श्री. सागडे व सदस्य- श्री. चंद्रकांत ढमाले. वक्ते : श्री. ज्ञानेश पुरंदरे |
| श्री. निलेश धायरकर व किशोर बेलोसे | छोट्या छोट्या गोष्टी, बडबडगीते व कोकणी पद्य |
| श्री. श्रीकांत यादव | पंचेंद्रियांची ओळख - महत्त्व व उपयोग त्या आधारावर खेळ घेतले. तसेच सात शेपटीचा उंदीर- गोष्ट सांगितली व मुलांनी त्यावर नाटिका केली. |
| समारोप- श्री. शिरीष पटवर्धन | अंगाईगीत ते पोवाडा |

## २६।११ च्या स्मृती...

पार्श्वभूमीवर श्री. विक्रांत दिघे यांच्या उपस्थितीत मुंबई बॉंबस्फोट हल्ल्यातील मृतांना सामुदायिक श्रद्धांजली वाहण्यात आली. स्मृती-दिनानिमित्त शहिदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी भगिनी निवेदिता शाखेतील मोठ्या गटाच्या मुली परिसरातील समर्थ पोलिस स्टेशनमध्ये गेल्या. तेथे त्यांनी श्रद्धांजली वाहून देशभक्तीपर पद्ये सादर केली. पार्श्वभूमीवर शाखेत शहिदांना श्रद्धांजली वाहून देशभक्तीपर गीते म्हटली. विजय धोत्रे यांनी त्यावेळच्या परिस्थितीचे वर्णन पुन्हा एकदा मुलांच्या समोर मांडले.

**भारतात धर्मरक्षणाला शतपटीनं अधिक हातभार श्रद्धामय व परिपूर्ण जीवन जगणाऱ्या गृहिणींनी लावला आहे.**

# वर्धापनदिन कार्यक्रम

## रामकृष्ण शाखा वर्धापन दिन

१३ मे हा वर्धिनीचा स्थापना दिन. यावर्षी वर्धिनीला ३१ वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने एक कार्यक्रम १३ मे रोजी संपन्न झाला. कोणताही औपचारिक कार्यक्रम न करता वर्धिनीचे हितचिंतक, स्नेही, व्यावसायिक युवक-युवती अशा सर्वांचे सहकुटुंब मिलन असे कार्यक्रमाचे स्वरूप होते. ज्ञानप्रबोधिनीचे संचालक मा. गिरिशराव बापट यांच्या हस्ते ओम कार पूजन होऊन कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. आलेल्या सर्वांच्या अनौपचारिक गप्पा रंगल्या. वर्धिनीची वाटचाल दाखवणारी एक प्रदर्शनी यावेळी लावण्यात आली होती तसेच वेगवेगळ्या प्रसंगातील फोटो, व्हिडिओ फिल्म यांचा समावेश असलेली एक छोटी डॉक्युमेंटरीही प्रदर्शित केली होती. रामकृष्ण शाखेच्या वर्धकांनी रोवलेल्या खांबावरील आणि दोरीवरील मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थित सर्वांची वाहवा मिळविली. थंड पन्ह्याचा आस्वाद घेत रंगलेल्या गप्पांनी कार्यक्रमात खरा रंग भरला. विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

## योगानंद शाखा वर्धापनदिन

रविवार दि. २८ नोव्हेंबर रोजी स्वामी योगानंद शाखेचा १३ वा वर्धापनदिन नवीन मराठी शाळेच्या सभागृहात संपन्न झाला. यानिमित्ताने बागेश्रीदीदींचे मार्गदर्शन पालक व वर्धकांना लाभले. वर्धिनीच्या 'विकसित व्हावे-अर्पित होऊनी जावे' या ध्येयवाक्याची उकल करताना समाजप्रश्नांना भिडणाऱ्या अनेक उमद्या व्यक्तिमत्त्वांची कथानके त्यांनी मांडली. चार बोटांत अंगठ्या घालणारे पण मनगटातील ताकद विसरलेले तरुण वर्धिनीच्या संपर्कात आल्यास समाजकार्यी लागतील असा विश्वास त्यांनी जागविला. नोबेल पारितोषिक विजेते महंमद युनूस, गडचिरोलीच्या जिल्हाधिकारी सौ. किरण मुसळे यांच्या ध्येयवादी कथांमधून खूप प्रेरणादायी विचार वर्धक-युवकांना मिळाले. 'जर हृदय पेटलेले असेल, तार छेडलेली असेल तर कोणत्याही रेडिमेड इंजेक्शनची गरज नाही.' या कै. किशाभाऊ पटवर्धन सरांच्या शब्दांनी त्यांनी भाषणाचा शेवट केला. असे ओघवते विचार मांडण्यासाठी बागेश्री दिदींनी वारंवार यावे असा प्रेमळ आग्रह सर्व पालकांनी केला.

## स्वामी विवेकानंद शाखा वर्धापन दिन

४ जुलै रोजी हा कार्यक्रम झाला. ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. उपस्थित वर्धक, युवक कार्यकर्ते व पालक यांच्याशी बोलताना श्री. बलकवडे यांनी स्वामी विवेकानंदांच्या स्मृतीदिनाचा संदर्भ घेत, स्वामीजींचे कार्य, सर्वधर्म परिषद या संदर्भातील त्यांचे विचार व्यक्त केले. ज्या हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून स्वामीजी या परिषदेसाठी उपस्थित होते, त्या धर्माची परंपरा किती श्रेष्ठ आहे, हे सांगत त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आदि संतांनी केलेले कार्य, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेले कार्य अत्यंत परिणामकारकरित्या मांडले.

विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यातील किमान काही वर्षे देशासाठी, समाजासाठी जाणीवपूर्वक द्यायला

**आपल्या हृदयात अनुकंपा निर्माण झाल्यास आपल्याला आपल्या बांधवांची व देशाची दुःख समजतील.**

हवीत. या कार्यक्रमाला वर्धक, युवक, पालक असे एकूण २०० जण उपस्थित होते.

**ब्रह्मानंद शाखा वर्धापन दिन**

१ ऑगस्ट रोजी वर्धापन दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. डॉ. सतीश राजमाचीकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. वर्धापन दिनाच्या निमित्ताने शाखेच्या ब्लॉगचे पाहुण्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.
(www.bramhanand shakha.blogspot.com)

डॉ. सतीश राजमाचीकर यांनी मार्गदर्शन करताना सध्या एम.आय.टी. विद्यालयात शिकत असलेल्या शशांक दुबे नावाच्या एका धडपड्या मुलाची गोष्ट सांगितली. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने शशांकने लहान वयातच शिकता शिकता घरासाठी छोटा व्यवसाय करून पैसे मिळवले. परिस्थिती कशीही असली तरी स्वाभिमान, कष्ट, धडपडी स्वभाव याच्या बळावर माणूस जीवनात यशस्वी होतो असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

प्रमुख अतिथींच्या हस्ते शाखेतील खालील वर्धकांचा गौरव करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| उत्कृष्ट खेळाडू वर्धक | (लहान गट) | मुरली गायकवाड |
| | (मोठा गट) | प्रतिक जाधव |
| उत्कृष्ट अभ्यासु वर्धक | (लहान गट) | शंकर कुमावत |
| | (मोठा गट) | सुरज नागटिळक |
| उत्कृष्ट वर्धक | | अमोल गोरे |

**स्वामी सुबोदानंद शाखा**

९ ऑक्टोबर हा सुबोधानंद शाखेचा वर्धापन दिन शाखेने आपला १६ वा वर्धापन दिन धन्वंतरी सभागृहात जुन्या नव्या युवकांच्या सहाय्याने पार पाडला. कार्यक्रमाची सरुवात राहूल पायगुडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गायलेल्या पोवाड्यांनी झाली. कार्यक्रमासाठी मा. श्री. श्रीकांत भानू प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते. श्री. कवठेकर सरांनी प्रास्ताविकाच्या माध्यमातून वर्धिनीची ओळख करून दिली. श्री. भानू यांनी उदाहरणे देऊन पालकांची भूमिका व ते कार्यरत असलेल्या ISRO साठीच्या संशोधन कार्याची माहिती करून दिली.

**स्वामी दयानंद शाखा वर्धापन दिन**

रविवार, दिनांक १८ जुलै रोजी शाखेचा वर्धापन दिन संपन्न झाला. ब्रिगेडिअर श्री. हेमंत महाजन (निवृत्त) हे कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाला विद्यार्थी, युवक व पालक मिळून २०० जण उपस्थित होते. या प्रसंगी ब्रिगेडिअर महाजन यांनी स्लाईड्सच्या माध्यमातून सैन्यदल देशाच्या सीमांचे रक्षण कसे करते, घुसखोरी करणाऱ्या अतिरेक्यांशी सामना कसा करते? महाराष्ट्रातील सैनिकांनी, अधिकाऱ्यांनी प्राप्त केलेले शौर्य पुरस्कार या विषयी माहिती सांगितली. कारगिल युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या, त्याने गाजवलेल्या पराक्रमाबद्दल मरणोत्तर अशोकचक्र प्राप्त झालेल्या त्यांच्या तुकडीतील विजयन थापर या सैनिकाची कथा त्यांनी सांगितली म्हणून सध्या सैन्यदलात भरती होऊन सीमेवर काम करणे हे अधिक सुरक्षित आहे.

**मातृभूमीनं आपल्याला जन्म दिला, अन्नपाणी दिलं. मित्र दिले, सुहृद दिले आणि तिनंच आपल्याला जीवनविषयक श्रद्धा दिल्या, ही आपली खरोखरची माता नव्हे का?**

# क्रीडादिन

दि. १७।१२।२०१० शुक्रवार रोजी 'स्काऊट ग्राऊंड' पुणे येथे 'स्व'-रूपवर्धिनीच्या शाखा विभागाचा 'क्रीडादिन' साजरा करण्यात आला. या वेळी धावणे, लंगडी, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, योगासने यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व शाखांची मिळून ६०० वर्धक व युवक या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते.

या स्पर्धांचे उद्‌घाटन न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड शाळेचे क्रीडा शिक्षक श्री. रामकृष्ण चिंचकर सर यांच्या हस्ते झाले. यावेळी सर्व मुलांनी खिलाडू वृत्तीने खेळण्याची शपथ घेतली.

या स्पर्धेत खालील शाखांतील वर्धकांना बक्षिसे मिळाली.

**योगासन स्पर्धा :**

| | | | |
|---|---|---|---|
| इ. ५ वी | पश्चिमोत्तानासन | समर्थ आढाव | सुबोधानंद शाखा |
| इ. ६ वी | शिर्षासन प्रकार | अनिकेत शिंदे | राजर्षी शाहू महाराज |
| इ. ७ वी | वीरभद्रासन | ओंकार कदम | अभेदानंद शाखा |
| इ. ८ वी | आकर्ण धनुरासन | चैतन्य कांबळे | श्रद्धानंद शाखा |
| इ. ९ वी | चक्रासन | आकाश सूर्यवंशी | अखंडानंद शाखा |
| इ. १० वी | सर्वांगासन | चेतन चोरडीया | दयानंद शाखा |
| युवक | धनुरासन | मयुर देशमुख | दयानंद शाखा |

**धावणे :**

| | | |
|---|---|---|
| इ. ५ वी | अल्ताफ शेख | शिवानंद शाखा |
| इ. ६ वी | अतीश थोरात | सुबोधानंद शाखा |
| इ. ७ वी | सागर धुलप | अभेदानंद शाखा |
| इ. ८ वी | श्रीतेज दिघे | अभेदानंद शाखा |
| इ. ९ वी | हर्षल खैरनार | अभेदानंद शाखा |
| इ. १० वी | हरिश्चंद्र मिसाळ | रामकृष्ण शाखा |
| युवक | विपुल शेलार | अभेदानंद शाखा |

**सांघिक :**

| | |
|---|---|
| लंगडी | बालशाखा |
| खो-खो | राजर्षी शाहू महाराज शाखा |
| कबड्डी | स्वामी अखंडानंद शाखा |
| युवक कबड्डी | समर्थ रामकृष्ण शाखा |
| युवक व्हॉलीबॉल | स्वामी विवेकानंद शाखा |

विशेष सहभागाबद्दल वीर अभिमन्यू बालशाखेस गौरविण्यात आले. स्पर्धेचा बक्षीस समारंभ - कटारिया हायस्कूलमधील क्रीडा शिक्षक श्री. हर्षल निकम यांच्या हस्ते झाला.

**या आपल्या मातृभूमीला 'महा-भारत' या रूपात पुन्हा पाहायला आपल्याला आवडणार नाही का?**

## शारदामणि महिला विभाग

### बालवाडी व बालशाखा वृत्तांत

**संक्रांत उत्सव-२०१०**

दि. ७ जानेवारी रोजी हा कार्यक्रम संपन्न झाला. बालनाट्य चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. प्रकाश पारखी हे प्रमुख अतिथी म्हणून तर सौ. सुनंदाताई खानापूरकर या अध्यक्ष या नात्याने उपस्थित होत्या. बालवाडी व बालशाखेच्या छोट्या मुलामुलींनी सादर केलेल्या कार्यक्रमाचे कौतुक करीत श्री. पारखी यांनी आपल्या अनुभवातून पालकांना सल्ला दिला की मुलांचे म्हणणे शांतपणे ऐका, त्यांना वेळ द्या. अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना सौ. सुनंदाताईंनी एका मजेदार गोष्टीतून चिमणीताईची आपल्या पिलांना वाढवण्यासाठी चालू असलेली धडपड सांगितली.

### लग्न बाहुला-बाहुलींचे

लग्न समारंभात लहान मुले ही दुर्लक्षित राहतात आणि त्यांच्या मनात तर लग्नसमारंभाविषयी प्रचंड कुतूहल असते. मोठ्या माणसांच्या गर्दीतून वाट काढत हे चिमुकले डोळे लग्नाचे विधी पाहत असतात. मुलांच्या मनातील हे कुतूहल लक्षात घेऊन हा लग्न सोहळा एक वर्षाआड वर्धिनीत संपन्न होतो. नवरदेवाची वरात, मंगलाष्टके, रुखवत लग्नातील ह्या सगळ्या गोष्टींचा आनंद बालवाडीमधील २०० मुलामुलींनी लुटला. कोणी मुलाकडचे होते तर कोणी मुलीकडचे. नटून थटून या बालचमूंनी लग्नसमारंभाची मजाही लुटली आणि लग्नाच्या जेवणाचीही.

### बालचमूंची दिंडी

प्रतिवर्षी आषाढी एकादशीला पाकोळी बालवाडी आणि वीर अभिमन्यू बालशाखेतील छोटे छोटे वारकरी 'स्व'-रूपवर्धिनी ते कण्वाश्रम अशा मार्गाने दिंडी घेऊन जातात. वारकऱ्यांच्या आणि संतांच्या वेषभूषेत आलेले वारकरी आणि संत, सर्व नागरिकांचे आकर्षणाचा विषय असतात. ''ग्यानबा तुकाराम आणि ज्ञानोबा माऊली तुकाराम'' असा जयघोष करीत ही दिंडी गोल रिंगण, फुगड्या आणि सर्व पारंपारिक खेळ करीत कण्वाश्रमात पोहोचली. मंदिरामध्ये बालवाडीच्या शिक्षकांनी 'अजि म्या देखिली पंढरी' यावर पाऊल भजन केले तर बालशाखेतील पायल आणि अनिकेत या दोघांनी 'स्वच्छता' या विषयावर छोटे कीर्तन सादर केले त्यामध्ये प्लॅस्टिकच्या पिशव्या वापरू नयेत असा संदेशही दिला. या भक्तिमय सोहळ्याची सांगता श्री. विठ्ठलाच्या आरतीने झाली.

पाकोळी बालवाडीने नागपंचमी, रक्षाबंधन दहीहंडी हे सण पारंपरिक पद्धतीने साजरे केले. सर्व मुलांच्या हातावर मेहेंदी काढली व ताईंनी नागांचे, सापांचे वारूळ शाळेत तयार करून मुलांना नागांच्या गोष्टी सांगितल्या. रक्षाबंधनाचा कार्यक्रम २३ ऑगस्टला साजरा केला.

दहिहंडी तर सर्वांचा आवडीचा सण. मुले गोप-गोपिका कृष्णाच्या वेशभूषेत आली होती. त्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. प्रभातफेरी शाळेत आल्यावर 'बांधा उखळाला' हे अभिनय गीत सादर केले. नंतर दहीहंडी मुलांनी उत्साहाने एकमेकांच्या खांद्यावर चढून कृष्णाच्या वेशात आलेल्या मुलाने हंडी फोडली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पुण्यातील मानाच्या चवथ्या गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत बालशाखेचे पथक सामील झाले होते. यावर्षी त्यांनी टिपरी पथक तयार केले होते.

**पुन्हा एकदा धर्मसंस्थापना होऊन सारा भारत देश एक होईल.**

या बालशाखेच्या टिपरी पथकाने बेलबाग चौक ते अलका टॉकीज चौक अशा संपूर्ण लक्ष्मी रोडवरील प्रेक्षकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते. प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना मिळाला. मुलांनी अगदी दमलेले असतानासुद्धा मिरवणूक जिद्दीने पार पाडली.

मोठ्या गटातील मुलांकडून अथर्वशीर्ष पाठ करून घेतले. मग ही मुले मंगल मित्र मंडळ, दत्त मित्र मंडळ या गणपती मंडळांपुढे अथर्वशीर्ष म्हणण्यास गेली होती.

५, ६, ७ ऑक्टोबरला तीन दिवस बालवाडीच्या प्रत्येक गटाने एक-एक दिवस भोंडला केला. गोलामध्ये हत्तीची प्रतिमा ठेवून मुलांनी फेर धरला व शिक्षिकांनी भोंडल्याची गाणी म्हटली.

१६ तारखेला बालवाडीच्या मुलांनी सरस्वती पूजन केले. वर्धिनीने मुलांसाठी नव्या पाट्या आणल्या आहेत. शिक्षकांनी मुलांकडून सरस्वती पूजन व पाटीपूजन करून घेतले.

दिवाळीची सुट्टी लागणार असल्यामुळे त्यांनी २९ ला वर्धिनीमध्ये दिवाळी साजरी केली.

## डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रम

**(पाणपोई उपक्रम)**

गेल्या २० वर्षापासून हा उपक्रम वर्धिनीमार्फत चालविला जातो. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करायला हजारो नागरिक बंधु भगिनी येत असतात. एप्रिलच्या रणरणत्या उन्हात येणाऱ्या या बांधवांना पाणी देण्याची सेवा वर्धिनीचे विद्यार्थी करीत असतात. भगिनी निवेदिता शाखा व आजोळ प्रकल्पाच्या ४० वर्धिका आणि सहाय्यक परिचारिका अभ्यासक्रमाच्या पौड येथील विद्यार्थिनींनी या वर्षी ही जबाबदारी सांभाळली.

पाणपोईचे उद्घाटन पुणे महानगरपलिकेच्या शिक्षण मंडळाचे सदस्य श्री. मिलिंद कांबळे यांच्या हस्ते झाले. दिवसभर चाललेल्या या पाणपोईची सेवा ७५२० नागरिक बंधु-भगिनींना देण्यात आली. पाण्याबरोबरच एक मोगऱ्याचे फूल आणि पूजनीय बाबासाहेबांच्या प्रेरणादायी विचार असलेले एक स्टिकर प्रत्येकाला देण्यात आले.

## रक्तदान शिबिर

भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्ताने जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने संपन्न झालेल्या रक्तदान शिबिरामध्ये ११४ रक्तपिशव्या रक्त संकलित करण्यात आले. अमोल कुसुरकर आणि सिद्राम शासम यांनी या शिबिराच्या व्यवस्थेचे काम पाहिले.

## शिक्षिकांसाठी प्रशिक्षण वर्ग

बालवाडी विभागातील शिक्षिकांसाठी बालवाडीचे वर्ग सुरू होण्यापूर्वी जून महिन्यात प्रशिक्षण वर्ग संपन्न झाला. या वर्गामध्ये सर्व शिक्षिकांना पुढील वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

| वक्ते | विषय |
|---|---|
| संध्याताई साबणे | गोष्ट कशी सांगावी. |
| सुरेखाताई पेंडसे | आदर्श बालवाडी शिक्षिका |
| श्रीधरपंत फडके | गप्पागोष्टी |
| उमाताई गुजर | नियोजन |
| शाहीर हेमंत मावळे | पोवाडा |
| डॉ प्रदीप आगाशे | सोपे शिक्षण |
| मेघाताई राऊत | फलक सुशोभन |

**देश हे एकच सध्या जागृत दैवत आहे.**

**महिला विभाग : संक्रांत उत्सव**

गुरुवार दि.२८ जानेवारी रोजी डॉ. आंबेडकर सांस्कृतिक भवनामध्ये कार्यक्रम संपन्न झाला. सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सिंधूताई सपकाळ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. उद्योग प्रशिक्षण, बचतगट, साक्षरता वर्ग, बालवाडी अशा सर्व विभागातील कार्यकर्त्या व विद्यार्थिनी यांनी याप्रसंगी प्रसंगनाट्ये, नृत्ये सादर केली. अध्यक्षपदावरून मार्गदर्शन करताना सिंधूताईंनी स्वत:च्या आयुष्यातील दु:खद प्रसंग सांगत स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या कष्टांचा उल्लेख केला. असे कष्ट सोसणाऱ्या स्त्रीचे स्थान हे सायकलच्या मागच्या चाकासारखे असते असे सांगून त्या म्हणाल्या की जसे सायकलचे सीट, वाहून न्यायचे ओझे, सायकल पुढे जाण्यासाठी असलेली चेन या साऱ्या गोष्टी सायकलच्या मागच्या चाकाशी जोडलेल्या असतात तसंच स्त्रीचं आयुष्य आहे. संसाराचे सारे ओझेही तिनेच सहन करायचे आणि संसार सुरळीत चालू राहील याचीही काळजी घ्यायची. असं जीवन जगावं लागणाऱ्या स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनी जे काम करीत आहे ते खूप मोलाचे आहे.

## गणेश चतुर्थी



या वर्षी गणेश चतुर्थी निमित्त ४ सार्वजनिक मंडळांच्या गणेश प्रतिष्ठापना मिरवणुकीत वर्धिनीची पथके सहभागी झाली होती. वीर अभिमन्यु शाखेचे अत्यंत उत्साहपूर्ण असे टिपरी पथक पूर्व भागात सर्वांच्याच कौतुकाचा विषय ठरले. 'झांज पथकांनी' दणकेबाज खेळ करत पौराणिक, ऐतिहासिक व राष्ट्रभक्तीपर प्रसंग सादर केले. स्वामी दयानंद शाखेच्या मर्दानी खेळांनी लाठीकाठी, तलवारबाजी व दांडपट्टा यांचे उत्कृष्ट प्रदर्शन लष्कर भागात घडवले. भगिनी निवेदिता शाखेच्या मुलींच्या ध्वज पथकाने शिवाजी रस्त्यावर आगळेच तेज प्रकट केले.

## पथनाट्य

या वर्षी वर्धिनीच्या चार शाखांनी सांस्कृतिक विभागाच्या अंतर्गत पथनाट्ये बसविली होती. एकूण चार शाखांनी केलेल्या या पथनाट्यांत १२० मुलांचा सहभाग घेतला होता त्यांचे विषय पुढीलप्रमाणे :

१) दहशतवाद, देशाची सुरक्षा आणि मी २) जागृती (भ्रष्टाचार, महागाई, दहशतवाद या समस्यांची मांडणी) स्वामी अखंडानंद, स्वामी श्रद्धानंद, राजर्षी शाहू महाराज व सहकारनगर शाखा यांचा यात सहभाग होता. एकूण १५० ठिकाणी पथनाट्य सादर केली. महात्मा फुले पेठ, गुरुवार पेठ, स्वारगेट, सारसबाग, बिबवेवाडी, कर्वेनगर, शाहू कॉलनी, सहकारनगर इ. ठिकाणी पथनाट्ये झाली. यंदाची पथनाट्य ही दरवर्षी प्रमाणे ध्वनिमुद्रित नसून पूर्णत: तोंडी करायची असल्याने मुलांचे कसब पणाला लागले व अभिनयातील नैपुण्य दिसून आले.

**यापुढील इतिहासात तरुणांनाच प्रमुख भूमिका बजावायची आहे.**
**सर्व भारत हा तुमचा देश आहे आणि तुमच्या नितांत परिश्रमाची त्याला गरज आहे.**

## सहाय्यक परिचारिका अभ्यासक्रम -

### सुदृढ बालक स्पर्धा

शून्य ते तीन वयोगटातील बालकांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. परिक्षणाच्या कामाला सौ. मेघा नगरे यांचे साह्य मिळाले. एक गोष्ट या निमित्ताने जाणवली ती म्हणजे कमी शिक्षण झालेल्या महिलाही आपल्या बाळाची काळजी उत्तम घेत आहेत. महिला दिनाच्या दिवशी म्हणजे ८ मार्च रोजी या स्पर्धेचा बक्षिस समारंभ झाला. स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक बाळाला बक्षिस देण्यात आले. स्पर्धेत ज्यांचे वयोगटानुसार पहिले तीन क्रमांक आले त्यांना विशेष बक्षिसे देण्यात आली. बक्षिस समारंभ डॉ. विनेश नगरे यांच्या हस्ते करण्यात आला.

### निवासी शिबिर

२० व २१ मार्च या कालावधीत या अभ्यास-क्रमातील विद्यार्थिनींसाठी एक निवासी शिबिर घेण्यात आले. शिबिर प्रमुख म्हणून सौ. लताताई सत्तुर यांनी काम पाहिले तर या अभ्यासक्रमाच्या अन्य शिक्षिकांनी बाकी सर्व व्यवस्था सांभाळल्या. एकूण १२५ मुली या शिबिराला उपस्थित होत्या. वर्षाताई हुपरीकर त्यांनी केला.

शिबिरात खालील विषयांवर शिबिरार्थी मुलींना मार्गदर्शन करण्यात आले.

**रक्तदानाचे महत्त्व आणि महिलांचे आरोग्य... :** डॉ. कांबळे (जनकल्याण रक्तपेढी)

**कुष्ठरोग आणि स्वाईन फ्लूची लक्षणे आणि घ्यावयाची काळजी (सदीप व्याख्यान) :** डॉ. जोशी

**माहिती अधिकाराचा कायदा आणि स्त्रियांचे हक्क :** श्री. विवेक वेलणकर (सजग नागरिक मंच)

**ॲनेमिया-लक्षणे व घ्यावयाची काळजी :** डॉ. सौ. वैदेही नगरकर

**ओळख अंक्टार्टिका खंडाची (सदीप व्याख्यान) :** श्री. सुहास काणे

### प्रशस्तिपत्र प्रदान कार्यक्रम

भारती विद्यापीठाच्या पेडियाट्रिक्स विभागाचे प्रमुख डॉ. संजय ललवानी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. अभ्याक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या एकूण ४० विद्यार्थिनींना या प्रसंगी अतिथींच्या हस्ते तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री. उदयराव गुजर यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली. दुर्गम खेड्यांमधून, वेगवेगळ्या अडचणींचा सामना करीत हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थिनींचे कौतुक करीत डॉ. ललवानी यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.

वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. गुजर यांनीही मुलींशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहन दिले. प्रास्ताविक श्रीमती पुष्पाताई नडे यांनी तर समारोप श्री. शिरीष पटवर्धन यांनी केला.

सप्टेंबर-ऑक्टोबर २०१० ची १ बॅच पूर्ण झाली. या तुकडीत पौड, वेल्हा व येरवडा शाखेच्या एकूण ४५ मुलींनी हा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. त्यांना दिनांक १६-११-२०१० मंगळवार रोजी प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. यातील ९०% मुलींना लगेचच नोकऱ्या मिळाल्या आहेत. वर्धिनीच्या श्रीमती पुष्पाताई नडे यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

**ज्ञान आणि शरीरसामर्थ्य यांच्यासाठी झगडा.**

२४ ऑगस्टला रक्षाबंधनाचा कार्यक्रम झाला. मुली व शिक्षिका रेल्वेस्टेशनवर गेल्या होत्या. तेथील हमाल- बंधूंना व पार्सल ऑफीसमधील कर्मचाऱ्यांना राख्या बांधल्या.

सध्या वर्धिनीची होमनर्सिंग वर्गाची को-ऑर्डीनेटर कु. अमृता फाले ही कर्वे इन्स्टिट्यूटमधून GNM चा कोर्स पूर्ण करत आहे. तर वर्धिनीच्या सांगण्यावरून श्रीमती वीरश्री वानखेडे व अर्चना भोसले ह्या अझम कॅम्पसमधून ANM चा कोर्स करीत आहेत. त्यांना वर्धिनीमुळे नोकरी करत कोर्स पूर्ण करण्याची परवानगी मिळाली आहे. श्रीमती वैशाली जाधवसुद्धा ANM चा कोर्स करीत आहे.

## WE-MEET - A National Conference for Women

दिनांक २४ ते २६ सप्टेंबर या ३ दिवसांच्या कालावधीत पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजच्या मैदानावर बँक ऑफ महाराष्ट्रच्या सौजन्याने महिलांसाठी एक परिषद भरविली होती. या परिषदेत महाराष्ट्रातून अनेक स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या होत्या. 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या प्रतिनिधींना या परिषदेत भाग घेण्याची संधी मिळाली. या परिषदेचे उद्‌घाटन सामाजिक-राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्या श्रीमती स्मृती इराणी यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती क्षमा म्हेत्रे उपस्थित होत्या. वर्धिनीतर्फे सौ. लता सत्तुर यांनी पॉवर पॉईंटच्या साहाय्याने 'होम नर्सिंग' (सहाय्यक परिचारिका वर्ग) या अभ्यासक्रमाविषयी व त्याच्या उपयुक्ततेविषयी अत्यंत प्रभावीपणे सादरीकरण केले.

## बचत गट विभाग

## 'स्व'रूपवर्धिनी व सेवा सहयोग आयोजित उद्योजकता प्रशिक्षण शिबिर

**(दि. ११ ते २२ एप्रिल २०१०)    एकूण उपस्थिती  १६८**

| संस्थेचे नाव | उपस्थिती |
|---|---|
| भारतीय स्त्री शक्ती | ५८ |
| सुराज्य | ३ |
| मूक बधीर विद्यालय | १ |

| संस्थेचे नाव | उपस्थिती |
|---|---|
| स्वरूपवर्धिनी | ८१ |
| रेणुका स्वरूप | ४ |
| नागर विकास | १३ |

**प्रशिक्षण विषयानुसार सहभागी महिलांची संख्या**

| प्रशिक्षण विषय | सहभागी संख्या |
|---|---|
| केटरिंग | ११४ |
| कापडी बॅग्ज | १२१ |
| ज्वेलरी | १२४ |
| चॉकलेट | १३५ |

| प्रशिक्षण विषय | सहभागी संख्या |
|---|---|
| ज्यूट बॅग | ११२ |
| मशीन एम्ब्रॉ. | ११७ |
| कॅन्डल | ११९ |
| ३ डी आर्ट | ११६ |

**सुख आणि समृद्धी यासाठी घाम गाळायला शिका.**

**प्रशिक्षण कार्यक्रम पत्रिका**

| दिनांक | वेळ | प्रशिक्षक | प्रशिक्षण विषय |
|---|---|---|---|
| ११/४/२०१० | १.०० ते ५.०० | कांचनताई/ | मशीन एम्ब्रॉयडरी |
| | | अर्चना वाटवे | जुन्या साड्यांपासून पिशव्या व इतर |
| | | | (दोन भागात दोन विषय) |
| १२/४/२०१० | १.०० ते ५.०० | सुजाता पवार/ | फाईल, फोल्डर, पाऊचेस |
| | | अर्चना वाटवे | जुन्या साड्यांपासून पिशव्या व इतर |
| १३/४/२०१० | १.०० ते ५.०० | रंजना बाजी/ फुलमामडीकर | प्रॉडक्ट/कापडी बॅग्ज |
| | | अर्चना वाटवे | जुन्या साड्यांपासून पिशव्या व इतर |
| १४/४/२०१० | १.०० ते ५.०० | सोमण/कांबळे | ज्युट बॅग्ज |
| १५/४/२०१० | १.०० ते ५.०० | शलाका महाशब्दे/ | ज्वेलरी |
| | | अर्चना वाटवे | जुन्या साड्यांपासून पिशव्या व इतर |
| १६/४/२०१० | १.०० ते ५.०० | शलाका महाशब्दे/ | ज्वेलरी |
| १७/४/२०१० | १.०० ते ५.०० | प्रज्ञा जोशी/ रमा लेले | फॅब्रीक पेंटिंग्ज/थ्री डी आर्ट |
| १८/४/२०१० | १.०० ते ५.०० | सुनिता चंदगडकर | कॅन्डल मेकिंग |
| १९/४/२०१० | १.०० ते ५.०० | ज्योती कुदळे/विजया तिखिले | केटरिंग/केटरिंग |
| २०/४/२०१० | १.०० ते ५.०० | श्री. प्रकाश भोंगे (मिटकॉन) | उद्योजकता व मार्केटिंग |
| २१/४/२०१० | १.०० ते ५.०० | माधुरी सहस्रबुद्धे | जरदोसी |
| २२/४/२०१० | १.०० ते ५.०० | दीपाताई | चॉकलेट मेकिंग |

## बचत गट

● दसरा-दिवाळी होईपर्यंत महिलांना अजिबात उसंत नसते. उटणे, मेणपणत्या, रंगविलेल्या पणत्या, खणाच्या कापडांचे ज्युवेलरी बॉक्स, हँडमेड पेपरपासून बनविलेल्या विविध वस्तू व कागदी पिशव्यांची तर १० हजारांची मागणी त्यांनी तत्परतेने पूर्ण केली.

● पाषाणच्या सिंफनी कंपनीच्या आवारात वर्धिनीच्या बचत गटांना दोन दिवस त्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन मांडण्याची संधी मिळाली. खपही खूप चांगला झाला.

● बिबवेवाडी भागातील सर्व बचतगटांच्या एकत्रिकरणाचा कार्यक्रम दि. ११-१२-२०१० रोजी झाला. कार्यक्रमासाठी श्रीमती पुष्पाताई व श्री. रामभाऊ डिंबळे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास ६० महिला उपस्थित होत्या. श्रीमती पुष्पाताईंनी बचतगटाच्या माध्यमातून आपण कोणती कामे करू शकतो हे काही उदाहरणे देऊन समजावून दिले. अशिक्षित महिलासुद्धा चांगली कामे करू शकतात पण त्यांनी समूहाने कसे काम करावे हे सांगितले.

श्री. रामभाऊंनी गटाने काम करण्याचे महत्त्व अत्यंत सोप्या शब्दात सांगितले. गटाने काम केल्यामुळे कसे फायदे होतात हे वेगवेगळी उदाहरणे

**आपण त्याग करायला शिकूया म्हणजे आपणही देवांच्या हातातील शस्त्र बनू.**

देऊन सांगितले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढण्यास नक्कीच मदत झाली.

महिलांनी त्यांच्या अडचणी मोकळेपणाने सांगितल्या. 'मुलांनी अभ्यास कसा करावा' याचे मार्गदर्शन करावे असे सुचविले. तसेच, मुलींसाठी शाखा सुरू करावी असे सांगितले.

## शिवण वर्ग अभ्यासक्रम

या वर्षी जून २०१० ते सप्टेंबर २०१० अशी सहा महिन्याची शिवण प्रशिक्षण अभ्यासक्रमाची एक बॅच पूर्ण झाली. या अभ्यासवर्गाला एकूण १० महिला-मुली होत्या. त्यांनी यशस्वीरीत्या हा अभ्यासक्रम पूर्ण केला. आता त्या उत्तम प्रकारे कपडे शिवू लागल्या आहेत.

## प्रौढ साक्षरता वर्ग

प्रौढ साक्षरता वर्गाचा सध्या १५ स्त्रिया लाभ घेत आहेत. त्यांना आता पूर्ण अक्षर ओळख झाली आहे. १ ते १०० अंक लिहिता-वाचता येतात. जोडाक्षरे वाचायला व स्वत:ची सही करायला शिकल्या आहेत. त्यामुळे आता त्यांना मिळेल तो कागद वाचण्याचा छंद लागला आहे. शिवाय मुलांचा शाळेतील अभ्यास लिहून आणायला लागल्या आहेत. आता त्यांनी धार्मिक ग्रंथ-दासबोध-ज्ञानेश्वरी-वाचायला घेतले आहेत.

## स्पर्धापरीक्षा आणि अभ्यासिका विभाग

● ३० विद्यार्थी एम.पी.एस.सी.च्या परीक्षेची तयारी करीत होते. या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम ६मे रोजी संपन्न झाला. यावेळी पी.एस.आय. पदी निवड झालेल्या सर्वश्री बापु पिंगळे, संतोष शेटे आणि महेश माळी यांचा सत्कार करण्यात आला. ९ मे रोजी परीक्षा झाल्यावर या सर्व विद्यार्थ्यांनी वर्धिनीवर एकत्र जमून पेपर संदर्भात मनमोकळी चर्चा केली.

● २० जून २०१० रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे पी.एस.आय. पूर्व परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत आपल्या केंद्राचा १००% निकाल लागला. वर्धिनीच्या अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांचाही यात समावेश आहे. २३ ऑक्टोबरला झालेल्या परीक्षेसाठी केंद्रातर्फे 'टेस्ट सिरीज' घेण्यात आली. तसेच मराठी व सांख्यिकी या क्लिष्ट विषयांसाठी पी.एस.आय. डॉ. शिवाजी जगताप यांचे विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते.

● नोव्हें. महिन्यात लोकसेवा आयोगाने SIT व PSI च्या मुख्य परीक्षांचे निकाल जाहीर केले. या परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे १९ डिसें. रविवार रोजी, Mock Interview Session घेण्यात आले. नायब तहसिलदार श्री. दत्ता सांगोलकर व श्री. संजय मराठे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

● २६ डिसेंबर रोजी सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. वा. ना. दांडेकर यांच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. दांडेकर सरांनी वयाच्या ८८ व्या वर्षी केवळ 'स्व'-रूपवर्धिनी वरील प्रेमापोटी विद्यार्थ्यांना बुद्धिमापन विषयाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस १५० विद्यार्थी उपस्थित होते.

● १३ फेब्रु. ११ रोजी राज्यसेवेची पूर्व परीक्षा जाहीर झाली आहे. या परीक्षेकरिता केंद्रात १५ दिवसांचा (२७ डिसें. ते १२ जाने. या कालावधीत) क्रॅश कोर्स घेण्यात आला.

✻ ✻ ✻

**दैवी इच्छा आपल्याला मार्ग दाखवीत असते. आपण फक्त त्यागाला तयार झालो म्हणजे इतर सर्व भार देव उचलतो.**

# क्षण आनंदाचे

वर्धिनीच्या अभ्यासिकेतील खालील विद्यार्थ्यांनी विविध परिक्षांमध्ये
उत्तम यश प्राप्त केले आहे. त्या सर्वांचे अभिनंदन!

**आय.पी.सी.सी. परीक्षा** - श्री. पंकज आगरवाल, श्री. संदीप मिश्रा

**ऑल इंडिया मेडिकल एन्ट्रन्स** - डॉ. राजकुमार निकाळजे, डॉ. बाळासाहेब खोत

**महाराष्ट्र मेडिकल एन्ट्रन्स** - डॉ. राजकुमार निकाळजे, डॉ. बाळासाहेब खोत, डॉ. एकनाथ सानप, डॉ. सचिन चव्हाण

*वर्धिनीच्या स्पर्धापरीक्षा केंद्र आणि अभ्यासिकेतील खालील विद्यार्थी*
*पी.एस.आय. पदासाठी निवडले गेले आहेत.*

***१) संतोष शेटे २) बापू पिंगळे ३) महेश माळी***

*तसेच वर्धिनीच्या खालील युवकांचीही पी.एस.आय. पदासाठी निवड झाली आहे.*

***दशरथ वीटकर*** *(स्वामी विवेकानंद शाखा)*, ***बालाजी शेंडगे*** *(स्वामी सुबोधानंद शाखा)*

- मुंबई दूरदर्शन तर्फे दर रविवारी सकाळी ९.३० वा. **'तपस्या'** या सदरामध्ये वेगवेगळ्या प्रश्नांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचा परिचय प्रदर्शित केला जातो. या सदरामध्ये रविवार दिनांक ३० मे रोजी सकाळी 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामावर आधारित माहितीपट प्रदर्शित केला.
- स्वामी विवेकानंद शाखेत नव्याने प्रवेश केलेला वर्धक **कुमार निलेश थोरात** याला इयत्ता चवथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश मिळाले.
- सहकारनगर परिसरात नव्याने सुरू होत असलेल्या शाखेतील वर्धक **कुमार रसुल शेख** याला इयत्ता चवथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश मिळाले.
- पंजाब विद्यापीठ-पतियाळा येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ 'मल्लखांब' स्पर्धेत **श्री. संतोष घाडगे** याला सांघिक सुवर्णपदक व वैयक्तिक स्पर्धेत रौप्य पदक मिळाले.
- **श्री. उमेश मठपती** याला ज्युडो कराटे क्रिडा प्रकारात ६५ कि. गटामध्ये जिल्हा स्तरावर व झोनल स्पर्धेत प्रथम क्रमांक व राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्यपदक.
- राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा व उच्च माध्यमिक विद्यालय- अंबडवेट-पौड यांच्यातर्फे नवरात्र उत्सवानिमित्ताने दिला जाणारा **'मातृशक्ती गौरव'** पुरस्कार यंदाच्या वर्षी नवरात्रात-खंडेनवमीच्या दिवशी शनिवार दिनांक १६ ऑक्टोबर २०१० रोजी 'स्व'रूपवर्धिनीच्या ग्रंथपाल **श्रीमती नीला कुडलिंगार** यांना प्रदान करण्यात आला. वर्धिनीच्या परिवारात हा अत्यंत आनंदाचा क्षण ठरला.

***या सर्वांचे वर्धिनीतर्फे हार्दिक अभिनंदन.***

**कालीमाते, आमच्यातील स्वार्थ नाहीसा कर. कीर्ती, लाभ अगर सुख यांचे राज्य आमच्यावर चालू देऊ नकोस. तुझ्या प्रकाशात दवबिंदूप्रमाणे आमच्यातील क्षुद्र भाव विरून जाऊ देत.''**

## गौरव गुरूंचा

*१९८१ सालापासून अत्यंत तळमळीने वर्धिनीचे पूर्ण वेळ काम करणाऱ्या आपल्या शिरीष पटवर्धन सरांना (शि.पं.ना) ज्ञानप्रबोधिनीच्या मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी यांनी अत्यंत प्रतिष्ठेच्या 'गुरुगौरव' पुरस्काराने सन्मानित केले. २६ जुलै २०१० रोजी गुरूपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त आयोजित या भावमय सोहळ्यात ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ.प्र.ल. गावडे यांच्या शुभहस्ते शिरीषजींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानपत्र, शाल, श्रीफळ व रु. ७५,०००/– ची रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप होते. अत्यंत निरपेक्षपणे व समर्पित वृत्तीने गेली ३० वर्षे पूर्ण वेळ वर्धिनीचे काम करणाऱ्या शिरीषजींनी कार्याचा व कार्यकर्त्यांचा प्रतिनिधी या नात्याने पुरस्काराचा स्वीकार केला व पुरस्काराची सारी धनराशी व श्रेय वर्धिनीला अर्पण केले. आई वडिलांचे संस्कार, गुरूवर्य किशाभाऊ पटवर्धन सरांचा लाभलेला २७ वर्षांचा प्रेरणादायी सहवास, वर्धिनीतले सदैव भारलेले वातावरण, विपरित परिस्थितीवर चढाओढीने मात करणाऱ्या कार्यकर्त्यांचा समूह, कुटुंबियांची कृतीशील साथ व काम करताना जाणवणारा सामान्यातील सामान्य माणसाचा आत्मियतेचा भाव यामुळेच कामाची प्रेरणा सतत वर्धिष्णु होत राहिली, असे सत्काराला उत्तर देताना शिरीषजींनी भावपूर्ण शब्दात सांगितले. कामाची प्रेरणा जागती ठेवणारे अत्यंत भावनोत्कट असे तीन प्रसंग त्यांनी यावेळी कथन केले.*

### प्रजासत्ताक दिन

*यंदाचा ध्वजवंदनाचा कार्यक्रम स्वेच्छा निवृत्ती घेऊन वर्धिनीच्या कार्यालयामध्ये अर्थविभागात काम करणाऱ्या श्री. अशोकराव चिपळूणकर यांच्या हस्ते संपन्न झाला.*

**With Best Compliments From**

PROTOTYPE ENGG. CO.

***Govt. Approved Valuers for Plant Equipment / Machinery Consulting / Chartered Engineers***

**Tel. : 22662496, 22631214,**
**Cell :9820302436**
**E-mail : vijayswar@hotmail.com**

**भारत राष्ट्रवादाने पछाडला गेला पाहिजे.**
**असं झालं की त्याचा इतिहास व रूढी यांच्याकडे नव्या दृष्टीनं तो पाहायला शिकेल.**

## फिरती प्रयोगशाळा आणि ग्रामविकास प्रकल्प

● ह्या वर्षी 'टाटा मोटर्स' कंपनीने भीमाशंकर खोऱ्यातील दत्तक घेतलेल्या दोन शाळांतील विद्यार्थी आणि टाटा मोटर्स संचलित समाजविकास केंद्रांतर्गत आठ ग्रामीण शाळांतील विद्यार्थ्यांना फिरत्या प्रयोगशाळेअंतर्गत सुनील कुलकर्णी सरांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला. याची पहिली पायरी- विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे विज्ञानाचे कुतूहल जागृत व्हावे, विज्ञान सोपे असते, मजेदार असते हे त्यांना जाणवावे म्हणून छोट्या छोट्या गमतीदार प्रयोगांचे आयोजन केले होते. प्रयोगांसाठी परिसरात आढळणाऱ्या वस्तूंचाच वापर केल्यामुळे हे प्रयोग विज्ञानाचे न वाटता मुलांना खेळच वाटल्याने ह्या प्रकल्पाचा मूळ उद्देश सफल झाला असे नक्कीच वाटते.

सर्व विद्यार्थी ८ वी, ९ वी व १० वी तील होते.

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी संख्या | २३०० |
| एकूण शिक्षक | ५० |
| प्रयोगाच्या वेळी उपस्थित पालक | ४० |

**काही प्रतिक्रिया-**

*शिक्षक* - श्वसनक्रिया कशी घडते? हे आज प्रथमच समजले.

*पालक* - असा कार्यक्रम आम्हा पालकांसाठीही आयोजित करा.

*विद्यार्थी* - हे सर्व प्रयोग आम्ही घरी करू व आई-वडिलांना दाखवू.

● औंध येथील म.न.पा.च्या इंदिरा गांधी विद्यालय, व त्या परिसरातील इतर दोन शाळांतील शिक्षक, 'खेळघर' ह्या संस्थेतील शिक्षक ह्यांना प्रयोगातून हसत-खेळत विज्ञान कसे शिकवावे, प्रयोगसाहित्य तयार कसे करावे ह्याचे प्रशिक्षण देण्यात आले. शिक्षक संख्या - ३५

● पुण्यातील 'खेळघर' संस्था आणि वाई येथील 'भारत विद्यालय' ह्यांना ५ वी ते १० वी साठी प्रयोगशाळा उभारण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

● सौ. रोहिणीताई नागवणकर यांनीही खेचरे व माले येथील शाळांमध्ये इंग्रजी अध्यापनाचे साप्ताहिक वर्ग घेतले.

✻ ✻ ✻

*With Best Compliments From*

Galaxy Engineers

***Manufacturers of Stainless Steel, Hotel Kitchen Equipments, Exhaust System, Refrigeration, Dining Tables & Chairs, S.S. Railing And All Types Of S.S. Fabrication***

**SHOAIB MEMON : 9822969707**

35/36, Wellesley Rd, Near Maldhakka,
Next to Indian Oil, Pune 411001. (M.S.) India
Tel.: 26128729 / 26128745,
Fax: 91 - 20 - 26128729
Visit us at :
www.galaxykitchenequipments.com

**भारताच्या दैदीप्यमान इतिहासाने जे स्त्रीत्वाचे आदर्श समाजापुढे ठेवले आहेत, ज्या राष्ट्रीय कल्पना स्त्रीजीवनाशी निगडित झाल्या आहेत त्यांचा विचार करूनच स्त्रीशिक्षणाचा आराखडा नक्की केला पाहिजे.**

विशेष लेख

# भगिनी निवदितांचा शिक्षण विचार

-श्रीमती संध्या गुळवणी

## स्वदेशासाठी लढणारे नोबल कुटुंब

भारतीय संस्कृती आत्मसात करून भारतीय जनतेच्या प्रगतीची आकांक्षा बाळगणाऱ्या आणि भारतीय स्वातंत्र्याची स्वप्ने पाहणाऱ्या भगिनी निवेदिता या एक द्रष्ट्या विचारवंत योगिनी होत्या. भगिनी निवेदिता मूळच्या आयर्लंडच्या. त्यांचे मूळ नाव मार्गारेट नोबल. त्यांचे आजोबा आयर्लंडच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी असलेले कट्टर देशभक्त होते. त्यांचे आईवडील मेरी आणि सॅम्युअल हे धार्मिक होते. भगिनी निवेदितांचे शिक्षण इंग्लंडमध्ये झाले.

## शिक्षणाचा मानसशास्त्रीय विचार

त्या काळात युरोपमध्ये बालशिक्षण पद्धतीवर बरेच विचारमंथन सुरू होते. वेगवेगळे प्रयोग करून पाहिले जात होते. पेस्टॉलॉजी Pestalozzi, आणि फ्रॉबेल Frobel, या बालमानसतज्ञांनी लहान मुलांचे शिक्षण आनंददायी होण्यासाठी किंडरगार्टन Kindergarten, म्हणजेच Children's garden 'मुलांची बाग' ही संकल्पना, बालमानस शास्त्राचा अभ्यास करून समाजापुढे मांडली. भगिनी निवेदितांवर या विचारांचा प्रभाव पडला. त्यांनी त्यासाठी स्वत:ची शाळा सुरू केली. या शाळेत मुले निरनिराळे खेळ खेळत व त्यातून शिकत. तेथे येणारे श्री. एबेनेझर कुक ये मुलांना चित्रकला शिकवत. त्यांच्यामुळे भगिनी निवेदितांनाही कलेच्या रसग्रहणाची एक नवी दृष्टी मिळाली. आणि त्यांनी कलेमधील विविधतेचा अभ्यासही केला.

## स्वधर्मशोध

भगिनी निवेदिता स्वत: विचार करणाऱ्या असल्यामुळे प्रत्येक गोष्ट शिकत असताना त्यांचे स्वत:चे एक मत तयार होत असे. प्रत्येक विषयाच्या मूळ स्वरूपापर्यंत जाण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यामुळेच ख्रिस्त धर्माचा अभ्यास करताना त्यंना त्यामधील विचारांमध्ये विरोधाभास जाणवू लागला. विज्ञानाचा अभ्यास करून आपल्या शंका फेडून घेता येतील असं वाटल्याने त्यांनी विज्ञानाचा अभ्यास केला; पण त्यातही त्यांचे पूर्ण समाधान झाले नाही. उलट धर्मातील अनेक त्रुटी त्यांच्या लक्षात येऊ लागल्या. त्यांनी बुद्ध धर्माचा अभ्यास केला. पण त्यांचे समाधान झाले नाही. त्याच सुमारास स्वामी विवेकानंद व्याख्यानासाठी लंडनला आले होते. (तेथे लेडी इझाबेल मार्गेसन यांच्या घरी भगिनी निवेदितांची व स्वामीजींची प्रथम भेट झाली.

त्यानंतर त्यांनी स्वामीजींची अनेक व्याख्याने ऐकली. प्रत्यक्ष भेटीत त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा केली. स्वामीजींच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. ज्या सत्याच्या शोधात आपण आहोत त्या सत्याकडे जाण्याचा मार्ग स्वामीजीच दाखवू शकतील असा विश्वास भगिनी निवेदितांच्या मनात निर्माण झाला.

## भारत हाच स्वदेश

भारतासाठी, तेथील स्त्रियांसाठी काम करावे हा संकल्प दृढ झाला अन् स्वामीजींचा आशीर्वाद घेऊन

**इथल्या गृहशिक्षणात जो भारदस्तपणा, सौहार्द, धार्मिक संस्कार, स्वच्छता-टापटीप, मानसिक सुसंस्कृतता, सहृदयता यांचा समावेश झालेला दिसतो तो स्त्रीमुळेच.**

त्या २८ जानेवारी १८९८ ला कलकत्त्यास येऊन दाखल झाल्या. त्यांचा निश्चय इतका दृढ होता की स्वत:ची शाळा, मायभूमी, नातलग या सर्वांचा त्याग करून एका अनोळखी देशासाठी सर्वस्व अर्पण करण्यास त्या सिद्ध झाल्या होत्या. भारतातील हवामान, तेथील दारिद्र्य, अंध:श्रद्धा, पारतंत्र्य, स्त्रियांच्या हालअपेष्टा या सर्वांची माहिती स्वामी विवेकानंदांनी भगिनी निवेदितांना दिली होती. तरीही त्यांचा निश्चय डळमळीत झाला नाही. भगिनी निवेदितांच्या वडिलांनी त्यांच्या अंतसमयी म्हटले होते की, ''मार्गारेटला सांभाळा, तिच्या हातून फार थोर कार्य व्हायचे आहे.'' हे शब्द प्रत्यक्षात उतरविण्याचीच जणू वेळ आली होती.

### स्त्री शिक्षणास आरंभ

१४ नोव्हेंबर १८९८ ला भगिनी निवेदितांनी आदरणीय माताजींचा आशीर्वाद घेऊन कलकत्ता येथे बालिका विद्यालयाची सुरुवात केली. भारतीय समाजाची मानसिकता आणि सांस्कृतिक जडणघडण यांचा अभ्यास करून त्याला पूरक अशी मुलींना शिकविण्याची पद्धत ठरवून त्यानुसार अभ्यासक्रम आखला गेला तसेच आजवर त्यांनी बालशिक्षण पद्धतीचा जो अभ्यास केला होता त्याचाही समावेश त्यांनी नवीन अभ्यासक्रमात केला. त्यामुळे भाषा, गणित, विज्ञान याबरोबरच निरनिराळे खेळ, शिवण, कलाकुसर इ. अनेक विषय तेथे शिकवले जात. भगिनी निवेदिता केवळ शाळा सुरू करूनच थांबल्या नाहीत तर त्यांनी तेथील समाजात मिळूनमिसळून राहून त्याचा अभ्यासही केला.

बंगाली भाषा शिकल्या आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा, वेदांचा, उपनिषदांचाही अभ्यास त्यांनी केला. भारतीय मंदिरांची स्थापत्यशैली व त्यातील वेगवेगळ्या प्रांतातील विभिन्नताही अभ्यासली. शिक्षणावर, कलेवर वेगवेगळे लेख लिहिले. भारतभर हिंडून अनेक व्याख्याने दिली. अनेक विचारवंतांशी, साहित्यिकांशी, राजकारणी लोकांशी चर्चा केल्या. प्रख्यात वैज्ञानिक जगदिश्चंद्र बसू यांना त्यांच्या लेखनात सर्वतोपरी सहाय्य केले. भारताला प्रथमत: स्वातंत्रकय मिळविणे आवश्यक आहे असे वाटल्याने क्रांतिकारकांच्या मनात स्वातंत्र्यची प्रेरणा जागृत केली. अगदी भारताचा ध्वज कसा असावा याचे चित्रण त्यांच्या डोळ्यापुढे होते. भगव्या वस्त्रावर पिवळ्या रंगाचे वज्रचिन्ह त्यांनी शाळेतल्या मुलींकडून विणून घेतले होते. त्यावर 'वंदे मातरम्' आणि 'यतो धर्म: ततो जय:' ही अक्षरे विणून घेतली होती. अशा तऱ्हेने भारतीय समाजाचे अंतर्मन ओळखणाऱ्या भगिनी निवेदितांचे शिक्षण विषयक विचार जे त्यांनी त्यांच्या लेखांमधून मांडले आहेत ते आजच्या काळातही तितकेच उपयुक्त आहेत.

### राष्ट्रीय मन तयार करणारे शिक्षण हवे

"Educaion is the manifestation of Perfection already in man."

असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे. भगिनी निवेदितांवर स्वामिजींच्या या विचारांचा प्रभाव होताच त्यामुळे त्यांच्या लेखांमधूनही त्याचे प्रतिबिंब दिसते. भगिनी निवेदिता म्हणतात की, एखाद्या मुलाला जर विचारले की तू शाळेत का जातोस तर त्याचे उत्तर असे असेल की, ''एक उत्तम व्यक्ती बनण्यासाठी आणि दुसऱ्याला मदत का व कशी करावी हे शिकण्यासाठी मी शाळेत जात आहे.'' पुढे त्या असेही म्हणतात की, ''आपले शिक्षण हे

**आपल्या जाणिवेत साऱ्या राष्ट्राचा समावेश झाला पाहिजे. ही गोष्ट साधण्यास पुरुषांइतकीच स्त्रियांची आवश्यकता आहे – नव्हे स्त्रियाच हा बदल अधिक यशस्वीपणे घडवून आणू शकतील.**

आपले व्यक्तिमत्त्व घडविणारे असावे. आपण जे शिक्षण घेतो, मनाला जे शिकवतो व जे कार्य करतो तेच आपल्या सर्व धडपडीचा मुलभूत हेतू असला पाहिजे.'' **त्यांच्या मते आत्ता जे शिक्षण शाळांमधून दिले जाते ते भारतीय संस्कृतीच्या इतिहासानुसार नाही, ते राष्ट्रीय नाही. शिक्षण देताना त्या विद्यार्थ्यांचे असे राष्ट्रीय मन तयार झाले पाहिजे की ज्यामुळे राष्ट्राची नवीन बांधणी करता येईल.''** ''शिक्षणात प्रथम ध्येयनिश्चिती असावी. ध्येय जरी नवीन वाटले तरी ते जुन्या ध्येयांवरच आधारीत असते. जेव्हा अपाण ध्येयापर्यंत पोहोचतो तेव्हा शाश्वत असे काही हाताशी लागते. शिक्षण हे खाणीसारखे असते. खाणीत काम करणारे कामगार वरपासून खोदत जातात व अखेर ते खाणीतील अमूल्य खनीज संपत्तीपर्यंत पोहोचतात. शिक्षणातही आधी ध्येय निश्चित करून मग त्या ध्येयापर्यंत पोहोचावे लागते.

## भारतीय आदर्श

भारताचे भवितव्य शिक्षणावर अवलंबून आहे. बाहेरील शिक्षणपद्धती इथे वापरणे योग्य ठरणार नाही. कुटुंब, देश, धर्म, भावना इ. गोष्टींवर भारतीय व्यक्तींच्या श्रद्धा अवलंबून आहेत. नैतिक गुणधर्मांवर श्रद्धा असलेली अनेक उत्तम व्यक्तिमत्त्वे मागील पिढ्यांत होती. भगिनी निवेदितांना असे वाटते की, यापुढे असे शिक्षण दिले जावे की, देश देशबांधव आणि धर्म यासाठी त्या व्यक्तीने त्या शिक्षणामुळे काही चांगले कार्य करावे. मात्र शिक्षण हे संशोधनात्मक हवे तसेच त्याला तंत्रज्ञानाची जोड हवी. लेखन, वाचन, गणित, सायन्स हे शिक्षणातील महत्त्वाचे विषय असावेत. भारतात विविध भाषा आहेत. त्यामुळे संपूर्ण भारतात शिक्षणाचे माध्यम म्हणून एकच सोपी भाषा असावी. तसेच सर्वांना एकसारखे शिक्षण हवे. त्यात स्त्रीपुरुष असा भेदभाव नसावा. सत्य जाणून घेण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.

**शिक्षण संपल्यानंतर प्रत्येकाने स्वत:ची किमान तीन वर्षं तरी इतरांना शिकविण्यासाठी द्यावीत. असे केल्यास संपूर्ण भारत साक्षर होण्यासाठी केवळ तीस वर्षे लागतील. मात्र हे काम प्रत्येकाने स्वेच्छेने करावे त्यासाठी एखाद्या संस्थेवर अवलंबून राहू नये.** १३ ऑक्टोबर २०११ रोजी निवेदितांच्या निधनास शंभर वर्षे पूर्ण होतील पण त्यांचे सांगणे आजही कालबाह्य झालेले नाही. शिक्षणाच्या संकल्पनेबरोबरच त्यात आत्मा हवा. तसे नसेल तर त्या शिक्षणाने स्वत:ची भाकरी मिळविणारे माकड तयार होईल. माणूस तयार होणार नाही. शिक्षणाने आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा. कार्यक्षमता वाढायला हवी. शिक्षण घेतानाच ते ज्ञान उपयोजित कसं करावं हेही सांगितलं जावं. त्यासाठी स्वत:च्या देशाचा इतिहास आणि भूगोल याचे ज्ञान हवे. (एखाद्या कारखान्यात काम करणारी व्यक्ती तेव्हाच पुढे जाते, प्रगती करते, जेव्हा त्या व्यक्तीला स्वत:च्या भूमीबद्दल ज्ञान असते, इथल्या समस्या आणि कमरता यांची जाणीव असते तसेच इथल्या चांगला गोष्टींचीही माहिती असते) ज्याला भारतीय आध्यात्मिक ज्ञानाचं श्रेष्ठत्व माहित आहे तोच भारताला नवीन पद्धतीच्या ज्ञानाने पुढे नेऊ शकेल.

आपण जे शिक्षण घेतो, मनाला जे शिकवितो व जे कार्य करतो तेच आपल्या सर्व धडपडीचा मुलभूत हेतू असला पाहिजे. म्हणजेच जगण्याची

**मला असा विश्वास वाटतो की देशप्रेम, बांधवप्रेम, जन्मस्थळाचा अभिमान, भविष्याविषयी आशा आणि भारतावरील नितांत भक्ती, एवढ्या गोष्टी एकत्र आल्यास वाटेल ते आश्चर्य घडवता येईल.**

पद्धत आणि हेतू व शिक्षण यात तफावत नसावी.

* **राष्ट्राच्या जडणघडणीबाबत** विचार करताना भगिनी निवेदिता आशियातील चीन आणि युरोपातील फ्रान्स यांचा उल्लेख करतात. त्या म्हणतात. 'राष्ट्र कसे तयार करावे आणि लोकांचा आत्मिक भाव धर्माशी कसा निगडीत करावा याबाबत आदर्श अशी ही राष्ट्रे आहेत.' भारत मातेवर भक्ती करावी आणि भारतासाठी शिका असा भाव येथील मुलांच्या मानत शिक्षणातून निर्माण व्हायला हवा. शिक्षणपद्धती ठरविताना समाज निरोगी व्हावा लागतो. व देश सुस्थिर असावा लागतो. म्हणूनच सध्या भारतीय जनता पारतंत्र्यात असताना राष्ट्र कसे तयार करावे हे शिक्षण येथे देणे आवश्यक आहे असे त्यांना वाटते. भगिनी निवेदिता जर्मन देशाचे उदाहरण देऊन सांगतात की जर्मन लोकांनी जसे जर्मनीचे प्रश्न सोडविण्यासाठी जर्मन मन तयार केले तसे भारतीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय मन तयार व्हायला हवे. असे राष्ट्रीय मन तयार होण्यासाठी प्रथम प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींमध्ये व घरामध्ये त्या प्रकारची विचारसरणी हवी. राष्ट्र तयार करण्यासाठी ते कुटुंब असे हवे की त्यांच्यात अप्रामाणिकपणा असता कामा नये तसेच न्यायबुद्धीही आवश्यक आहे. त्यांच्यात असे धारिष्ट्य आणि असे सामर्थ्य हवे की त्यामुळे सामाजाचे रक्षण होईल. मुलांमध्ये सतत देशासाठी विचार करण्याची प्रेरणा जागवली पाहिजे. भारतासाठी त्याग करा, भारतावर भक्ती करा, भारतासाठी शिका अशी अपेक्षा आपण त्यांच्याकडून केली पाहिजे. आदर्श हे जन्म घेत नसतात आदर्शांना घडविता येते व केवळ आपणच नाही तर अनेकजण तयार होऊ शकतात. आदर्श बनायला शिकवलं पाहिजे. त्यासाठी स्वत:वर आणि स्वत:च्या देशातील लोकांवर पूर्ण विश्वास हवा. राष्ट्रीयत्वाबद्दल बोलताना भगिनी निवेदिता अधिक व्यापक दृष्टिकोन ठेवण्यास सांगतात. त्यांच्यामते आपण आपले वर्तुळ अधिक मोठे केले पाहिजे. भारताबद्दल अभ्यास करताना त्याचा इतिहास आणि भूगोल यांचे ज्ञान हवे हे खरे पण राष्ट्रीयत्व हे साधन आहे ध्येय नव्हे. जगातील सर्व शिक्षित लोक एकत्र येऊन एकमेकांशी संवाद साधू शकतील. इतक्या उंचीपर्यंत येण्याएवढे शिक्षण प्राप्त व्हायला हवे हे खरे स्वातंत्र्य. वैश्विकदृष्ट्या ही खरी मुक्ती होय. अन् हे फक्त त्याच व्यक्तीला साध्य होऊ शकेल. ज्याच्या ज्ञानाची सुरुवात ही राष्ट्राच्या प्रेमापासून आणि आईपासून सुरू होते.

## शिक्षणातील मातृभाषेचं महत्त्व

शिक्षणातील मातृभाषेचे महत्त्व विशद करताना भगिनी निवेदिता एक उदाहरण देऊन स्पष्ट करतात. त्या म्हणतात, एका लहान मूलाचं घराशी असलेलं नातं आणि मोठ्या माणसाचं गावाशी असलेलं नातं यात खूप फरक आहे. एखाद्या लहान मुलाचे कुटुंब विस्थापित झालं आणि ते मूल श्रीमंत कुटुंबात राहायला आलं तर त्याचे मन सुरुवातीला शून्यवत झालेले असेल, उद्ध्वस्त झालेलं असेल. त्याच्या मनातील आपलेपणाची भावना नष्ट होईल. कारण त्याचे आंतरजग आणि बाह्यजग यात फरक पडलेला असेल. बाह्य परिस्थिती ही अंत:स्थितीशी जोडणारी असावी लागते तरच आकलन करणे सोपे जाते. तसेच इथल्या संस्कृतीमध्ये वाढलेल्या मुलाला परकीय शिक्षण दिले तर हेच होईल. आपल्या मनातील आईवडिलांचे स्थान राजा घेऊ शकत नाही. त्यामुळे लहानपणी मुलांना शिकविताना त्यांना जे

**स्वदेशी आंदोलन म्हणजे आजच्या युगाचे गोसंरक्षण आंदोलन होय.**

माहीत आहे त्यापासून सुरुवात करायला हवी. एखाद्या लहान मुलाने घरामध्ये महाभारतामधील कथा ऐकलेल्या असतात. त्यामुळे आदर्शाचे उदाहरण देताना त्याला राजा युधिष्ठिराचे उदाहरण दिले तर पटकन् समजेल. त्याला जॉर्ज वॉशिंग्टनचे उदाहरण दिले तर समजणार नाही. म्हणूनच शिक्षणामध्ये जे माहीत आहे त्याकडून 'माहीत नाही' त्याच्याकडे जावे. जे जवळ आहे त्याकडून जे लांब आहे त्याकडे जावे. जे सवयीचे आहे त्याकडून जे सवयीचे नाही त्याकडे जावे. कोणत्याही प्रकारच्या शिक्षणात ज्ञान हे कुतुहल शमविण्यासाठी मिळाले पाहिजे असे झाले तर प्रत्येक मूल बुद्धिमान होईल. अशा शिक्षणाने त्याच्या स्वत:बद्दलच्या संकल्पना स्पष्ट होतील. ज्याला स्वत:बद्दल काही माहीत नाही. जो स्वत:वर प्रेम करत नाही, ज्याच्या स्वत:बद्दलच्या संकल्पना स्पष्ट नाहीत तो परिपूर्ण होऊ शकत नाही.

भारतातील मुलांना परदेशी शिक्षणासाठी पाठविले जाई. त्याबद्दल बोलताना त्या म्हणतात की अशा मुलांमधली किती मुले यशस्वी झाली? हे म्हणजे असे रोप की ज्याला 'मुळेच' नाहीत, मग हे रोप रुजणार कसे? आणि वाढणार कसे? 'मुळे' ही नेहमी आपल्या वातावरणात रुजली पाहिजेत. भारतीय संस्कृतीत वाढलेल्या मुलाला परकीय शिक्षण दिले तर त्याच्या मनाची अवस्था दोलायमान झालेली असेल अशा अवस्थेत परकीय शिक्षणाची मुळेही रुजणार नाहीत. ना भारतीय संस्कार राहतील ना परकीय.

## मातृभाषा हेच माध्यम

लहान मुलांच्या ज्या संकल्पना असतात त्या त्याच्या सामाजिक वातावरणाशी जोडलेल्या असतात. त्यामुळे मुलांना शिकवताना कोणताही विषय त्याच्या मातृभाषेतच शिकवला पाहिजे. परदेशी भाषादेखील त्यांच्या भाषेत शिकवली पाहिजे. पण जेव्हा व्यक्ती मोठी होते, ज्ञानाने प्रगल्भ होते. तेव्हा ती इतर भाषेतील संकल्पनांचा, रसांचा आस्वाद घेऊ शकते.

## कलेची भाषा सर्वात सुलभ

कलेचेही असंच आहे. सर्व देशातील सर्व तऱ्हेच्या लोकांनाही कलेचा आस्वाद घेता येतो. काव्याचा आस्वाद घेता येतो. काव्यातील भावना या वैश्विक असतात. कलेची पातळीही देखील वैश्विक पातळीवरची आहे. ताजमहालचे सौंदर्य ग्रहण करण्यासाठी त्या व्यक्तीचे राष्ट्रीयत्व आड येत नाही. परदेशी कला, परदेशी काव्य यांचा अभ्यास केला तर त्या देशातील शिक्षण घेणे सोपे जाते. मात्र कोणत्याही शिक्षणात अनुकरण असू नये. ज्याप्रमाणे प्रार्थना ही प्रेमाने केली तर आनंददायी ठरते जबरदस्तीने केली तर दिखावू आणि भयानक ठरते. अनुकरणाचे तसेच आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, आपल्याला जे माहीत आहे जे सवयीचे आहे त्याच्या परिणामातच जगाचे शिक्षण मिळू शकते. (ज्ञाताकडून अज्ञाताकडे) आपल्या मनात जे रुजले आहे त्याच आधारावर आपण परकीय शिक्षण स्विकारू शकतो.

## शास्त्राने प्रगती

शिक्षणातील शास्त्र विषयाचे महत्त्व विशद करताना भगिनी निवेदिता म्हणतात की, जर उन्नती व्हायची असेल तर ती शास्त्रामुळेच होईल. त्याबद्दल संशय नको. भक्ताला शाश्वत सत्याबद्दल संशय असेल तर तो मुक्ती मिळवू शकेल का? तसेच सायन्स

**धर्माच्या बाबतीत पश्चिमेकडून आम्हांस काहीच घ्यायचे नसून उलट त्यांना आम्ही पुष्कळ द्यायचे आहे.**

शिकणे आवश्यक आहे. त्याबद्दल संशय बाळगू नये. शिक्षणाचे हे रूप नवीन असेल, शास्त्र परदेशी असेल पण ते शिकणाऱ्या व्यक्तीच्या मनातील समर्पणाची भावना भारतीय असेल. परदेशी ज्ञान तेव्हाच पचेल जेव्हा तुमची मुळे स्वत:च्या देशात खोलवर रुजली असतील.

## माणुसकीचे शिक्षण

मनुष्यत्वाबद्दल बोलताना त्या म्हणतात की मनुष्यत्व ही संकल्पना सर्व ठिकाणी एकच आहे त्यात देशी-परदेशी असा फरक नाही. नीतीच्या संकल्पना, विजय-पराजय, उच्च-नीच या कल्पना सापेक्ष आहेत. हे जगही सापेक्ष आहे. जो उन्नत आत्मा आहे, त्यालाच याचे परीपूर्ण ज्ञान होऊ शकेल. जेव्हा व्यक्ती परदेशी पद्धत स्वीकारते, परदेशी मार्गावरून जाते, जिला मातृभूमीची लाज वाटते अशा व्यक्तीला मनुष्यत्वाची परिपूर्ण संकल्पना समजू शकणार नाही. भगिनी निवेदितांनी प्रत्येक वेळी मातृभूमीचे महत्त्व विशद केलेले आढळते.

## बालशिक्षण

बालशिक्षणाबद्दल व विशेषत: भारतामधील बालशिक्षण विषयक विचार मांडताना भगिनी निवेदिता पाश्चात्त्य पद्धत आणि भारतीय संस्कृती या दोहोंवर आधारित अशा शिक्षणपद्धतीचा विचार करतात. भारतामधील मूळ संस्कृतीला धक्का न लावता, आचारविचार व्रतसंकल्पना न मोडता आधुनिक शिक्षण देता यावे असे त्यांना वाटते.

## भारतीय शाळांमधील बालवाडीचे स्थान

किंडरगार्टन म्हणजे मुलांची बाग, वास्तविक ज्या घरात आई हीच मुलांची 'माळी' असते ते घर म्हणजे मुलांची आदर्शबाग होय. पण दुर्दैवाने कित्येक आयांनाच हे माहीत नसते. आईला शिक्षकाची भूमिका, शिक्षकाचे उद्दिष्ट माहीत नसते तर शाळेत शिक्षकांमध्ये आईच्या अंगातील गुण नसतात. या दोन्हींचे एकत्रिकरण व्हायला हवे असे भगिनी निवेदितांना वाटते.

## व्रतसंकल्पना

हिंदू समाजातील 'व्रत' ही एक संस्कार देणारी संकल्पना आहे. भगिनी निवेदितांच्या मते या व्रताइतकी परिपूर्ण अशी दुसरी कुठलीही शिक्षणसंस्था अस्तित्वात नाही. हे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. यात प्रथम उपासना, त्यानंतर सामाजिक संबंध, व्यवहार पद्धती यासंबंधी शिक्षण दिले जाते. काही धार्मिक संकल्पनांचेही ज्ञान मिळते. उदा. गोसेवा, बीजारोपण, ज्योतिर्विज्ञान इ. ज्या संस्कृतीत वृक्षांची फांदी तोडण्यापूर्वी त्याची परवानगी घेतली जाते. ज्या संस्कृतीमधली मुलगी तुळशीचे पान तोडण्यापूर्वी म्हणते की हे विष्णूप्रिये तुला विष्णूच्या पायावर समर्पित करण्यासाठी तुझी पाने तोडण्याची परवानगी दे' त्या संस्कृतीमधील मुलगी उद्धटपणे वागू शकत नाही.

## क्रीडापद्धती

भगिनी निवेदिता म्हणतात की, भारतातील बालवाडीतील शिक्षण हे धार्मिक व सामाजिक दृष्टिकोनावर आधारित असते तर युरोपातील शिक्षण हे शास्त्रीय बैठकीवर आधारित असते. युरोपमध्ये मुलांचे मन एकाग्र करण्यासाठी एखाद्या स्थूल वस्तूवर आधारित अशी विशिष्ट क्रिया पुन:पुन्हा करून ते पक्क केलं जातं. एखादं गाणं हे खेळ म्हणून

**जीवन आणि बदल एकमेकांपासून वेगळे काढता येणार नाहीत.**
**पण हा बदल अंतरातून स्फुरलेला, स्वयंप्रेरित आणि स्वपरिश्रमांनी साधलेला असा असावा...**

शिकवीलं जातं. त्यात वेगवेगळ्या शारीरिक कृती केल्या जातात. वस्तू, क्रिया, कृती व त्यातून तयार झालेला खेळ अशा चार भागात विभागणी केली जाते. त्यामुळे मुलांना तो जिथे खेळतात ती जागा वेळेची जाणीव, गुणवत्तेची जाणीव, स्वरूपाची जाणीव, कारणमीमांसा इ. गोष्टींचे ज्ञान होते. हे सर्व धडे बालस्वभावावर आधारित असतात.

**भविष्याची पूर्वतयारी**

जेव्हा जनावराची पिल्लं एकमेकांशी खेळतात तेव्हा त्यांच्यावर पूर्वसंस्कार असतात आणि त्यामध्ये भविष्याची चाहूल असते. उदा. दोन मांजरींच्या खेळात त्यांच्यात पुढे कराव्या लागतील अशा शिकारींची तयारी असते. लहान मुलांचेही तसेच असते. त्यांचे रांगणे, खेळणे म्हणजे सर्व अवयवांनी एकत्रितपणे केलेली कृती असते व त्यातूनच त्यांची नैसर्गिक प्रगती होत असते. अश्मयुगापासून माणसाची होत जाणारी प्रगती पाहिली असता असे लक्षात येते की प्रत्येक वेळी माणसाची आहे त्यापेक्षा पुढे जाण्याची ओढ असते. जो निसर्गाला अनुकूल वागतो तो जिंकतो असे बेकन म्हणतो.

**दगड, माती अशी साधने**

भगिनी निवेदितांच्या मते फ्रॉबेलच्या शाळा महागड्या आहेत. भारतात अशा शाळा लगेचच सुरू करणे अवघड आहे. मुलांचा अनुभव हा एखाद्या शब्दाशी जोडला जातो. दगडाला हात लावून 'कठीण' हा शब्द अनुभवता येतो. चिखल, माती, वाळू यापासूनही भारतीय मुलांना शिकविता येईल. भारतीय मुले बुद्धिमान आहेत. फक्त त्यांना त्यासाठी उत्साहित केले पाहिजे. दोन मुलांना चिखलापासून खेळ बनविण्यास सांगितले तर त्यांची आकलनशक्ती लगेच ओळखता येईल व त्यानंतर त्यांना पुढे शिकवता येईल. अशा गोष्टींवरून मुलांची शैक्षणिक पात्रता व प्रत्यक्षात ज्ञान वापरण्याची ताकद समजू शकते. विकतची खेळणी घेऊन मुलांना शिकविण्यापेक्षा कच्च्या मालापासून मुले जी वस्तू तयार करतील त्यात त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळेल. ज्या ठिकाणी कारागीर काम करतात. तेथे मुलांना नेऊन त्यांना प्रत्यक्ष दाखविले तर मुलांना जास्त चांगले समजेल. खेड्यातील मुले असेच पाहून पाहून शिकतात. तसेच एखाद्या नाटकातून मुलांना शिकविता येते.

नवीन शिक्षणाचा वेद म्हणजे स्थूल अनुभवातून सूक्ष्म विचारशक्तीकडे जाणे. मूर्तिपूजेमागचे हेच तत्त्व आहे. सामाजिक संस्कृतिमधील व्रतांमागची संकल्पना ही तीच आहे.

**स्त्री शिक्षण**

भगिनी निवेदिता म्हणतात की, भारतीय स्त्रीला बाहेरचं जग दाखवलं पाहिजे. तिचं सौंदर्य आपल्याला दिसत आहे पण तिचा रडण्याचा आवाज ऐकू येत नाही भारतीय स्त्रीच्या भवितव्याची त्यामुळे काळजी वाटते. जोपर्यंत बाहेरच्या जगाचं दालन तिच्यासाठी खुलं करणार नाही तोवर आमच्या मातृभूमीची नजर खालीच राहील. म्हणूनच भारतात स्त्रियांच्या शिक्षणाची खूप गरज आहे. स्त्रियांच्या सहाय्याशिवाय कोणताही मोठा प्रश्न सुटू शकत नाही.

**पश्चिमेतील शिक्षण पण पाश्चात्यिकरण नव्हे**

भारतीय स्त्रीची ही घडण आहे ती बाजूला करून तिला पाश्चिमात्य स्त्रीप्रमाणे बनविणे म्हणजे तिचे शिक्षण नव्हे. तिचे परंपरागत असलेले सद्गुण हे आजही तेवढेच उपयोगी आहेत. तिच्यामध्ये

**हिंदू धर्माचे जे रत्नभांडार आपणाजवळ आहे त्यातील तत्त्वांशी आणि स्वत:शी एकनिष्ठ राहा. यामुळे केवळ तुमचाच लाभ होणार आहे. असे नसून सर्व जगाचाच लाभ होणार आहे.**

असलेली सहनशक्ती, त्याग, प्रेम हे सर्व सद्गुण यांची पाश्चिमात्य स्त्रियांच्या आक्रमक व्यक्तिमत्त्वाबरोबर तुलना करून त्याबद्दल तिला लाज वाटता कामा नये.

भारतीय स्त्रीला शिक्षण देताना हे महत्त्वाचे आहे की ते शिक्षण तिचे मन व आत्मा यांच्याशी सुसंगत हवे. शिक्षण देताना नेहमीच त्याची पद्धत व हेतू महत्त्वाचा असतो. त्यामुळे भारतीय मुलींना शिक्षण देताना त्यांच्यापुढे कोणते आदर्श ठेवावेत हेही पाहायला हवे अन् आदर्शांबाबत भारताला दुसऱ्या कोणत्याही देशाकडे पाहण्याची गरज नाही.

**स्त्रीपुरुषांना समान शिक्षण**

आत्ताच्या युगात स्त्रीची एक नागरिक म्हणून, सामाजिक व राष्ट्रीय, दोन्ही प्रकारे घडण होईल असे शिक्षण दिले पाहिजे. भूगोल, इतिहास व शास्त्र यांचेही शिक्षण द्यायला हवे. सत्य शोधताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव करू नये स्त्री व पुरुष दोघांनाही ते संशोधन करता यायला हवे. आपल्या राज्याचा इतिहास, रुढी, भाषा, वंश यांचाही अभ्यास व्हावा. तसेच नागरिकशास्त्र, आपले शहर, बदलत गेलेली परिस्थिती याबद्दलही अभ्यास झाला पाहिजे. इतिहासाचा अभ्यास करताना भौगोलिक दृष्टी हवी व भूगोलाचा अभ्यास करताना इतिहासाचे ज्ञान हवे. स्त्रियांमध्ये बौद्धिक शिस्तही यायला हवी. कारण घर हा जगाच्या दृष्टीने एक छोटा बिंदू मानला तर स्त्री ही त्यातील प्रमुख भाग आहे. अन् तिच्या प्रगतिनुसारच सुख व दु:ख निर्माण होईल.

**नवीन तंत्रांचा वापर**

एकदा स्त्रियांच्या शिक्षणाला सुरुवात झाली की एक स्त्री दुसऱ्या भारतीय स्त्रीला शिक्षण देऊ शकेल. स्त्रियांना शिक्षण देताना, भागवत व कठोपनिषद यासारख्या ग्रंथांच्या आधारे शिकवितानाच वेगवेगळ्या स्लाईडस् दाखवून त्यांचे भौगोलिक ज्ञान वाढविता येईल. रामायण, महाभारत व्यतिरिक्त अन्य इतिहासही शिकविता येईल. आरोग्य, स्वच्छता व पर्यावरण याबद्दलही ज्ञान देता येईल. हे ज्ञान मातृभाषेतूनही देता येईल.

शाळा लहान असो की मोठी, घरात असो की बाहेर, प्राथमिक असो की उच्च, शाळा शिक्षणाचे पहिले केंद्र आहे. या शाळा भारतीय जीवनप्रणशलीने युक्त असाव्यात. घरातील शिक्षण वेगळे व बाहेरील शिक्षण वेगळे असे असेल तर ते नुकसानकारक होईल. घरातील नैतिक शिक्षणाशी शाळेतील शिक्षण सुसंगत हवे. मुलांप्रमाणेच मुलींचे शिक्षणही उत्तम प्रकारचे असावे. त्यांच्यासाठी लायब्ररी असावी. देशाच्या इतर भागातील माहिती कळण्यासाठी आपल्या मातृभाषेतून वाङ्मय तयार करावे. यासाठी स्त्रियांनीच मुलभूत काम करायला हवे.

**इंग्रजीने देशी भाषा निस्तेज**

फार पुरातन काळापासून भौगोलिक स्वतंत्र विभाग असलेली अशी एक समाजरचना इथे होती. अन् चांगला समाज निर्माण व्हावा असे शिक्षणही येथे दिले जात होते. त्यावेळच्या काळाच्या आवश्यकतेनुसार सर्व वर्गाला एक विशिष्ट सुखसोयी मिळण्यासाठी स्पर्धा करायला जागा होती. पुरुष किंवा स्त्री यांना स्वत:ची उन्नती व समाजाची घडण देणारे शिक्षण इथे दिले जात होते. आता मात्र हे सर्व बदलले आहे. ईस्ट इंडिया कंपनीमुळे भारत हा व्यापारी जगामधला देश झाला आहे अन् इथल्या कलांचा ऱ्हास झाला आहे. इंग्लिशमुळे संस्कृत,

**ब्रह्मचर्याच्या आदर्शानुरूप हिंदू तरुणांनी आचरण केले पाहिजे.**

हिंदी, द्रविड या भाषांचे सौंदर्य गेले आहे. बदल होणे स्वाभाविक आहे पण बदल म्हणजे परिस्थिती खालावणे किंवा ऱ्हास नव्हे. भारताने नवीन प्रश्न समजून घेतले पाहिजेत. भारताला जुन्या शिक्षणाबरोबर नवीन काळातील शिक्षण घेता येईल असे भगिनी निवेदितांना वाटते.

भारतातील मुलींचं लग्नाचं वय बारा वर्षे असतं. सासरी ती सासूकडून घरकाम वगैरे शिक्षण घेते तसंच संस्कारही मिळतात. पण याबरोबरच तिला शिक्षण, कशिदा काढणे वगैरे गोष्टी यायला हव्यात. स्त्रियांना असं एखाद्या व्यवसायाचं शिक्षण दिलं पाहिजे की ती नवऱ्याला आर्थिक मदत करू शकेल. आत्ताच्या शिक्षणात तिची स्वत:ची उन्नती होत नाही. भारतीय कुटुंबातील काही स्त्रियांचाच शिक्षण घेऊ शकत आहेत. या सर्व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करून भगिनी निवेदितांनी त्याकाळी 'रामकृष्ण कन्या शाळेचा' प्रकल्प तयार केला आहे.

## विधवा व निराधारांचे शिक्षण

गंगेच्या काठी घर घेऊन २० अनाथ मुली व २० विधवा मुली तिथं राहतील. शारदामातेच्या अधिकाराखाली ते सर्व राहील. शाळेचा अभ्यास लहान मुलींसाठी किंडरगार्टनच्य धर्तीवर असेल. बंगाली भाषा, साहित्य, शास्त्र, गणित, कला यावर आधारित शिक्षण दिले जाईल. व्यावसायिकतेचे शिक्षण दिले जाईल. ज्यायोगे प्रत्येक विद्यार्थिनीला स्वत:ची भाकरी मिळविता येईल.

## रोजगाराचे शिक्षण

१८ ते २० वर्षाच्या विधवा स्त्रियांना व्यवसायाचे शिक्षण दिले जाईल व त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना इंग्लंड, अमेरिकेची बाजारपेठ मिळेल. त्यात देशी पद्दतीचं जाम, लोणची, चटण्या या गोष्टी असतील.

## ज्योतसे ज्योत जले।

जर हा प्रकल्प यशस्वी झाला तर प्रत्येक मुलीला देशासाठी आयुष्य द्यायचं की लग्न करायचं हा निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य असेल. जर देशासाठी काम करायचं असेल तर आम्ही सर्व मदत करू व अधिक शिक्षण देऊ. मोठ्या स्त्रिया पालक म्हणून काम करतील व त्या रामकृष्ण मिशनच्या शाळा अन्य ठिकाणी सुरू करतील.

भगिनी निवेदितांनी अशा पद्धतीने बालशिक्षण. स्त्रीशिक्षण व एकूणच शिक्षणविषयक समग्र चिंतन करून विविध लेखांमधून आपल्यापुढे मांडले होते. तंत्रशिक्षणबद्दलही त्या आग्रही होत्या. माध्यमिक शिक्षणात वर्गामध्ये सुतारकामासारखे, मेटलवर्कसारखे काही विषय शिकवले पाहिजेत असे त्यांना वाटत होते. एकूणच शिक्षणाने त्या व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हावा असा विचार करून मुलांचा अभ्यासक्रम आखला जावा असा त्यांचा आग्रह होता. शिक्षणाने आर्थिक स्वावलंबन मिळावे तसेच व्यक्तिमत्त्व विकासात आंतरिक विकासही व्हावा असे विचार त्यांनी वेळोवेळी मांडले स्त्रियांना केवळ लिहिणे-वाचणे न शिकविता अर्थार्जन करण्याइतपत ज्ञान मिळावे व त्या स्वावलंबी कशा होतील ते पहावे असे त्यांना वाटत होते. असे केल्यानेच स्त्रियांना त्यांच्या दु:स्थितीतून बाहेर पडता येईल; अंध:श्रद्धेवर मात करता येईल असे त्यांना वाटते. समाजात स्त्री-पुरुष दोघेही महत्त्वाचे आहेत. त्यामुळे दोघांचीही प्रगती झाली तरच समाजाची प्रगती होईल असे विचार त्यांनी मांडले आहेत. हे त्यांचे विचार काळाच्या कितीतरी पुढे जाऊन केले आहेत. त्यांचे

**हिंदुस्थान हा एकीभूत आहे, शक्तिपूर्ण,अभिमानपूर्ण, भविष्यसंपन्न आहे.एक दिवस असा येईल की हे सर्वांनाच उमगेल.**

शिक्षण विषयक विचार आजही आपल्याला विचार करण्यास प्रवृत्त करतात. एक विदेशी स्त्री भारतात येऊन इथल्या माणसांशी, चालीरितींशी, संस्कृतीशी एकरूप होऊन त्याच्या प्रगतीचा ध्यास घेते अन् त्यासाठी सर्वस्व समर्पित करते हे खरोखरच आश्चर्यकारक नव्हे काय? या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा हा अलौकिक ध्यास वेळोवेळी अभ्यासावा असाच आहे.

**संकल्पित विद्यापीठ**

विद्यापीठ शिक्षणात शास्त्रज्ञान व तंत्रज्ञानास अधिक स्थान मिळावे अशी निवेदितांची दृष्टी होती. आजही या दोन्हींचे महत्त्व टिकून आहे, वाढते आहे, टाटांच्या मोठ्या मदतीतून १०० वर्षांपूर्वी विज्ञान विषयाचे अद्ययावत शिक्षण भारतीय युवा पिढीस मिळावे यासाठी विद्यापीठ स्थापनेची मोठी योजना निवेदितांनी लिहून काढली होती. त्यासाठी तत्कालीन भारतमंत्री, स्वत: श्री. टाटा व निवेदिता यांची बैठक झाली होती पण सरकारचा दृष्टिकोन अनुकूल दिसला नाही. ही मोठी देणगी मिळवून इंग्रजी वर्चस्व राहणारे, इंग्रजी दृष्टिकोन निर्णायक ठरणारे विद्यापीठ सुरू करण्याला सरकारची अनुकूलता होती पण निवेदितांना अशी योजना मान्य होणे शक्यच नव्हते. त्यामुळे विद्यापीठ स्थापन करण्याची त्यांची इच्छा अपूर्णच राहिली पण त्यांनी त्यावेळी केलेला विद्यापीठ स्थापनेमागचा विचार आजही तितकाच उपयुक्त आहे.

✻ ✻ ✻

*With Best Compliments From*

**DONATE GENEROUSLY FOR :**
**VANAVASI WELFARE**

TO

***SHREE SUNDERNARAYAN GANESH SANSKAR KENDRA***

**DEOBANDH, TALUKA KHODALA, DIST. THANE**

❖ **INSERTED BY** ❖

**S. R. PUSALKAR & CO.**

MUMBAI

With Best Compliments From :

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

Plot No. 4, S. No. 17/1-B, Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune 411 038
Ph : 25431474, 25441124, 25464551
E-mail : adept@vsnl.com

**प्रथम म्हणजे हिंदू मातांनी आपल्या मुलांच्या मध्ये ब्रह्मचर्याची आस निर्माण केली पाहिजे, ब्रह्मचर्याविना देशाची शक्ती विलयाला जात आहे.**

# भगिनी निवेदितांचे राष्ट्रविषयक विचार

-डॉ. सौ. सुरुची पांडे

स्वामी विवेकानंदांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या भगिनी निवेदिता; त्यांचं विदेशीपण कुठच्या कुठं पुसून गेलं होतं. भारतीय स्त्रिया, घरं, जीवनपद्धती, हिंदू विचारसरणी, राष्ट्रीय शिक्षण, आपदा निवारण कार्य-अशा असंख्य विषयावर त्यांनी काम केलं, लिहिलं. भारतातलं जे जे सत्य सुंदर आहे, ते ते पाश्चात्य जगापर्यंत पोहोचवण्याचा सतत प्रयत्न केला. खरं तर भारताच्या संदर्भात त्यांचा कार्यकाल जेमतेम बारा वर्षांचा. भगिनी निवेदितांचं वर्णन करायचं, तर सहजच मला कवी बा.भ. बोरकर यांच्या एका कवितेच्या ओळी आठवल्या.

''प्रार्थना तीच, सतत सहज
असीम उर्ध्वाचा शोध घेत
ती प्राणांत उमलू लागताच
माणसाचाच होतो अवधूत अश्वत्थ ...
प्रार्थनाच प्रसाद होऊन
तेवू लागते ज्योतीसारखी
पण काजळीशिवाय सावलीशिवाय''

भगिनी निवेदितांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आपलं योगदान दिलेलं होतं. जहाल आणि मवाळ दोन्ही कार्यकर्त्यांना त्या आपल्याच वाटतं. निवेदितांचे भारताच्या स्वातंत्र्याबद्दलचे विचार जंगलीपणाकडे झुकणारे होते; परंतु जेव्हा त्यांना शक्य होतं तेव्हा तेव्हा आततायी कृत्य करण्यापासून तरुणांना परावृत्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. काँग्रेसच्या अधिवेशनांना त्या उपस्थित राहत. परंतु त्यांचे विचार अधिक मूलगामी होते. राष्ट्रध्वजाच्या कामनेवर विचार मांडताना, ध्वजाचे चित्र तयार करताना त्यांनी भारतीय संस्कृतीतील उदात्त अशा दधीचि ऋषींच्या कथेचा, वज्रचिन्हाचा खूप गंभीर विचार केलेला दिसतो. भारताचा अवमान करणारी ब्रिटीश अधिकाऱ्यांची भाषा ऐकून त्या संतापत. त्याहून त्यांना जास्त संताप येई तो बंगाली तरुणांच्यात गुळमुळीतपणा दिसला की! भारतातील स्वातंत्र्य चळवळीदरम्यान चाललेले पक्षांचे राजकारण, फाटाफूट पाहून त्यांना मनस्वी दुःख होई. कारण त्यांच्या लेखी केवळ राष्ट्रीयता महत्त्वाची होती. राष्ट्रीयतेतून भगिनी निवेदितांचे विचार समजून घेणं ही तर आजच्या काळाचीही महत्त्वाची गरज आहे. त्या म्हणतात :

''राष्ट्रीयतेची निर्मिती ही भारतीय मनापुढची महत्त्वाची समस्या आहे. आणि हे व्हायला हवं असेल तर इतिहासाचं भान आलं पाहिजे. पुराणवास्तू-शास्त्रातील तसंच सामाजिक आणि आर्थिक माहितीचे दुवे गोळा करणं म्हणजे इतिहासाची जाण नव्हे. जन्मभूमी म्हणून की कुळाचा अभिमान म्हणून की प्राचीन संस्कृतीचा अभिमान बाळगणं पुरेसं असतं का? याच्या भरीला काय हवं असतं तर समन्वय साधणारं दुर्दम्य मन, सहकार्याची उपजत जाणीव आणि बंधुत्वाची भावना.''

राष्ट्राबद्दलचे आपले विचार, प्रेम आणि आकर्षण याचा नेहमी चिकित्सक विचार व्हायला पाहिजे त्याला परीक्षणाची चाळणी लागली पाहिजे. प्रेमाबरोबर ज्ञानाचा प्रकाश असला पाहिजे. 'भारत

**आपल्या देशात विद्यार्थीजीवनाचा जेवढा उच्च आदर्श समोर ठेवलेला आहे, तेवढा कोणत्याच देशात नाही आणि हा आदर्श हिंदुस्थानातच लयास गेला तर जगाने बघायचे तरी कोणाकडे?**

एक आहे' हा विचार लोकांच्या विचारांत असला पाहिजे. भारत खरंच एक आहे, बंधूंनो ! पण किती विखुरलेला. कशामुळे विखुरलेला? इथं किती किती जाती जमाती आहेत म्हणून. खरं तर हिंदू धर्मानं मूलभूत एकत्रीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या परंपरा आणि संस्कृती देवू केली. खरंच राष्ट्र हे मर्यादित, संकुचित, खुजं कधीच नसतं ! त्याच्या पोटात साऱ्यांसाठी जागा असते; राष्ट्र साऱ्यांना प्रेम देऊ शकतं. संघर्षाचा इतिहास देखील ऐक्याचा पाया ठरू शकतो. भारतीय एकतेचं भविष्य पाहायचं तर भारतीय वस्तूंचही प्रेम हवं. 'स्वदेश' हा शब्द तेच तर सूचित करतो. या भूमीच्या मातीचं गाणं तिच्या साऱ्या स्वप्नांमधेही रुणझुणत जाऊ दे ना! भारतीयांनी भारताच्या कल्याणासाठी जीव लावून द्यावा, तळमळून काम करावं.

भूतकाळात भारत हे सुसंघटित राष्ट्र नव्हतं, हे समजण्याची चूक करू नका. ख्रिस्ताच्या कितीतरी पूर्वी अशोक होता. ख्रिस्तोत्तर काळात चंद्रगुप्त विक्रमादित्य होता... आज मात्र सर्वसामान्य माणसाला जोवर भारताचं प्रेम उमजत नाही, भारताच्या हितासाठी त्याला आपापली जबाबदारी समजत नाही तोपर्यंत राष्ट्रीयता कळणं कठीण आहे. आज आता राजेरजवाड्यांची सिंहासनं राहिलेली नाहीत पण मातृभूमी वाचवण्यासाठी राष्ट्रीयतेची भावना हवी आहे.... सामर्थ्य हवं आहे मित्रांनो !... आपल्याला आपल्या खेड्यांबद्दल आणि घराबद्दल प्रेम असतं की नाही ? आपल्या नद्या आणि पर्वत आपल्याला प्रिय असतात की नाही? मग आपल्याला भारताबद्दल प्रेम कसं असणार नाही?... गरज आहे ती नत होऊन आपल्या साऱ्यांच्या या मातृभूमीला प्रेम देण्याची. यातूनच उत्कर्ष होईल... ठायी ठायी गुंजत आहे. आपल्यासाठी तो चिरंतन, सनातन नाद - 'उत्तिष्ठत ! जाग्रत !'

* * *

*''जीवनात सर्व ठिकाणी क्रीडांगणावरील आदर्श आढळतात. 'लाभ नव्हे, फक्त सन्मान' हे प्रत्येक उदात्त जीवनाचे मार्गदर्शक तत्त्व बनते; आणि हे तत्त्वच उत्तरोत्तर साकार होऊन आत्मतेजानं तळपू लागते. हा सन्मान म्हणजे ऐहिक कीर्ती नव्हे किंवा समाजाने दाखवलेली सहानुभूति अगर थोरवीची जाणीव नव्हे, तर एकांतातील प्रार्थनेच्या काळात अंतरात्म्याला जाणवणारी उन्नती. मंदिरात तेवत असलेली प्रकाशज्योत जीवाशिवाला एकदमच प्रकाशमान करते. मात्र हे गुपित एक देवाला ठाऊक, की एक भक्ताला!''*

– भगिनी निवेदिता


**नील इंजिनियर्स**

*नील सिव्हील इंजिनियरींग*
*वॉटर मॅनेजमेंट सर्व्हिसेस*

**श्री पराग लकडे**

फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

ब्लॉक नं १०, युनिट नं. २
सद्गुरु जंगली महाराज सोसायटी
सेनापती बापट रोड,
पुणे ४११ ०१६


**आपल्या देशाची वैशिष्ट्ये परकीय भाषेतून शिकून कधीच कळणार नाहीत.**

# यशोगाथा

*या सदरात काही धडपडणाऱ्या युवक-युवतींचे प्रेरणादायी अनुभव मांडले आहेत.*

## कंदिलाच्या उजेडात शिकलेली 'तेजश्री'...

वर्धिनीच्या इमारतीचा पहिला टप्पा पूर्ण झाला होता. 'पाकोळी' बालवाडीच्या रुपाने एक नवीन प्रकल्प इमारतीत सुरू झाला आणि त्याच सुमारास परिसरातील ५वी-६वी मधील काही मुली वर्धिनीत यायला लागल्या. श्री. सुनील कुलकर्णी सर त्यांना अभ्यास मार्गदर्शन करीत होते. त्यातूनच पुढे भगिनी निवेदिता ही मुलींची स्वतंत्र शाखा देखील सुरू झाली. शाखेत येणाऱ्या या मुली होत्या अतिशय उत्साही. सुटीच्या काळात 'आम्ही काय करू?' या त्यांच्या प्रश्नाला उत्तर मिळाले 'समोरच्या वस्तीत रहाणारी लहान मुलं बघा. ती शाळेत जात नाहीत. जी जातात ती अभ्यास करीत नाहीत. त्या मुलांसाठी एक संस्कार वर्ग तुम्ही सगळे मिळून सुरू करा' लगेचच जवळच्याच एका झाडाच्या सावलीत हा संस्कार वर्ग सुरू झाला. सर्व उत्साही चिमण्या अभ्यास घेऊ लागल्या, गाणी शिकवू लागल्या. एकदा त्यांच्या लक्षात आले की वर्गातील सगळी मुलं जमिनीवर बसूनच शिकतात. आपण त्यांच्यासाठी सतरंजी आणायला हवी. सगळ्यांनी ठरवले आणि आपल्या खाऊच्या पैशातून सतरंजी खरेदी करायला गेल्या. लक्ष्मी रोडवर एका दुकानात चौकशी केली. दुकानदाराने किंमत सांगितल्यावर सगळ्यांची कुजबुज सुरू झाली. दुकानदार पहात होता. या छोट्या छोट्या पण चुणचुणीत मुलींच्या चेहऱ्यावरील चिंताही त्याने टिपली आणि विचारले,'तुम्हाला सतरंजी कशाला हवीयं?' 'आम्ही एक संस्कार वर्ग चालवतो, त्या वर्गाला येणाऱ्या मुलांना बसायला सतरंजी हवी पण आमच्याकडे तेवढे पैसे नाहीत' त्यांच्यातील एकीनं धीटपणान सांगितलं. दुकानदार हसले, म्हणाले 'अस आहे ना! मग माझ्याकडून ही सतरंजी तुम्हाला भेट'. दुकानदारानं भेट दिलेली सतरंजी जग जिंकल्याच्या आनंदात वर्धिनीत घेऊन आल्या आणि दुप्पट उत्साहाने कामाला लागल्या. या गटातीलच एक 'तेजश्री'.

आईबरोबर मामाकडे राहणारी. मामाच्या घरचीही आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. पण मिळालेला आसराही महत्त्वाचा होता. घरात वीज नव्हती, पण ही अडचण आहे असं तिच्या चेहऱ्यावरून कधी दिसलं नाही. कलाशाखेची पदवी आणि एम.एस.डब्ल्यु. ची पदवी मिळेपर्यंत या परिस्थितीत काहीही फरक पडला नाही आणि तिच्या चेहऱ्यावरील प्रसन्नतेतही.

बारावीच्या परीक्षेनंतर ती, तिच्याच बरोबरीची दिपाली अशा दोघीजणी वर्धिनीच्या दहा युवकांबरोबर नागपूरला गेल्या होत्या. निमित्त होतं एका अभ्यास/अनुभूती शिबिराचं. नागपूरच्या परिसरातील फासेपारधी समाजाने त्यांच्यावर झालेल्या अन्याय व अत्याचाराचा निषेध म्हणून धर्मत्याग करण्याची घोषणा केली होती. एका वेगळ्याच सामाजिक प्रश्नाचा या निमित्ताने अभ्यास करावा व शक्य होईल तितकं पारधी समाजातील लोकांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांना शांत करावे अशासाठी म्हटलं तर हे

**राष्ट्राचा उत्कर्ष तुमच्या डोळ्यासमोर सदैव असू दे.**

अभ्यास शिबिर होतं. या दौऱ्यातील प्रत्येकाला एकेका पारधी वस्तीवर सोडण्यात आले व त्यांनी तेथे राहून या समस्येवर काम करायचे होते. दीपाली आणि तेजश्री या दोघीही दोन वेगळ्या वस्त्यांवर राहिल्या. कमालीचा अविश्वास व्यक्त करणाऱ्या टोकाच्या तीव्र प्रतिक्रिया सहन करूनही आपल्या स्नेहपूर्ण वागण्यानं त्यांच्यामध्ये विश्वास उत्पन्न करु शकल्या. हा विश्वास इतका बसला, हे नातं पहाता पहाता इतकं जवळकीचं झाल की पुण्याला परतण्याच्या दिवशी दोघीही रहात असलेल्या वस्तीतील सर्व लोक त्यांना सोडायला रेल्वे स्टेशनवर आले, आणि म्हणू लागले ताई तुम्ही जाऊ नका ! आमच्या वस्तीवरच रहा !

शिक्षणानंतर तेजश्री आज एका शासकीय खात्यामध्ये द्वितीय श्रेणी अधिकारी म्हणून काम करीत आहे. वर्धिनीच्या रोजच्या शाखेमधून आणि वेगवेगळी शिबिरे, सहली अभ्यासदौरे यातून तिचे व्यक्तिमत्व असे घडले की अधिकारी म्हणून काम करताना सर्वांना विश्वासात घेऊन काम करायचे, जे नियम आहेत त्याचे १०० टक्के पालन झालेच पाहिजे यासाठी आग्रही रहायचे या गोष्टी ती सहजपणे करु शकली. 'ही आजची पोरगी आम्हाला काय अडवू शकतेयं' असं वाटणाऱ्या अनुभवी कार्यालयीन कर्मचाऱ्यांना आणि राजकीय नेत्यांनाही तिने नियमांच्या चौकटीत चालायला शिकवले. शासनाच्या विविध योजना ज्या समाजासाठी आहेत त्यांना त्याचा पूर्ण लाभ मिळाला पाहिजे यासाठी ती झटू लागली. तिच्या आजवरच्या शासकीय सेवेतील कर्तृत्त्व सांगायचे तर वागनीदाखल ही उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत.....

- तिच्या कार्यक्षेत्रातील एका गावात पारध्यांच्या वस्तीतील मुलांना शाळेत येऊ देण्यास विरोध होता. नियमांच्या आधारे तिने गावाला हा निर्णय बदलायला लावला.
- तिच्या कार्यक्षेत्रातील एकूण १६ गावे निर्मलग्राम पुरस्कार पात्रता निकष पूर्ण करणारी झाली आहेत. तसेच पुण्यामध्ये राष्ट्रपतीच्या हस्ते निर्मलग्राम पुरस्कार वितरणाचा जो कार्यक्रम झाला होता त्या कार्यक्रमाच्या संयोजन समितीत काम करण्याची संधी तिला मिळाली. वर्धिनीच्या कार्यक्रमांमध्ये नियोजनाबाबत जो आग्रह धरला जातो, मिनिटा-मिनिटाचे जे मोल लक्षात आणुन दिले जाते त्याचा उपयोग या समितीत काम करताना मला खूप झाला, असं ती अगत्याने सांगते.
- कुपोषित बालकांच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाची 'ग्राम बालविकास केंद्र' नावाची योजना आहे. या योजनेत तीस दिवसांच्या कालावधीत कुपोषित बालकांची तब्येत सुधारण्यासाठी काही विशेष कार्यक्रम राबविले जातात. तेजश्रीच्या अखत्यारीतील एका गावात तिने ही योजना राबवली ती सुद्धा लोकसहभागातून. तिला या योजनेत मिळालेले यश पाहून खात्याने तिचा 'कुपोषण निर्मूलन अभियान' समितीमध्ये समावेश केला आहे. 'भान ठेऊन योजना आखा आणि बेभान होऊन त्या राबवा' असं वर्धिनीत झालेल्या व्याख्यानांमधुन, अनौपचारिक गप्पांतून अनेकदा ऐकले होते पण आता प्रत्यक्ष काम करताना ही वाक्येच प्रेरणा देतात असा तिचा अनुभव असल्याचे ती आवर्जून सांगते.

**केवळ वाचन वा लेखन वा पोकळ वक्तृत्त्व यांच्या मागे लागू नका... सर्व देशाचा विचार मनासोबत असू द्या.**

## ‘योगायोगाने’ नव्हे तर ‘ठरवून’ केलेली वाटचाल...

वर्धिनीमध्ये विद्यार्थी सामान्यपणे ५ वी - ६ वी मध्ये असताना प्रवेश करतात. रोजच्या शाखेत होणारे खेळ, अभ्यास तासिका, सुट्यांमध्ये होणारी व्याख्याने, गटकार्ये, गडकोटांना दिल्या जाणाऱ्या भेटी, निवासी शिबिरे, अन्य सामाजिक उपक्रम अशा वेगवेगळ्या पण अखंड चालू असलेल्या कार्यक्रमातून वर्धक वर्धिका प्रवास करीत असतात. या प्रवासामध्ये त्यांचे कळत नकळत निरीक्षण होत असते. त्यातून एखाद्या वर्धक किंवा वर्धिकेचे व्यक्तिमत्त्व कसे आहे याचा अंदाज येत जातो. केदार पारगावकर या युवकाची विद्यार्थीदशेतून होत गेलेली वाटचाल पाहताना अनेकांनी हे अनुभवले होते की एखादी गोष्ट केदारने करावी असे वाटले तरी ती मनापासून पटल्याखेरीज तो कधी करणार नाही पण एकदा गोष्ट त्याने करायचे मान्य केले की अत्यंत शिस्तीने, नेमकेपणाने आणि व्यवस्थितपणे तो ती करणार असं त्यांचं व्यक्तिमत्त्व होते आणि आहे.

मुलांच्या घडणीमध्ये त्यांच्या पालकांचाही महत्त्वाचा सहभाग असतो. मुलं आपल्या भविष्याची स्वप्नं पाहतात तसे त्यांचे पालकही मुलांच्या भविष्याची स्वप्नं रंगतवतात. ज्यावेळी हे दोन्ही घटक जुळतात त्यावेळी पुढचा प्रवास सुकर होतो पण काही वेळा पालकांच्या अपेक्षा आणि मुलांची स्वप्न अत्यंत वेगळी असतात अशा वेळी परिस्थिती नाजुक बनते. केदारच्या बाबतीतही काहीसं असंच घडलं. पालकांना मनापासून वाटत होतं की त्याने १२ वी नंतर ऑपटेक इंजिनिअरिंगचं शिक्षण पूर्ण करावं पण केदारचा कल वेगळ्याच विषयाकडे होता. अखेर केदारच्या आग्रहापुढे/निग्रहापुढे पालकांनी आपला आग्रह बाजूला ठेवून त्याच्या स्वप्नात रंग भरायला सुरुवात केली. केदारने सर परशुरामभाऊ महाविद्यालयात कलाशाखेत प्रवेश घेतला आणि बी.ए.ला पुणे विद्यापीठात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तत्त्वज्ञान हा त्याचा मुख्य विषय होता.

पदवी शिक्षणानंतर केदारने पुण्यातील कबीरबाग मठ संस्थेच्या ‘योगवैद्यक पदविका’ अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. दोन वर्षे कालावधीचा हा अभ्यासक्रम ही वेगळ्या वाटेवरची वाटचाल होती. पण केदार ठाम होता. ध्यानधारणा, साधना, योगचिकित्सा, आयुर्वेद असे त्याच्या आवडीचे विषय या अभ्यासक्रमात होते. केदारने अत्यंत मनापासून हा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि अंतिम परीक्षेत तो पहिला आला. अशी पदविका मिळवून स्वत:चे योगचिकित्सा केंद्र सुरू करण्याचे त्याच्या मनात आधीपासून होतेच पण या क्षेत्रातील ज्येष्ठांकडून पुरेसा अनुभव घेऊन मग त्याने या मार्गावरून स्वत:ची ठाम वाटचाल सुरू केली. त्याच्या या वाटचालीत याच क्षेत्रातील सहधर्मचारिणी त्याला लाभली आहे. हाच अभ्यासक्रम पूर्ण केलेली आणि बी.ए. ला पुणे विद्यापीठात प्रथम आलेली त्याची पत्नी आज त्याच्याबरोबर या व्यवसायात त्याच्याइतकीच झोकून देऊन काम करते आहे.

२००४ च्या डिसेंबर महिन्यात स्वत:चे योगचिकित्सा केंद्र सुरू करणाऱ्या केदारने आजवर किमान ३५०० रुग्णांना निसर्गोपचार आणि योगचिकित्सेच्या आधारे पूर्ण बरे केले आहे. या ३५०० रुग्णांमध्ये किमान १००० रुग्ण असे होते ज्यांना मान, कंबर, गुडघे यांचे गंभीर आजार होते आणि त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर्सनी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला

**स्वत:मध्ये क्रांती घडवून आणण्यामधे हिंदू धर्माइतका अन्य कोणताच धर्म प्रभावी नाही.**

दिला होता. पण कुठल्याही शस्त्रक्रियेशिवाय या सर्वांची त्या आजारातून सुटका झाली आहे.

एका योगचिकित्सा केंद्राची आता चार केंद्रे झाली आहेत आणि या दोघांशिवाय १५ सहाय्यक त्यांच्या मदतीला आहेत. वेळ पुरत नाही इतके काम आहे. शारीरिक व्याधी दूर व्हाव्यात म्हणून येणारे रुग्ण जसे आहेत तसे मोठ्या मोठ्या पदांचा भार सांभाळणारे अधिकारी, व्यावसायिक ताणतणाव, डिप्रेशन अशा मानसिक व्याधीतून बरे होण्यासाठी या केंद्रांमध्ये येतात योगवैद्यक अभ्यासक्रमानंतर या व्यवसायाला पूरक जे जे नवीन शिकता येईल ते ते शिकण्याचा प्रयत्न केला व त्यातील उपयुक्त नव्या उपचार पद्धती सहजपणे स्विकारल्या. आजवरच्या या क्षेत्रातील त्याचे अनुभव त्याने एक सी.डी व दोन पुस्तकांच्या रूपाने शब्दबद्ध केले आहेत.

## मंगलही आणि प्रसन्नही

मंगल... एक अतिशय प्रसन्न मुलगी. स्वभावानंही अगदी साधी सरळ. वर्धिनीत ६ वी-७ वीच्या दरम्यान आली. वर्धिनीतील शिक्षक आणि कार्यकर्त्यांविषयी मनापासून आदर बाळगणारी. सांगितलेलं प्रत्येक काम कुठलेही आढेवेढे न घेता करणारी. वयाच्या टप्प्यानुसार येणारा बंडखोरपणाही तिच्यात आला; पण त्यालाही एक सोज्ज्वळतेचा स्पर्श असायचा. ती आणि तिच्या अन्य चार मैत्रिणी असा त्यांचा गट. सतत मुलांशी बरोबरी करून मुली म्हणून आपल्यावरच्या अन्यायाबद्दल झगडणारा.

पाहता पाहता मंगल शालेय शिक्षण संपवून वर्धिनीचं काम करणारी कार्यकर्ती झाली. येथपर्यंतचा प्रवास तसा अन्य वर्धक वर्धिकांप्रमाणेच होता. पदवी


**स्वस्तिक एंटरप्राईजेस**

*शीट मेटल वर्क्स-पॅनल मॅन्युफॅक्चरिंग*

डी/१०, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक

**श्री. अजय कुंभारे**
**मो. ९८२२६ ६२४८०**

*With Best Compliments From*

**M/S. KBC SYSTEMS**

**(WALK IN COLD ROOM SUPPLIER)**

**श्री. विजय बने**
**मोबा. ९३७३८ ८८१०१**

Servey No. C 3/2,
Near Vidyut Control,
Old NDA Road, Post-Shivne,
Tal. Haveli, Pune 411 023.


**निरनिराळ्या कालखंडात जे विविध धर्म अथवा संस्कृती हिंदू धर्मास प्रतिस्पर्धी म्हणून उभ्या राहिल्या, त्या सर्वांना हिंदू धर्माने पोटात घालून स्वत:स सामर्थ्यसंपन्न केले.**

शिक्षण संपण्याच्या शेवटच्या वर्षात तिनं निर्णय घेतला की, मनिषाताईसारखं पूर्वांचलात जाऊन वनवासी कल्याण आश्रमाचं काम करायचं. आणि या टप्प्यापासून मंगलची वेगळी चुणूक दिसायला लागली. मंगल कसं काम करू शकेल असं काहींना वाटत होतं. एका युवकानं तर तिला जाऊन सल्ला दिला की अशी महत्त्वाची वर्षे वाया घालवण्याऐवजी तिनं आपल्या 'करिअरचा' अधिक विचार करावा. पण मंगल आपल्या निर्णयावर ठाम होती आणि पाहता पाहता घरच्यांचा आशीर्वाद घेऊन वनवासी कल्याण आश्रमाची पूर्णवेळ कार्यकर्ती म्हणून मंगल आसामला जाऊन पोहोचली.

पहिले दोन महिने ती एका वसतीगृहाचं काम पाहत होती. त्या कालावधीत तिनं कामचलाऊ आसामी भाषा शिकून घेतली. वर्धिनीच्या शाखेत काम करताना गुणांचा विकास कसा होत असतो हे एरवी लक्षातही येत नाही, पण आसाममध्ये उदालगुडी या गावी ती काम करताना तिनं केलेलं काम वेगळीच छाप पाडून गेलं. संथाल, राभा, बोडो, बंगाली, आसामी, नेपाळी अशा वेगवेगळ्या भाषिक आणि वेगवेगळ्या जाती-जमाती-मधील ७५० महिलांना एकत्र आणण्याच्या एका कार्यक्रमाचं तिनं यशस्वी आयोजन केलं. इतक्या मोठ्या संख्येने वेगवेगळ्या भाषिक आणि जातीजमातींच्या महिला पहिल्यांदाच एकत्र आल्या होत्या. या सगळ्यांशी मंगलने व्यक्तिगत संपर्क केला होता आणि तो ही सायकल रपेट करून. आलेल्या महिलांच्या जेवणाची व्यवस्था स्थानिक व्यावसायिकांच्या मदतीनं मार्गी लावली. आणि आपण सगळ्या एक आहोत हा विचार रुजविण्याचा प्रयत्न केला.

तिची कामाची पद्धत, मिसळून जाण्यातली तिची सहजता यामुळे तिला हरिसिंगा गावी काम सोपविण्यात आलं. हरिसिंगा हे बोडो आंदोलनाचा प्रभाव असलेलं गाव, त्यामुळे या गावात आंदोलनं, बंद, बॉम्ब-स्फोटाच्या घटना सतत घडत असायच्या. या गावी तिला बोडो लोकांमध्ये प्रत्यक्ष राहून काम करायचं होतं. आपल्या लाघवी, निर्मळ आणि प्रसन्न वागण्यानं मंगलने या लोकांना आपलंसं केलं. या बाथो लोकांच्या परंपरा, त्यांची पारंपरिक गाणी टिकावी म्हणून त्याच्या कॅसेट तयार करायच्या, बाथो बोडो आणि वनवासी कल्याण आश्रमाच्या लोकांमध्ये समन्वय घडवून आणायचा, हे काम तिनं लीलया पेललं. बब्रुवल स्वर्गियारी या बाथो जमातीतल्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या घरी मंगल रहायची. ती त्यांची मुलगीच झाली. त्यामुळे मंगलला ते कधीही एकटं बाहेर जाऊ द्यायचे नाहीत कारण त्या काळात बोडो आंदोलन तीव्र होते. बाथो बोडोंमध्ये राहून मंगलनी एक पूर्वप्राथमिक शाळा सुरू केली. ही शाळा आजही व्यवस्थित सुरू आहे. एकूण अडीच वर्षे मंगलने या भागात काम केलं; पण त्या काळात ती इतकी आसामची झाली होती की पुण्याला आल्यावर एक दिवसही तिला करमायचं नाही. या काळात एकदा दिवाळीच्या आसपासच ती पुण्यात आली होती. साहजिकच घरच्यांनी दिवाळी करून जाण्याविषयी म्हटलं पण हिच्या डोळ्यात पाणी. मला पुण्यात करमत नाही मला जाऊ द्या. आणि खरेच दोन दिवसात आपल्या हरिसिंगामधील घरी जाण्यासाठी मंगल निघाली.

मंगल तिथे काय जेवायची? बेचव भाताला मीठ लावून. कारण उघड होतं. कधी मासे खाल्लेले नाहीत,

**आजच्या हिंदुस्थानची विशेष मनोभावना असली पाहिजे.**

ते खाण्याची शक्यता नाही आणि भाज्या करून खाव्या तर सततची होणारी आंदोलनं, बंद, बॉम्बस्फोटा सारख्या घटना यामुळे कोथिंबिरीसारखी वस्तूही २५/- रुपयांच्या खाली मिळायची नाही. आणि तरीही मंगलचा ओढा हरिसिंगाकडेच होता. या अडीच वर्षांच्या कामामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच झळाळी आली हे निश्चित. मंगल पुण्यात २००० साली परतली. आता पुढे काय? हा तिच्यापुढे प्रश्न नव्हता. तिचा निर्णय तिनं केला होता की आपण शिक्षिका व्हायचं आणि त्यासाठी बी.एड्. शिक्षण पूर्ण करायचं. ती पुण्यात परत आली तोपर्यंत बी.एड. कॉलेजेस सुरू होऊन काही काळ गेला होता. थोडी शोधाशोध केल्यावर नगरच्या बी.एड. महाविद्यालयाने प्रवेश देण्याची तयारी दाखवली पण झालेला अभ्यास तिचा तिलाच भरून काढायचा होता. या महाविद्यालया जवळच देखणे मावशीच्या घरी तिची राहण्याची व्यवस्था झाली आणि एका वेगळ्या दिनक्रमात मंगल अडकली. मागचा अभ्यासक्रम भरून काढत आणि चालू अभ्यासात झोकून देऊन सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी होत मंगलने बी.एड. पूर्ण केले. ७८ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात दुसरी आली.

तिच्याच गुणांच्या आधारावर पुण्यातील एका ख्यातनाम शिक्षण संस्थेच्या शाळेत ती आज शिक्षिका म्हणून नोकरीस आहे. योग्य टप्यावर तिला सुयोग्य असा जीवनसाथीही मिळाला. सासू-सासरे, पती व दोन मुलं असा सुखी संसार करणारी मंगल शाळेतही सर्वांना हवी हवीशी वाटते. ज्या ज्या वर्गांची जबाबदारी तिच्यावर सोपवली गेली त्या त्या वर्गातील प्रत्येक मुलाशी-मुलीशी आणि त्यांच्या पालकांशी तिचं अगदी आत्मियतेचं नातं आहे. एखाद्या विषयात कच्च्या असलेल्या विद्यार्थ्यांची जबाबदारी त्याच्याच वर्गातील एखाद्या हुषार मुलावर सोपवून तिने अशा मुलांचा आत्मविश्वास वाढविला. मुलांवर पूर्ण विश्वास ठेवून मंगल सर्व कामात अग्रेसर असते. कृतीसंशोधन पुरस्काराची ती मानकरी ठरली, जिल्हापरिषदेनी १८५७ स्वातंत्र्य-समराच्या १५० व्या स्मरणदिनाच्या निमित्ताने घेतलेल्या निबंध-स्पर्धेत ती दुसऱ्या क्रमांकाची विजेती ठरली. शालेय स्तरावर आपल्या विद्यार्थ्यांच्या मनापासूनच्या सहभागातून हस्तलिखिताचा प्रथम पुरस्कार तिच्या वर्गाला सातत्याने मिळत आला आहे. जी जी जबाबदारी शाळेने तिच्यावर सोपवली ती ती जबाबदारी तिने समर्थपणे सांभाळली आणि त्यामुळेच तिच्याबद्दल विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक आणि अधिकारी कौतुकाने बोलतात. हे सगळं करणारी मंगल मात्र आपण वेगळं काहीच करीत नाही, जे करायला हवं तेच करतेय असं आपल्या सहज सोज्वळ, प्रसन्न वागण्यातून प्रकट करते. तिला भेटणाऱ्या प्रत्येकाला हा 'मंगलतेचा' आणि 'प्रसन्नतेचा' नकळत स्पर्श होत असतो.

## वर्दीतील वर्धक...१

राम आणि लक्ष्मण हे भाऊ वर्धिनीच्या आजोळ प्रकल्पात यायला लागले. ७ वी पर्यंत आजोळच्या वातावरणात रमलेला राम पुढे ८ वीत रामकृष्ण शाखेत जायला लागला. राहण्याचा परिसरही असा की मुलगा शाळेत नियमित जातो, पास होतो म्हणजे खूप हुषार वाटावा. अर्थात याची कारणही तशीच. जरा मिसरुडं

हिंदुस्थानची मूल प्रेरणा जरी आध्यात्मिक असली तरीसुद्धा राष्ट्रीयत्वाचे सूर भारताला हृदयंगम वाटतात यात शंका नाही.

फुटायला लागली की चौकातील तरुणांच्या तालमीत कोण मुलगा कधी 'तय्यार' होईल आणि त्याच्या हातात वह्यापुस्तकांऐवजी तंबाखूचं किंवा सिगारेटचं पाकीट येईल हे सांगता येणं कठीण. अशा वातावरणात राहूनही पालकांच्या जागरुकतेमुळे आणि वर्धिनीच्या संस्कारांमुळे राम हळू हळू प्रगती करू लागला. बॉक्सिंग या क्रीडा प्रकारातील त्याचे कौशल्य नजरेत आले. बॉक्सिंग प्रशिक्षणाचे प्राथमिक धडे रामने वर्धिनीच्या सभागृहातच गिरवले. पुढे या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या हाताखाली शिकू लागला, अर्थात शाखा कधीही सुटली नाही. महाविद्यालयीन जीवनात याच क्रीडाप्रकारात त्याने विद्यापीठ स्तरावर अखिल भारतीय अजिंक्यपद पटकावले. या क्षेत्रात आणखी पुढे जाण्यासाठी सैन्यदलात किंवा पोलिसदलात भरती होण्याचे त्याने ठरविले आणि त्याप्रमाणे पोलिसदलात भरती झाला.

पोलिस प्रशिक्षण, बॉक्सिंगचे प्रशिक्षण, सततच्या स्पर्धा यामध्ये तो सतत गुंतलेला असायचा. वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये त्याने पोलिसदलाचे नाव गाजवले. त्याने आजवर अनेक लहानमोठी पदके मिळवली त्यातील अगदी मोजकी पदके सांगायची तर ती अशी आहेत -

- राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा (शालेय स्तर) ब्रॉन्झ पदक विजेता.
- अ.भा.विद्यापीठ क्रीडा स्पर्धा : बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक विजेता
- राष्ट्रीय स्तरावरील निवडीसाठी होणाऱ्या 'इंडिया कॅम्पमध्ये' दोनदा सहभाग
- ऑल इंडिया पोलीस गेम्स : सलग तीन वर्षे बॉक्सिंग मेडलिस्ट
- सहा राज्यस्तरीय पोलिस क्रीडा स्पर्धा : चार सुवर्णपदके, दोन रौप्य पदके

रामशी या बक्षिसांसंबंधी बोललं तर तो म्हणतो ही बक्षिसे मिळवली यात काय विशेष आहे? वर्धिनीच्या अनौपचारिक आणि आत्मविश्वास जागवणाऱ्या वातावरणामध्ये जे धाडस जागे झाले, स्वत:मधील क्षमतांची, ताकतीची जी ओळख झाली आणि प्रामाणिकपणाचा जो संस्कार रूजला या त्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टी आहेत. त्याच्या या गुणांचा उपयोग त्याला पोलिस खात्यातील नोकरी करताना वारंवार होतो आहे. पोलिस खात्यातील त्याच्या कामगिरीची ही काही उदा. पुरेशी बोलकी आहेत.

- मादक द्रव्यांची तस्करी आणि त्या माध्यमातून तरुण पिढीला बिघडवण्याचा उद्योगात सक्रिय असलेल्या पुण्यातील एका रॅकेटचा शोध खातं घेत होतं. या मोहिमेत अधिकाऱ्यांनी रामला सहभागी करून घेतले. शोध घेता घेता शिक्षणा- साठी पुण्यात वास्तव्याला आलेल्या एका सशस्त्र आडदांड नायजेरियन तरुणावर संशय बळावला. गिऱ्हाईक म्हणून त्या तरुणाजवळ जाऊन रामने त्याला असे काही चपळाईने पकडले की रामच्या तावडीतून सुटणे त्याला अशक्य झाले आणि तो पोलिसांच्या ताब्यात आला.
- एका नगरसेवकाची हत्या करण्याच्या उद्देशाने आलेल्या एका टोळीला, विशेषत: त्या टोळीतील म्होरक्याला पकडण्यात रामचा मोलाचा वाटा होता.
- अंडरवर्ल्डमध्ये सक्रिय असलेल्या एका टोळीतील एक शार्प शुटर, नेमबाजीमधील कौशल्याची संधी मिळायच्या आत रामच्या विळख्यात जेरबंद झाला. अन्य सहकारी पोलिस आणि अधिकारी पोहोचेपर्यंत रामने आपली ताकद पणाला लावून त्याचे सर्व इरादे हाणून पाडले.

जीवावर बेतू शकणाऱ्या अशा कसोटीच्या क्षणी त्याने सरस कामगिरी बजावून खात्याचा विश्वास संपादन तर केला आहेच पण ज्या गोष्टीमुळे खाते

**जे आचारविचार माणसांमाणसांमध्ये भेद उत्पन्न करतात, त्यात वास्तविक धर्म नाही.**

बदनाम होते त्या विषयात त्याच्या प्रामणिकपणाचेही वेगळेपण झाकून राहात नाही. वर्धिनीने केलेल्या संस्कारांमुळेच हे होऊ शकते असे तो गौरवाने सांगतो.

## वर्दीतील वर्धक...२

ही कथा आहे एका वर्धकाची, ज्याच्या मनामध्ये खरं म्हणजे पोलीस खात्यात नोकरी करण्याची अजिबात इच्छा नव्हती. पण अर्थातच पोलीस खात्यातच असलेल्या आपल्या वडिलांच्या इच्छेपुढे त्याला झुकावे लागले आणि पोलीस दलात शिपाई म्हणून तो भरती झाला. वर्धिनीच्या शाखेत झालेल्या संस्कारांमुळे भरतीच्या वेळेला त्याची उत्तरे ऐकून मुलाखत घेणाऱ्या अधिकाऱ्याने न राहवून त्याला विचारले की तू असा वेगळा कसा? पोलीसांची मुलं अशी तुझ्यासारखी वागणारी नसतात. त्यावर त्याने वर्धिनीची माहिती सांगतली. वर्धिनीचे काम, मुलांवर केले जाणारे संस्कार हे सारं सांगितलं व या संस्थेचा मी विद्यार्थी आहे असे सांगितले. ते ऐकून त्यांनाही आनंद वाटला.

निवडीचे सर्व टप्पे पूर्ण होऊन तो प्रशिक्षणासाठी निवडला गेला. प्रशिक्षण सुरू झालं आणि हळू हळू वास्तव चित्रं दिसायला लागलं. प्रशिक्षण देणाऱ्या अधिकाऱ्याला खूष ठेवण्याची परंपराच होती व त्याच्या तुकडीला प्रशिक्षण देणाऱ्या अधिकाऱ्याचीसुद्धा तशी अपेक्षा होती. वर्धिनीत स्वाभिमान शिकलेल्या या वर्धकाने असं 'खूष करण्याच्या' मार्गाला नकार दिला व त्यासाठी प्रशिक्षणाच्या काळात मुद्दाम वाट्याला आलेली कडक वागणूक, प्रसंगी काही शिक्षा या साऱ्या गोष्टी सहन केल्या.

प्रशिक्षण संपून नोकरी सुरू झाली. आज नोकरीची जवळपास १८-१९ वर्ष झाली आहेत. यापैकी जवळपास १३-१४ वर्ष कोर्ट पोलीस म्हणून तो काम पाहतो आहे. या पदावरच्या व्यक्तीचा संबंध अनेकांशी येतो. विशेषतः रिमांडसाठी काम करणाऱ्या वकीलांशी येतो. आपल्या फायद्यासाठी, व्यवसायासाठी संबंधित पदावरच्या व्यक्तीला, विशेषतः पोलीसांना 'खूष' करण्याचा सोपा मार्ग अनेकजण निवडतात. कामे मिळावीत म्हणून यालाही काही वकील असे भेटले ज्यांनी त्याला वेगवेगळी अमिषे दाखवून खूष करण्याचा प्रयत्न केला. पण वर्दीतील या वर्धकाने आपला बाणा सोडला नाही. तो सांगतो, ''वर्धिनीच्या संस्कारांमुळे मी तीन पथ्ये सांभाळली. नेहमी सत्यच बोलायचं/ वागायचं, पैशासारख्या वेगवेगळ्या अमिषांपासून दूर राहायचं आणि असं वागण्यामुळे जे काही सोसावे लागेल त्याची तयारी ठेवायची.'' अशा वागण्याने अर्थात सुपरिणामच झाले. याच्या सहवासात आल्यामुळे एक नव्हे तर दोन वकीलांची 'दारू पिण्याची सवय' पूर्णपणे सुटली आणि त्यातील एक वकील तर पुढे भक्तीमार्गाला लागला.

शासकीय खात्यात बदली ही नेहमीचीच गोष्ट. याच्याही बदल्या झाल्या. असा चांगला माणूस आपल्या कोर्टातून बदलून चालला आहे हे समजल्यावर एका न्यायाधिशाने स्वतः त्याची बदली रद्द व्हावी व तो त्यांच्याच कोर्टाशी जोडलेला राहावा यासाठी प्रयत्न केले.

पोलीस खात्यातील नोकरी म्हणजे एका अर्थाने घसरड्या वाटेवरचे चालणे. ठाम निर्धार केल्यावर अशा निसरड्या वाटेवरूनही 'पाय न घसरता' वाटचाल करता येते हा विश्वास या वर्धकाने दिला आहे. सर्वांशी अत्यंत चांगले वागताना गुन्हेगाराला शिक्षा होण्यासाठी लागणारा कठोरपणाही त्याच्याकडे आहे. ७०-८०

**संघधर्मच हिंदू जातीची प्राणशक्ती जागृत करेल.**

गुन्हे असलेल्या आणि तरीही आयत्या वेळेला साक्षीदार फुटल्याने शिक्षा न होता सुटलेल्या एका अट्टल गुन्हेगाराला याच्या ठामपणामुळे, साक्षीदारांना त्याने दिलेल्या हिंमतीमुळे चार गुन्ह्यांत शिक्षा होऊ शकली. अशा कामगिरीची दखल खातेही घेत असतेच. आजपर्यंत त्याने खात्यांतर्गत लहानमोठी ७० बक्षिसे मिळवली आहेत. आज पोलीस नाईक म्हणून काम पाहणाऱ्या या वर्धकाने गेली सलग तीन वर्षे ए+ शेराही मिळवला आहे.

त्याच्या कार्यक्षेत्रात काही काळ अशी सामाजिक संस्था येत होती ज्या संस्थेने एड्सग्रस्त मुलांना आधार दिला आहे. आपल्या सहकाऱ्यांना घेऊन हा वर्धक या संस्थेतील मुलांसाठी महिन्यातून एकदोनदा गोड खाऊ घेऊन जायचा.

स्वतः खाण्यात नव्हे तर गरजूंना असे 'खाऊ घालण्यात' किती आनंद असतो, याची अनुभूती त्याने आपल्या सहकाऱ्यांना अनेकदा दिली आणि यामुळेच वकीलच नाही तर त्याचे काही सहकारीही सांगतात की त्यांच्या वाईट सवयी याच्या सहवासात सुटल्या.

## चांगुलपणावरचा विश्वास सार्थ करणारी 'मनिषा'

मनिषा... संगीताच्या संगतीने तशी उशीराच वर्धिनीत दाखल झाली. पण जशी ती निवेदिता शाखेत रमू लागली, खेळू लागली, बोलू लागली तशी तिच्यातील चमक जाणवायला लागली. घरातील वातावरण कितीही अडथळ्यांचं, अस्वस्थ करणारं असलं तरी त्याला हसतमुखानं कसं सामोरं जायचं


**निरामय योग चिकित्सा केंद्र**

**सहवास कॉर्नर बस स्टॉप समोर,**
**कर्वेनगर, पुणे ४११ ०५२**

**श्री. केदार पारगावकर**
**मोबा. ९८८१२ ०२०७०**

सचीन चव्हाण मोबा. ९८२२ ८४ ०४ २०
९७६६ ३७ ३७ ३७
नितीन चव्हाण मोबा. ९८६० ६० ५७ ५७
(आर.टी.ओ.ची कामे)

**ॐ ड्रायव्हिंग स्कूल**
**ॐ ट्रॅव्हल्स**

❖ **कल्याणीनगर शाखा** ❖
कल्याणीनगर, गेरा लँडमार्क, प्लॉट क्र. २२/बी,
जुना सर्व्हे क्र. २२०/२ बी कल्याणी बंगल्यासमोर,
आय.सी.आय.सी.आय. बँकेजवळ,
कल्याणीनगर पुणे.
❖ **सदाशिव पेठ शाखा** ❖
पेरूगेट पोलिस चौकीसमोर, गोपी हॉटेलजवळ,
सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.


**प्रत्येक मुलीला उत्तम शिक्षण मिळू द्या. महिलांच्यात जागृती झाल्यानेच राष्ट्रजीवनात नवजागृतीची नवप्रभात उदित होईल.**

याचं मनिषा हे चालतं बोलतं उदाहरण होतं. अर्थात तिला तसं घडवलं ते तिच्या आईनं. आलेल्या अडचणींचा सामना करीत आणि पदर खोचून संसाराचा गाडा स्वत:च्या कर्तृत्त्वाने त्या हाकीत होत्या.

१२ वी नंतर मनिषाने बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. युवती कार्यकर्ती म्हणून हळुहळू शाखेच्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या ती सांभाळायला लागली. अवती-भवती घडणाऱ्या घटनांमधून होणारं शिक्षण खूप मोलाचं असतं आणि ते वर्धकांना मिळालं पाहिजे हा वर्धिनीचा आग्रह. त्यामुळे समाजासाठी धडपडणाऱ्या, कुप्रथांविरुद्ध झुंज देणाऱ्या व्यक्ती व संघटना यांच्या कार्यक्रमांना आग्रहपूर्वक वर्धक वर्धिका जायला हवेत, त्यांनी तेथील अनुभव घ्यायला हवेत, अशा आग्रहातून शाखांमध्ये कार्यक्रमाच्या योजना ठरतात. अशाच एका टप्प्यावर संगीता, मधुमती अशा मैत्रिणींच्या समवेत ती बेळगावला गेली. बेळगाव, यमुनापूर येथे भीमराव गस्तींनी जो संघर्ष मोर्चा ठरविला होता त्यात सहभागी झाली. कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून भीमराव कसे त्यांच्या हक्कांसाठी झुंज देत आहेत हे त्यांनी जवळून पाहिलं. एरवी अत्यंत मृदु बोलणाऱ्या मितभाषी भीमराव गस्तींचा देवदासी प्रथा संपावी म्हणून कसा संघर्ष चालतो हेही त्यांनी जवळून अनुभवलं. त्यासाठी त्या देवदासींच्या शिबिरात राहिल्या. ती प्रथा आणि ती सोसणाऱ्या देवदासींच्या व्यथा त्यांनी ऐकल्या. 'तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला, तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा' ही वर्धिनीच्या प्रार्थनेतील ओळ प्रत्यक्ष जगणाऱ्या एका तपस्व्याचा सहवास त्यांना या निमित्ताने मिळाला.

अशी अनेक व्याख्याने, भेटी, अनुभूती शिबिरे, अनौपचारिक कार्यक्रम, मानसिक विकास बैठका अशा कार्यक्रमातून कळत-नकळत मनिषा घडत होती. बी.ए.एम.एस.च्या शेवटच्या वर्षात असताना शाखा प्रमुख म्हणूनही ती काम पाहत होती. अभ्यासाचं महत्त्वाचं वर्ष असलं तरी अभ्यास, शाखेची जबाबदारी, घरातील कामं यातील समतोल कसा साधता येतो याचे ती प्रत्यक्ष उदाहरणंच सर्वांसमोर ठेवीत होती.

जून १९९५ मध्ये बी.ए.एम.एस.ची परीक्षा उत्तम गुणांनी यशस्वी होऊन मनिषाने जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला. आता नोकरी करायची की स्वत:चा व्यवसाय करायचा असा निर्णय करण्याच्या टप्प्यावर तिने निर्णय घेतला की आधी समाजऋण व्यक्त करायचं आणि मग वैयक्तिक जीवनाचा विचार करायचा. योगही उत्तम जुळून आला. कै. किशाभाऊंचे सहकारी आणि वनवासी कल्याण आश्रमाचे अखील भारतीय संघटन मंत्री कै. भास्करराव कळंबी हे त्याच दरम्यान पुण्याला आले होते. पूर्वांचलामध्ये आरोग्य क्षेत्रांत काम करण्यासाठी डॉक्टर्सची गरज होती व त्यासाठी काही मदत मिळावी अशा अपेक्षेने त्यांचे वर्धिनीत येणे झाले होते. कै. किशाभाऊंनी मनिषाचा परिचय करून दिला. तिलाही कल्पना खूप आवडली व अरुणाचलामध्ये वनवासी कल्याण आश्रमासाठी दोन वर्षे द्यायचे तिने ठरविले. किशाभाऊ, भास्करराव यांनी मनिषाच्या आईच्यासमोर प्रस्ताव ठेवला आणि आईनेही आनंदाने परवानगी दिली. इतक्या दूर ती एकटी कशी राहील हा प्रश्नही सुटला कारण तिच्याबरोबर काम करण्याचा प्रांजली लकडे या युवती कार्यकर्तीनेही घरच्यांच्या संमतीने निर्णय केला.

डिसेंबर १९९५ मध्ये अरुणाचल प्रदेशातील तेजू

**गीतेमध्ये अमित शक्ती भरलेली आहे. गीतेचा खरा अर्थ कळला तर एका हातात गीता अन् दुसऱ्या हातात खड्ग घेऊन ध्येयप्राप्तीच्या विजयार्थ मान उंचावून निघालेले क्षत्रिय वीर दृष्टोत्पत्तीस पडल्याशिवाय राहतील काय?**

या जिल्हा केंद्रावर त्या दाखल झाल्या. तीन दिवस या जिल्ह्या केंद्रामध्ये तर तीन दिवस भोवतालच्या परिसरातील तीन गावांमध्ये मेडिकल कॅम्पच्या माध्यमातून संपर्काचे काम करायचे असा तिचा दिनक्रमही निश्चित झाला. सुमारे अडीच वर्षे तिने आपल्या सर्व वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग पूर्वांचलातील समाजाची सेवा करण्यासाठी केला. या कालावधीत तिच्या व्यक्तिमत्त्वाला आणखीनच झळाळी आली. तिच्या या कामामुळे आपल्याच देशाच्या सीमेवर असलेल्या गावातील लोकांच्या मनात काय भावना असतात व मुलभूत सुविधाही न पोहोचणाऱ्या गावांमधून 'खपवळरपी ऋइरलज्ञ' अशा घोषणा का ऐकू येतात हे नेमकं अनुभवता आलं. अडीच वर्षांमध्ये जवळपास २५० च्या वर मेडिकल कॅम्प तिने घेतले. यातील दोन-तीन अनुभवच तिने काय पाहिलं असेल, अनुभवलं असेल हे समजायला पुरेसे आहेत.

तेजू जिल्ह्यातील वॉलाँग येथे तिचा मेडिकल कॅम्प निश्चित झाला होता. तेथे पोहोचण्यासाठी तिला आधी 'हवाई' या गावी पोहोचणं आवश्यक होतं आणि हवाईला पोहोचण्याचा मार्गही सोपा नव्हता. अतिशय उंच पहाडावर असलेल्या हवाई येथे पोहोचण्यासाठी तिला तीन-चार सोबत्यांसह पायवाटेने रात्रभर पायी प्रवास करावा लागला. हवाईला पोहोचल्यावर तेथील रस्त्याने ती वॉलाँग ला पोहोचली. १९६२ साली चीनने याच गावात शिरून भारतावर युद्ध लादले होते. अशा या सीमेवरील अत्यंत महत्त्वाच्या गावात तिचा कॅम्प होता. पोहोचल्यावर पारंपारिक पद्धतीने तिचे स्वागत झाले. आलेल्या लोकांच्या डोळ्यात प्रचंड कुतूहल होते. गावच्या मुखियाने बाकी सर्व व्यवस्था चोख केली होती. मेडिकल कॅम्प झाल्यावर जेवताना मनिषाने मुखियाला विचारले की एवढे जंगी स्वागत का केले आणि सगळा गाव बघायला का आला होता? मुखिया हसला आणि म्हणाला, ''बेटा, या गावात १६ वर्षानंतर वैद्यकीय मदत पोहोचलीय. त्याचा लोकांना आनंद झाला. गर्दीतील अनेक जण डॉक्टर कसा असतो हे पाहायला आले होते कारण त्यांनी आजवर डॉक्टर हा प्राणी कसा असतो हे पाहिलेले नाही.''

एकदा ओलाँग जिल्ह्यातील एका सुदूर असलेल्या पहाडी गावातील कॅम्प आटोपून बसने मनिषा परतत होती. प्रवास अर्थातच उंच पहाडातील वळणावळणाच्या रस्त्यांचा होता. या रस्त्यांनी बाजूच्या प्रचंड दऱ्यांची आता तिच्या नजरेलाही सवय झाली होती. बस अचानक थांबली. पुढे काहीतरी अडथळा असेल असं समजून तिने दुर्लक्ष केले पण पाहता पाहता बसमधील सर्व प्रवासी उतरले. ड्रायव्हर कंडक्टर व ती असे तिघेच उरले. मग शंका आली म्हणून तिने कंडक्टरला विचारले की काय झाले? तो म्हणाला, लॅन्ड स्लाईड झाली आहे. तरीही तिला फार गंभीर वाटले नाही कारण अशा घटना अरुणाचलात वारंवार घडतात. पण प्रत्यक्ष पाहिल्यावर गांभीर्य समजले. काही किलोमीटरचा रस्ता वाहून गेला होता. पूल एका बाजूला तर नदी दुसऱ्याच बाजूने वाहायला लागली होती. पुढे रस्ताच नाही अशा स्थितीत बस उभी होती. गांभीर्य लक्षात आल्याबरोबर शबनम खांद्याला लावून ती बाहेर पडली. पहाडाच्या दिशेने पायवाटेने काही अंतर ओलांडल्यावर तिला सैन्यातील काही जवान भेटले. त्यांच्याकडे चौकशी केल्यावर त्यांचा जवळच कॅम्प असल्याचे समजले. चार-पाच किलोमीटर पायी चालल्यावर नदीकाठी असलेल्या तंबू राहुटच्या दिसल्या. संबंधित तुकडीच्या अधिकाऱ्याला भेटून तिने

**उज्ज्वल भारतवर्षाचे एक सुंदर चित्र तुमच्यासमोर असले पाहिजे.**
**या ध्येयावर प्रेम करा. हे सर्व प्रेम विरोधी शक्तींना पुरून उरेल.**

अडचण सांगितली व त्यांनीही तिची रात्रीच्या राहण्याची सोय केली. दुसऱ्या दिवशी पुन्हा पायपीट करीत बोटीने आसामला पोहोचण्याची सोय असलेल्या ठिकाणी ती पोहोचली. तिच्या सोबत तीन-चार जवानही आले होते. पण पुन्हा दुर्दैव आड आले. ती तेथे पोहोचेपर्यंत तिच्या डोळ्यादेखत त्या दिवसातील शेवटची बोट मार्गस्थ झाली होती. पुन्हा प्रश्न. ज्या रस्त्याने ती पायपीट करीत आली त्याच वाटेवर पाच-सहा कि.मी. अंतरावर डोंगराच्या कुशीत असलेलं एक गाव तिने पाहिलं होतं. तिने ठरवलं की पुन्हा मिलिटरीच्या कॅम्पवर जाण्यापेक्षा वाटेवरच्या गावी मुक्काम करावा. चालत चालत चित्रात पहावं अशा एका गावी पोहोचली. एका घराच्या दारासमोर उभी राहिली. त्या घरातील लहान मुलाने घरात काहीतरी सांगितलं असावं. त्या घरातील स्त्री आणि तिचा नवरा दोघेही बाहेर आले. भाषा वेगळी, खूप चालल्यामुळे प्रचंड थकवा आलेला अशा अवस्थेत मनिषाला त्यांनी पाहिलं आणि देहबोलीनेच त्यांच्या घरातील पाहुण्यांच्या खोलीत नेले. त्या स्त्रीने तिचे पारंपारिक कपडे मनिषासमोर ठेवले, गरम पाणी आणून दिलं. आपल्याकडे पाहुणी आली आहे आणि ती राहणार आहे हे त्यांनी जाणलं होतं कोणताही भाषिक संवाद न होताही तिची राहण्याची, जेवणाची आणि सुरक्षेची व्यवस्था झाली होती. ब्रिटिशांनी आसाममधील सर्व वनवासी जनजातींचा शोध घेतला होता; पण एका जनजातीचे लोक त्यांना शोधूनही सापडले नाहीत. पण या जनजातीचे लोक त्यांना आसामच्या सीमेवरील अरुणाचल प्रदेशात सापडले. म्हणून या जनजातीचे नामकरण त्यांनी 'मिसिंग ट्राईब' असे केले आणि आजही या जनजातीचे तेच नाव कायम राहिले आहे. हे कुटुंब त्या जनजातीमधील होते. दुसऱ्या दिवशी त्या कुटुंबियांचे आभार मानून मनिषा निघाली आणि बोटीने आसामला पोहोचली. पूर्वांचलातील ''स्त्री प्रधान'' संस्कृतीमध्ये तिने घेतलेला हा अनुभव फार महत्त्वाचा आहे.

पूर्वांचलातील तिचे वेगवेगळे अनुभव ऐकताना तिला जेव्हा विचारले की असं एकटं हिंडताना तुला कधी भीती वाटली नाही? तिचं सहज उत्तर होतं वर्धिनीच्या कामात अनोळख्या ठिकाणी जाऊन धडकण्याचा जो स्वभाव बनतो त्यामुळे या अनोळखी प्रदेशात व वातावरणात काम करताना मी सहजपणे वावरले, नवे मित्र जोडू शकले.

अडीच वर्षांच्या या 'स्व'विस्तारण्याच्या अनुभवानंतर मनिषा पुण्याला परतली आणि तिचा वैयक्तिक जीवनाचा कालावधी सुरू झाला. यथावकाश लग्न झाले, तिच्याच क्षेत्रातील साथीदार मिळाला. एका मुलाला जन्म दिल्यावर तिने एम.डी.चे शिक्षण सर्व प्रकारच्या कसरती करून पूर्ण केले. अर्थात यात तिच्या पतीची, दोन्हीकडच्या घरच्यांची मोलाची साथ होती. २००५ मध्ये कोकणातील तराळे या गावी 'अमृता नर्सिंग होम' या नावाने तिने हॉस्पिटल थाटले. केवळ गायनाकॉलॉजी पेशंटसाठी असलेल्या या हॉस्पिटलचा आधार आज भोवतालच्या किमान २० गावांना आहे. हॉस्पिटल सुरू करण्यापूर्वी तिथे आधीपासून एक हॉस्पिटल होते. आपल्या व्यवसायात एक स्पर्धक वाढला अशा विचारातून ज्या प्रकारची टीका होऊ जाते, कुजबूज पसरवली जाते, तसं काहीसं घडत होतं पण याकडेही मनिषानं सकारात्मक पाहिलं.

हॉस्पिटल सुरू झाल्याच्या पहिल्याच वर्षी एका अवघड प्रसंगाला तिला सामोरं जावं लागलं. अत्यंत

**देशाच्या अणूअणूवरसुद्धा तुमचे प्रेम असले पाहिजे. प्रत्येक नि:श्वास -प्रश्वासातून, इंद्रियाइंद्रियांतून त्याच प्रेमाचा अनुभव आला पाहिजे.**

नाजुक स्थितीतील अवघडलेल्या तरुण स्त्रीची डिलेव्हरी तिने केली. मूल सुखरूप जन्माला आलं; पण आई वाचू शकली नाही. प्रसंग अवघड होता. अशा वातावरणात तिच्या नातेवाईकांना समजावून सांगणं आणि त्यांना पोस्टमार्टेमसाठी तयार करणं ही अवघड कामगिरी तिने आत्मविश्वासाने पूर्ण केली. तिने केलेल्या सर्व उपचार आणि प्रयत्नांवर नातेवाईकांनीही विश्वास दाखविला. हे सारं घडत असताना हॉस्पिटलमध्ये असलेले रुग्ण आणि त्यांचे नातेवाईकही तिच्या पाठीशी उभे राहिले. हॉस्पिटलबाहेर या परिस्थितीचा राजकीय लाभ घेण्याच्या हालचाली सुरू होत्या; पण त्या रुग्णाच्या नातेवाईकांनी मनिषावर दाखविलेल्या विश्वासामुळे या हालचाली आपोआपच थंडावल्या.

या परिसरातील तिचे समव्यावसायिक तिने घेतलेल्या पुढाकारामुळे आता एकमेकांचे व्यावसायिक स्पर्धक न राहता व्यवसायातील सहकारी बनले आहेत, व एकमेकांना अडचणीच्या वेळी मदत करायला धावून जाऊ लागले आहेत. गप्पांसाठी सहज एकत्र जमणं, कुटुंबियांनी एकत्र भेटणं, वैद्यकीय विषयातील नव्या नव्या तंत्राचा एकत्र अभ्यास करणं या गोष्टी सहज घडू लागल्या आहेत.

अमृता नर्सिंगमध्ये प्रलोभनापोटी कोणतीही चुकीची गोष्ट केली जाणार नाही व केलेली चालणार नाही हे औषध क्षेत्रातील संबंधितांनाही चांगले माहिती झाले आहे. आपल्या प्रत्येक कृतीला 'Human touch' देण्याच्या तिच्या स्वभावामुळे आणि चांगुलपणावरचा विश्वास कायम ठेवल्यामुळे आज काम करताना, सेवा देताना खूप समाधान मिळतं आहे असं ती आवर्जून सांगते.

## दाही दिशांना जाऊ फिरू...

**-डॉ. विनेश नगरे**

बारीक चणीचा, सडपातळ, फारसा उठून न दिसणारा एक मुलगा पहिली ते चौथीपर्यंत शाळेत खेळांमध्ये कुठल्याही संघात त्याच्या शरीरयष्टीमुळे नाकारला गेलेला पण पाचवीत गेल्यानंतर तोच मुलगा आंतरशालेय स्पर्धांसाठी कबड्डी या ताकदीच्या खेळामध्ये शाळेचा त्या वयोगटातील संघाचा कर्णधार झाला. आणि मग त्यानंतर त्याने कधी मागे वळून पाहिलेच नाही. त्याशिवाय नेहमीच वर्गात विसाच्यापुढे नंबर मिळविलेला तो मुलगा पहिल्या पाचात येऊ लागला. ही किमया होती स्व-रूपवर्धिनीत मिळालेल्या आत्मविश्वासाची, नियोजनाची आणि मार्गदर्शनाची.

त्यानंतर सुरू झाली एक अविरत धडपड. स्वरूप प्रकट करण्याची. शाळेत मग निबंध स्पर्धा असो किंवा नाट्यवाचन स्पर्धा, धावण्याची क्रॉसकंट्री स्पर्धा असो किंवा लेझीम, प्रत्येक गोष्ट विनेश नगरे या नावाशिवाय पूर्ण होत नसे. सूर्यनमस्कार स्पर्धेत आमची शाळा दरवर्षी अजिंक्य असायची. त्या विषयी संघात आम्हीही हमखास असायचो. लेखनकला, वक्तृत्वकला या वर्धिनीत शिबिरांमध्ये विकसित झाल्यामुळे सातवीला असतानाच एका नाटकाचे लेखन व दिग्दर्शन केले. शिवाय अभिनयही केला. त्यावेळी शाळेतील शिक्षकांनी आमचे खूप कौतुक केले. १०वी नंतर कॉलेजमध्ये प्रवेश केल्यावर मॉर्डन स्पोर्टस् क्लबकडून व्यावसायिक स्तरावर दोन वर्षे कबड्डी खेळलो. १२ वीला असताना कॉलेजच्या अंतर्गत स्पर्धांमध्ये ॲथलेटिक्स प्रकारात जनरल चँपियन म्हणून निवड झाली होती. शिवाय आंतरमहाविद्यालयीन

**पुरुष असा पाहिजे की जो परिस्थितीला पायाखाली तुडवून ताठ उभा राहील;**
**ऐन आत्मबलिदानात-सुद्धा मृत्यूकडे जो निर्भय चित्ताने पाहील.**

कबड्डी स्पर्धेत माझा सहभाग असलेला मॉर्डन कॉलेजचा संघ सर्वोत्कृष्ट ठरला होता. १२ वी नंतर मात्र मी कराटे या खेळाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. ब्लॅकबेल्टपर्यंत प्रशिक्षण पूर्ण केले. अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये बक्षिसेही मिळवली.

१२ वी नंतर मी टिळक आयुर्वेद महाविद्यालय येथे आयुर्वेद शिकण्यासाठी प्रवेश घेतला. नेहमीच्या सवयीने अभ्यासाबरोबरच इतरही गोष्टीत लक्ष घालण्यास सुरुवात केली. हळुहळू असे लक्षात आले की या कॉलेजमध्ये मैदानी खेळापेक्षा सांस्कृतिक व बौद्धिक गोष्टींना अधिक महत्त्व दिले जाते. वर्धिनीत आम्हाला किशाभाऊ सरांनी सांगितले होते की *'तुमच्याकडे अमृताने भरलेला कुंभ असेल पण त्याला छिद्रे असतील तर त्या अमृताचा तुम्हाला उपयोग होणार नाही, ते सर्व सांडून जाईल. त्यामुळेच बुद्धीच्या विकासाबरोबरच शारीरिक विकासही तितकाच महत्त्वाचा.'* या उक्तीप्रमाणे मी वागायचे ठरवले आणि खेळाच्या विकासासाठी प्रयत्न सुरू केले. त्यातूनच मग कबड्डी या खेळासाठी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी संघ उभा राहिला. मुलांबरोबरच मुलीही उत्साहाने भाग घेऊ लागल्या. १९९४ साली आम्ही लावलेल्या या रोपट्याचे आता वृक्षात रूपांतर झाले आहे. अनेक मुले व मुली कॉलेजतर्फे आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व करत आहेत. पदवीपर्यंतचे वैद्यकीय शिक्षण घेताना या सर्व अनुभवांना मानसिक क्षमता वाढीस फायदा झाला.

वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून व्यावसायिक जगात पाऊल टाकण्यापूर्वीच दोन दिवस आधी पितृछत्र हरपले. पण त्यामुळे डगमगून न जाता महिन्याभरातच स्वत:ची खासगी प्रॅक्टिस सुरू केली. भांडवल फारसे हाताशी नसल्यामुळे घरातच दवाखाना सुरू केला. धन्वंतरीच्या आशीर्वादाने कसब्यातल्या एका छोट्याशा बोळात आणि ८ ु ६ च्या जागेत पडदे लावून सरू केलेला हा दवाखाना अतिशय छान चालला. त्यानंतर सहाच महिन्यात स्त्रीरोग विषयातील पद्व्युत्तर शिक्षणासाठी टिळक महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला.

ताराचंद हॉस्पिटलमध्ये २४ तास राहणे आम्हाला त्यावेळी बंधनकारक होते. प्रथम वर्ष त्यामुळे ताराचंदमध्येच काढले. स्त्रीरोग विषयात त्यावेळी तीन मुली आणि मी एकटाच मुलगा. मी माझा प्रवेश रद्द करून निघून जावे यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न झाले. पण हा प्रवेश सोडून खाजगी कॉलेजमध्ये पद्व्युत्तर शिक्षण घेणे मला परवडणारे नव्हते. त्यामुळे मी चिकाटीने सगळ्यांना तोंड दिले. वर्धिनीतील मनिषाताईने त्यावेळी मला दिलेला मानसिक आधार अतिशय मोलाचा ठरला. या वर्षभर आम्हाला मानधन मिळायचे. पण त्यानंतर प्रबंधक पदावर एकाचीच निवड होते. पुढील वर्षी माझी या पदावर वर्णी लागली नाही. बिनामानधन काम करणे आणि शिक्षण पूर्ण करणे शक्य नव्हते. म्हणून मग सुखसागरनगर येथील डॉ. मुद्गल यांच्या कल्पतरू हॉस्पिटलमध्ये ॲसिस्टंटचा जॉब स्वीकारला. तिथे भरपूर शिकायला मिळाले. पण सहाच महिन्यानंतर एका केसमध्ये नैराश्य आल्यामुळे त्या डॉक्टरांनी आत्महत्या केली. मग पुन्हा शोधाशोध सुरू. पुरुष डॉक्टरांना स्त्रीरोगतज्ञाच्या हाताखाली सहसा कोणी असिस्टंट म्हणून कोणी घेत नाही. त्यामुळे आठ महिने असेच वाया गेले. मग ठरवले, स्त्रीरोगतज्ञ नसेल तरी चालेल पण शस्त्रकर्मातील कौशल्य कसेही करून

**तुमचे आराध्य दैवत एकच असावे, ते म्हणजे भारतराष्ट्र!**

शिकायचेच. मग पुण्यातील प्रसिद्ध सर्जन डॉ. शशांक शहा यांच्या पर्सनल असिस्टंटची जबाबदारी स्वीकारली. एक वर्ष त्यांच्याबरोबर रुबी हॉल, जहांगीर, पूना हॉस्पिटल आणि अनेक नामवंत हॉस्पिटलमध्ये काम करण्याचा अनुभव मिळाला.

अनेक अतिशय अवघड शस्त्रक्रिया पाहिल्या. दुर्बिणीतील ऑपरेशनचा प्रत्यक्ष अनुभव जो आम्हा BAMS डॉक्टरना सहज मिळत नाही तो येथे शेकडो रुग्णांवर मिळाला. माझा शस्त्रकर्मातील हात अधिक कौशल्यवान झाला. शहा सरांकडे काम करणे माझ्या आयुष्यातील मैलाचा दगड ठरला. त्यानंतर लगेचच ताराचंद रुग्णालयात प्रबंधक पदावर माझी निवड झाली. आतापर्यंत मिळालेला सर्व अनुभव त्यावेळी मी पणाला लावले. उत्तम सेवा आणि आपुलकी यामुळे आमच्या विभागाचा नावलौकिक टिकवून ठेवला.

पद्व्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर भांडवल कमी असल्याने स्वतंत्र दवाखाना न काढता एका हॉस्पिटलमध्ये तासावर केबिन भाड्याने घेतली. शिवाय वेगवेगळ्या हॉस्पिटलमध्ये व्हिजिटिंग सर्जन म्हणून काम सुरू केले. थोडा जम बसताच, महात्मा फुले पेठ येथे स्वत:चा छोटासा दवाखाना सुरू केला. एकाच वर्षात नाना पेठ येथे स्वत:चे हॉस्पिटल सुरू केले. आपुलकीची वागणूक आणि उत्तम सर्व्हिस यावर स्वत:च्या जागेत नाना पेठ येथे लक्ष्मी रोडवर जागा विकत घेतली. त्यानंतर जशी गरज पडेल तसा व्यवसाय विस्तारण्यास सुरुवात केली. स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून काम करताना (Polycystic Ovary) या आजारावर विशेष संशोधन आयुर्वेदाच्या माध्यमातून सुरू केले. या आजारावर अर्वाचिन शास्त्रात हमखास उपाय उपलब्ध नाहीत. मासिक पाळी, वंध्यत्व व स्त्रीच्या संपूर्ण आरोग्यावर परिणाम हा आजार. या आजारावरच्या चिकित्सेत प्राविण्य मिळविल्यावर सदाशिव पेठेत फक्त महिलांसाठी आयुर्वेद व पंचकर्म चिकितसा देणारे केंद्र सुरू केले. आजच्या घडीला व्यवसाय सुरू केल्यापासून हे माझे तेरावे केंद्र होते. कधीही न थकता, न कंटाळता, न हाटता जिद्दीने प्रयत्न केल्यामुळेच आज प्रतिथयश अशा सदाशिव पेठेत स्वत:चा व्यवसाय उभा केला. व्यावसायिक जबाबदाऱ्या कितीही असतील तरी आजही मला आमच्या वर्धकांमध्ये मिसळणे, त्यांच्याबरोबर ट्रेकला किंवा सायकल सहलीला जाणे मनापासून आवडते. किंबहुना वर्धिनी परिवार हा आमच्या कुटुंबाशी जोडलेलाच आहे.

## ‘स्वप्न उद्योग’

*सुमित डोळे, मंदार पारगावकर, गणेश काठे, सुजय पैलवान, मंदार रायरीकर हे पुण्याच्या वेगवेगळ्या भागात राहणारे पण त्यांची भेट झाली ती ‘स्व’रूपवर्धिनीत. एकत्र आलेले हे पाचजण एकमेकांचे जीवश्चकंठश्च मित्र कधी झाले हे त्यांनाही कळले नाही. वर्धिनीच्या निवासी शिबिरात, कार्यक्रमांच्या नियोजनातून त्यांची मैत्री अधिकच दृढ होत गेली. ‘स्व’रूपवर्धिनी हीच मुळी एक संस्कार कार्यशाळा आहे. येथे आला ‘तो थांबला, घडला विकसित झाला’ अशी वर्धिनीची ख्याती आहे. येथे मुलांना प्रेरणा मिळते- मार्गदर्शन मिळते, पुढे जाण्याची दिशा दाखवली जाते. हे सर्व कशासाठी? समाजाकडून आपणास जे मिळते ते समाजाला आपापल्या परीने परत करण्यासाठी. ह्याच वर्धिनीच्या संस्कारातून जिद्द व चिकाटीच्या जोरावर सुरू झालेल्या ‘स्वप्न उद्योग’ची ही कथा.*

**शिक्षण हा राष्ट्रजीवनाचा पाया आहे.**

वर्धिनीच्या असदे गावी झालेल्या ग्राम शिबिरात काम करणारे काही युवक एकत्र आले. स्वप्ने जुळली, तेथपर्यंत जाण्याचा मार्गही एकच होता. तेव्हा हा मार्ग एकत्रितपणे चालण्याचे ठरविले आणि समाजाच्या ऋणातून काही अंशीतरी मुक्त होण्यासाठी व्यवसाय करण्याचा संकल्प निश्चित झाला.

सुरुवातीला पुण्यातील एका नामांकित पेढीच्या दुकानाची शाखा बिबवेवाडी येथे सुरू करण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले. त्या व्यवसायातील मालाच्या माहितीसाठी, तसेच विक्रीकला अवगत करण्यासाठी त्याच पेढीतील लक्ष्मी रस्त्यावरील दुकानात विनामूल्य काम करून ही माहिती अवगत करून घेतली. पण आपण समाजाच्या ज्या स्तरातून येतो तेथे पलंगाचा एकच आकार असतो. पण सहा बाय सहाचा पलंग असतो आणि त्यासाठी लागणारी वेगवेगळी आकाराची बेडशीटस् असतात ते व्यवसायात उतरल्यावरच लक्षात आले. अशा अनेक गोष्टी हळुहळू कळत गेल्या जसे, कुशन आणि पिलोतील फरक, गालिच्यांचे, सतरंज्यांचे प्रकार इथपासून ते कापडाच्या गुणवत्तेपर्यंत. नवीन दुकानाच्या जाहिरातीरातीसाठी रस्त्यावर रात्रभर जागून कापडी फलक लावले आणि दुसऱ्या दिवशी म.न.पा.चे अधिकारी सकाळीच दंडासाठी दारात हजर. असे अनेक नियम हे नियमभंग झाल्यानंतरच समजले आणि आमच्यासाठी तो दंड म्हणजे Education Cost होती.

प्रत्यक्ष व्यवसायाचा श्री गणेशा करण्यासाठीचे भांडवल उभे करताना कमीत कमी भांडवलात व्यवसाय सुरू करण्यासाठीचे प्रयत्न सुरू होते. कुणी पूर्वी नोकरी करत असताना साठविलेले पैसे भांडवल म्हणून घातले तर कुणी नातेवाईक, मित्र मंडळी यांच्याकडून थोडे थोडे करत भांडवल जमा केले. असे साधारण सर्वांनी मिळून एक लाख रुपये जमवून व्यवसाय सुरू केला. व्यवसाय हाताळण्याची पद्धत, ग्राहकांशी संबंध, यातील प्रभावीपणामुळे त्याच पेढीचे डहाणूकर कॉलनी, कोथरूड येथील दुकानही स्वप्न उद्योगाला चालवायला मिळाले. परंतु बिबवेवाडी येथील दुकानाची चुकलेली जागा आणि इतर काही कारणाने दिवाळीचा हंगाम संपताच ते दुकान बंद करण्याचा एक अवघड पण आवश्यक निर्णय घेण्यात आला. त्यानंतर चिरलेल्या भाज्या घरपोच पोहोचवणे, Home Services, घराचे रंगकाम, लग्नाचे Management, Event Management, केटरिंग असे अनेक व्यवसाय अजमावून पाहिले. प्रत्येक व्यवसायात नफा होतच होता. पण करावे लागणारे कष्ट आणि मिळणारा नफा याचे गणित बसत नव्हते. म्हणूनच मग प्रबोध उद्योगच्या मदतीने Commodity Market मध्ये उतरलो. आणि नंतर Shares, Mutual Fund, Insurance अशा Financial Management च्या क्षेत्रात स्थिरावलो. व्यवसायाच्या एका टप्प्यावर मोठे धाडसाने पाऊल टाकण्याची वेळ येते आणि तशी संधीही मिळावी लागते. ही संधी कॉटनकिंगच्या फ्रेंचाईजीच्या रूपाने स्वप्न उद्योगला मिळाली. पण या साऱ्यात आंधळे धाडस मात्र स्वप्न उद्योगने कधी केले नाही. जमा खर्चाची गणिते मांडून, आपल्या कार्यकुशलतेने वाढीच्या सर्व शक्यता अजमावूनच हे मोठे धाडस स्वप्न उद्योगने केले. व त्याची यशस्वीता पहिल्याच वर्षी २५% व्यवसाय वाढीने सिद्ध करून दाखविली. यात दुकानाचा मासिक खर्चच लाखाच्या घरात जात होता. आप्तांकडून घेतलेले कर्ज, त्याचे व्याज या साऱ्याचा अभ्यास पूर्वीच केल्याने केवळ दोनच वर्षात हे कॉटन किंगचे युनिटही स्वतंत्रपणे उभे राहून प्रगती करत आहे. **पुण्याच्या मोठ्या**

**तुम्हीच सतत काम केले पाहिजे आणि राष्ट्रीय शिक्षणाचे रहस्य समजावून घेतले पाहिजे.**

**बाजारपेठेत नसतानाही पहिल्याच वर्षी इतर सर्वांच्या तुलनेत संपूर्ण महाराष्ट्रात आर्थिक वाढीचा उच्चांक गाठला.**

या साऱ्या वाटचालीत आपले नोकरदार मित्र, समवयस्क नातेवाईक आपल्यापेक्षा खूप पुढे गेले आणि आपण मागे तर पडत नाही ना. हा विचार अनेकदा मनात यायचा पण आता मात्र असे काही नाही. याचे प्रत्यंतर व्यवसाय वाढीतूनच मिळत आहे. आंब्याच्या झाडाला फळे मिळायला तेवढा वेळ लागणारच पण ते झाड पुढे अनेक वर्षे भरपूर फळे देणारे ठरते. हे मात्र मनात पक्के झाले.

त्या साऱ्या प्रवासात काही जणांनी गृहस्थाश्रमात प्रवेश केला आणि या आयुष्याच्या साथीदारालाही या 'स्वप्नांच्या' प्रवासात त्याच आत्मीयतेने सहभागी करून घेतले. आर्थिक सुबत्तेतून मग साहजिकच उच्च मध्यमवर्गीय राहणीमानाकडे प्रवास सुरू होतो पण व्यवसाय वाढीसाठी व्यवसाय आणि आपल्या मूळ संकल्पनेप्रमाणे सामाजिक बांधिलकीच्या मुख्य सूत्रातून आर्थिक विकास हे सूत्र डोळ्यापुढे ठेवूनच संथ, शाश्वत अशा रीतीनेच वैयक्तिक राहणीमान उंचावण्याचे 'स्वप्न उद्योगने' ठरविले. मध्यमवर्गीय राहणीमान ठेवूनच आपण पुढे जाऊ हेच आज स्वप्न उद्योगाच्या मनात आहे.

'चंचलता' हे विशेषण आहे लक्ष्मीचे. हे आमच्या पक्के मनात आहे आणि या आर्थिक ताळेबंदातील कोटीच्या कोटी उड्डाणाने हुरळून न जाता आपल्या व्यवसायामागील मूळ प्रेरणेचे विस्मरण होऊ नये म्हणूनच प्रबोध उद्योगाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी व्यवसायाच्या नफ्यातील ठराविक भाग 'स्व'-रूपवर्धिनीस गुरुदक्षिणा म्हणून अर्पण करण्यात येतो. त्यामुळे अज्ञातात झेपावण्याचे सामर्थ्य देणाऱ्या वर्धिनीमुळेच पायाला चिकटलेल्या मातीचे भानही स्वप्न उद्योगला आहे. यात वर्धिनीचे काम व स्वप्न उद्योग यातील समन्वयात्मक चर्चा व विचार मंथन होतच असते.

हे सर्व करतानाही मनातील 'कार्यकर्ता' सदैव जिवंत आणि जागृत राहणे हे आम्ही अत्यंत महत्त्वाचे समजतो. निर्गुण, निराकार अशा राष्ट्ररूपी देवाची आराधना करताना सगुण, साकार अशा साधनांचा उपयोग कधीही हितकारकच ठरतो आणि म्हणूनच व्यवसायातील व्यग्रता असूनही वर्धिनीच्या सर्व कार्यक्रमांकडेच स्वप्नउद्योगची सदैव ओढ असते. जाता येता संपर्क, सुट्टीच्या दिवशी शाखा, कार्यकर्त्यांशी गप्पा, अशा मार्गाने कामात राहण्याचा निरंतर प्रयत्न चालू असतो.

यावेळी भगवंताकडे एकच मागणे-

**'स्वप्न' पाहणारे डोळे आणि साकारणारे हात दे।
आपल्या सुंदर ध्येयाला आपल्या माणसांची साथ दे ।।**

## हर्षाचा सहर्ष उद्योग प्रवास..

काही वर्षापूर्वी एक लुना मंगळवार पेठेत फिरत असायची. या लुनावर मिठाच्या पोत्यांचा भार असायचा. या पोत्यामधले मिठाचे पुडे दुकाना दुकानांमध्ये पोहचायचे आणि ही लुना चालवणारी व्यक्ती एक सुंदर हास्य चेहऱ्यावर घेऊन परिचितांना अभिवादन करत पुढे जायची. हर्षा कोठारी. बऱ्यापैकी उंच, बारीकशी, गोरी दिसायलाही छान. पण आकर्षित करायचं ते तिचं हास्य. शाखेमुळे परीचित असलेली हर्षा म्हणजे सतत उत्साही व्यक्तीमत्व. शाळेतल्या मैत्रिणीमुळे हर्षाला शाखा कळाली आणि पहिल्यापासूनचं आकर्षण असणारा खेळ हा विषय

**ध्वज हा स्वजनांना आशीर्वाद देणारा आणि शत्रूच्या छातीत धडकी भरवणारा असतो.**

शाखेत होतो, हे पाहून हर्षा शाखेकडे वळली नसती तर आश्चर्य. शाखेमध्ये निवडल्या गेल्याचाही आनंद गगनात मावणारा नव्हता. इतकेच नाहीतर हर्षामुळे हर्षाची मोठी बहीण भाग्यश्री वर्धिनीशी जोडली गेली आणि आजोळला एक अविस्मरणीय कार्यकर्ती मिळाली.

शाखेशी जोडला गेलेला इयत्ता ५ वी मधला हर्षाचा संबंध आजही टिकून आहे. जो शाखेसाठी काही करता येत नाही अशी हूरहूर लावत राहतो. पण 'कुरकुर नको, हुरहुर नको । पुढचे पाऊल मागे नको ।।' असंच काहीसं म्हणत हर्षा चालत राहते. हर्षानी आगरकर हायस्कूल मध्ये १० वी पर्यंतचे शिक्षण घेतलं. शाळेतही स्मार्ट असलेली हर्षा. सर्व खेळात सहभागी व्हायची. सर्व कार्यक्रमात अग्रेसर असायची. शाळेतील 'कुलसचिव' हे पद सलग दोन-तीन वर्ष तिच्याकडेच राहिलं. शिक्षकही हर्षाचा उत्साह पाहून कायम Supportive राहिले. शाळेतलं वैयक्तिक अभिनयाचं पारितोषिक पहिल्यांदा हर्षानी मिळवलं. यातच करिअर कर असा शिक्षकांनी प्रेमाचा सल्लाही दिला होता. पण पुढे तिनं १२ वी कॉमर्स दादावाला महाविद्यालयातून केलं. त्या दरम्यान एका अपघातात अचानकच वडिलांचं निधन झालं. दोन मोठ्या पण विवाहीत बहिणी, एक लहान भाऊ आणि आई असं हर्षाचं कुटुंब बनलं. वडिल गेले त्या दिवशी आता सगळी जबाबदारी आहे याची जाणीव झाली आणि माझ्यात खूप बदल झाला.' हर्षा सांगते तसं पाहिलं तर दोन मोठ्या बहिणी, आई यांच्या उपस्थितीत वाढलेली, शिवाय वडिलांची लाडकी असलेली हर्षा. तिच्यावर पूर्वी जबाबदारी काहीच नव्हती. त्यामुळे बहिणीं नाही वडिल गेल्यानंतर छोटासा का होईना, मिठाचा व्यवसाय हर्षा सांभाळू शकेल याबाबत शंका होती. पण हर्षानी दीड वर्ष घर, व्यवसाय दोन्हीही उत्तम सांभाळून दाखवलं. वयाच्या १५-१६ व्या वर्षातच घराचं कर्तेपण तिनं पेललं. वडिलांमागे व्यवसाय एकटीने थोडीफार भावाची मदत असा समर्थपणे सांभाळण्याची उर्मी, ताकद तिला तिने निवडलेल्या साथीदाराकडून नकळत मिळत गेली असावी.

तसं पाहिलं तर खूप लहान वयात तिने तिचा आयुष्याचा जोडीदार निवडला. 'इतक्या लहान वयात, लवकर लग्न वैगेरे काय करताय' म्हणून मैत्रिणींवर चिडणाऱ्या हर्षावर १२ वी पूर्ण झाल्यावर लग्न करण्याची वेळ आली. लग्न करून एक मोठी जबाबदारी आपल्याला घ्यायची आहे किंबहुना ती जबाबदारी घेण्यासाठीच हर्षा कोठारी, हर्षा रूपेश जैन झाली.

*With Best Compliments From*

**SHIVANI ENTERPRISES**

***RELIABLE NAME IN CAR RENTAL SERVICES***

Contact
**Mahesh Konde : 09822284216**

**OFFICE : 201, SOMWAR PETH, DARUWALAPOOL, PUNE - 411 011.**

**ध्वजा ही समर्पणाची अधिकारी असते आणि एकत्वाला आवाहन करणारीही असते.**

आपला जोडीदारही हर्षाने आपल्याहून अधिक कष्टात राहिलेला, इंदौरवरून पुण्यात येऊन स्वत:चा व्यवसाय उभा केलेला असा कर्तृत्ववानच निवडला होता. आजही हर्षा आपल्या पतीचा उल्लेख खूप आदराने आणि अभिमानाने करते. लग्नानंतरही भाऊ व्यवसायात स्थिरस्थावर होईपर्यंत घरचा मिठाला व्यवसाय हर्षानीच सांभाळला. त्यानंतर भावावर जबाबदारी सोपवून तिने पतीच्या व्यवसायात हातभार लावण्यास सुरुवात केली. व्यवसायांची गणिते (जमाखर्च/हिशोब) हर्षा बघू लागली. फूड प्रॉडक्ट्सचा व्यवसाय वाढवताना छोट्याशा घरातच कारखाना बनवला. पदार्थ बनवण्यापासून, पॅकिंग आणि विक्री असा सर्व कारभार दोघं मिळून करू लागले. दरम्यान लहानग्या पलाशही लुडबूड सांभाळत शून्यात गेलेला व्यवसाय वाढवत नेला.

आता पतीच्या व्यवसायातून थोडा ब्रेक घेऊन मुलांना वेळ द्यायचं ठरवलंय. 'पलाश आणि रिद्धी मोठे होतायंत, त्यांना आणि त्यांच्या पप्पांनाही हर्षा 'आई'च्या भूमिकेत हवीये.' त्यांची तीही गरज हर्षा आनंदाने स्विकारते.

वेळ मिळाला, शिबिरं असली की हर्षा मुलांसह वर्धिनीत, शाखेत पोहोचते. मुलांना आपण शाखेत घेतलेले संस्कार देऊ पाहते. शाखेतल्या मुलींसाठीही काहीतरी करण्याची तगमग असतेच. पुढच्या काळात स्वत:चा स्वतंत्र महिला उद्योग काढण्याचा तिचा मानस आहे. करिअरच्या दृष्टीने पुढे गेलेल्या मैत्रिणी पाहून अर्धवट सुटलेल्या शाखेतल्या, शाळेतल्या मैत्रिणी, नात्यातल्या सर्व बहिणी या सर्वांना आवडणारी हर्षा, त्यांच्यामधली हर्षा जेव्हा परिस्थितीनुसार वळण घेऊन अलिप्त वाटते, तेव्हा या सर्वांशी जोडून ठेवणारा एक तरी धागा ती धरून ठेवायला विसरत नाही. वर्धिनीची ही कार्यकर्ती भावी लघुउद्योजकांना हवे ते सहकार्य, मार्गदर्शन करायला सदैव सविनय सज्ज आहे.

## ताराची तारेवरची कसरत

पाच मुलींची आई 'तारा'. राहणार पानशेत. कामात चपळ, कोठून तरी समजले म्हणून 'स्वरूपवर्धिनीत' सहाय्यक परिचारिका अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आली. शिक्षण जेमतेम ९ वी पर्यंत झालेले. घरच्या परिस्थितीमुळे लवकर लग्न झाले. पती रोजंदारीवर मिळेल तेथे काम करणारा. पदरी ५ मुली. यापैकी मोठी सातवीत, पुढील मुली पाचवी, तिसरी, पहिलीत तर सर्वांत छोटी तान्ही.

तारा मुलींच्या शिक्षणाबद्दल जागरूक झाली खरी पण घराच्या हलाखीच्या परिस्थितीत काही सुधारणा नव्हती. तरी तिने मुलींना महानगरपालिकेच्या शाळेत घातले. शाळेबरोबर मुलींच्या गरजाही वाढू लागल्या. आपणही नवऱ्याला, आपल्या संसाराला हातभार लावला पाहिजे, हे ताराला कळून चुकले; पण काम काही मिळेना व नोकरीसाठी तिचे शिक्षण पुरे पडेना. मग ती 'स्व'-रूपवर्धिनी संस्था शोधत आली. सहाय्यक परिचारिका अभ्यासक्रमास प्रवेश घेतला.

ताराचा वर्ग सुरू झाला. तिचे अक्षर सुंदर होते. ती मुळातच बोलण्या-वागण्यात छान; मनमिळाऊ स्वभावामुळे ती वर्गप्रतिनिधी झाली. सर्वांच्या तोंडी ताराताई नाव येऊ लागले. तारा कोणत्याही कामात मागे नव्हती. पुढे होऊन जबाबदारीने सर्व गोष्टी पूर्ण करत होती. प्रॅक्टिकल संपत आले. न्युट्रिशन लॅबचा दिवस येऊन ठेपला. ताराने मुलींच्या मदतीने शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे लॅबची सर्व तयारी चोख केली. मुलींचे गट पाडून कोणत्या मुलींनी काय करायचे हे ताराने समजावून सांगितले. पुन्हा पुन्हा

**आक्रमण करताना किंवा बचाव करताना ध्वजाच्याच बलिवेदीवर माणसे आपले बलिदान हसत हसत करतात.**

लॅबची सर्व तयारी बघून दुसऱ्या दिवशी लवकर येण्यास सांगून सर्वजणी आपापल्या घरी गेल्या.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे कार्यक्रम सुरू झाला; पण तारा काही कोठे दिसेना. प्रत्येकीला ताराची आठवण येत होती. शिक्षिकांनासुद्धा चुकल्या चुकल्यासारखे वाटत होते. पण तारा काही आली नाही. ताराने हा अभ्यासक्रम पूर्ण करणे किती गरजेचे आहे हे समजत होते. त्यामुळे ताराच्या घरी भेट देणे याशिवाय दुसरा काही पर्याय दिसेना.

वर्ग संपल्यावर ताराच्या वर्गशिक्षिका व पुष्पाताई दोघीजणींनी ताराच्या घरचा रस्ता धरला. पानशेतला गेल्यावर ताराच्या घरचा पत्ता विचारत विचारत त्या निघाल्या. रस्त्याच्या बाजूला असलेल्या दोन टेकड्यांची चढ-उतार केल्यावर पायथ्याला तिचे घर होते. एक तासाच्या पायपिटीनंतर ताराचे घर दिसले. घर कसले छोटी अंधारी झोपडीच. घराच्या एका कोपऱ्यात एक पुरुष सुन्न चेहरा करून बसला होता. सर्व आतल्या खोलीत गेल्या. दिवसासुद्धा अंधार होता. कोणाचेच चेहरे नीटपणे दिसत नव्हते. तिच्या छोट्या मुली भिंतींना चिकटून निमूट बसल्या होत्या. आम्हाला बघितल्यावर ताराने मोठ्याने हंबरडाच फोडला. तिला शांत कसे करावे हे वर्गशिक्षिका व पुष्पाताई कुणालाच कळेना. ''माझी तान्ही गेली हो ताई'' असे म्हणत ती पुन्हा पुन्हा टाहो फोडून रडत होती. अर्ध्या तासाने शांत झाल्यावर तिने सांगितलेली गोष्ट मती सुन्न करणारी होती. ती सांगत होती. त्या दिवशी पहिलीतल्या मुलीची तान्हीला सांभाळण्याची पाळी होती. सर्व मुलींना तान्हीला सांभाळण्यासाठी दिवस ठरवून दिले होते. तरच तारा हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकणार होती. मुलींनाही समजले होते. आईचा अभ्यासक्रम पूर्ण झाला की आईला चांगली नोकरी मिळणार मग आपल्याला चांगले कपडे व रोज पोटभर जेवायला मिळणार म्हणून ताराच्या मुलीसुद्धा समजूतदारपणे वागत होत्या.

त्या दिवशी पहिलीतल्या मुलीची तान्हीला सांभाळण्याची पाळी होती. दुपारी तान्हीला खूप भूक लागली होती म्हणून ती रडत होती. पण त्या छोटीला काही समजेना. ती तान्हीला झोळीत ठेवून झोके देत होती. तान्ही रडून रडून निपचीत पडली. छोटीला वाटले चला तान्ही झोपली मग ती आईची वाट पाहत बसली. आई आल्यावर ''तान्ही झोपली आहे, पण मला खूप भूक लागली आहे. आधी खायला दे'' असे सांगू लागली. तारा पण आपल्या उद्योगाला लागली पण बराच वेळ झाला तरी तान्हीची काही हालचाल नाही म्हणून तारा तिच्या झोळीपाशी गेली व तान्हीला हात लावला तर तिचा हात लाकडासारखा लागला म्हणून तिने तान्हीला बाहेर काढले तर, तान्हीची प्राणज्योत केव्हाच मावळली होती व तिचे अंग ताठले होते.

गरिबीने तान्हीचा बळी घेतला होता.

काय बोलावे समजेना. ताराची समजूत कुणालाच कशी काढावी कळेना. तिचे सांत्वन करून अखेर आम्ही जड पावलांनी निघालो.

पुढे ताराने अभ्यासक्रम पूर्ण केला. पानशेतच्या जवळ असणाऱ्या दवाखान्यात ताराला नोकरी मिळाली. पगार व्यवस्थित मिळू लागल्यामुळे घरची परिस्थिती सुधारली. मुलींचे जीवन मार्गी लागले.

तारा म्हणते, ''ताई, माझी तान्ही गेली हो. पण बाकीच्या मुलींच्यासाठी मला काळजावर दगड ठेवून उभे रहावेच लागले. थांबला तो संपला याप्रमाणे मी जर घरीच थांबले असते तर......?

✻ ✻ ✻

**जन, देश, धर्म यांचे अतूट ऐक्य दर्शवणारा जो ध्वज - ज्याच्यासाठी देशोदेशींचे लोक रक्त सांडतात - तो स्वत:च्या लक्षावधी पूजाऱ्यांच्या हृदयात सदैवपणे चिरकालाच्या सातत्याने आणि सहजपणे तेवत असतो.**

# आठवणी दाटतात

वर्षभरामध्ये वर्धिनीशी संबंधित काही कुटुंबांमध्ये व्यक्तिवियोगाच्या दु:खद घटना घडल्या. या कालावधीत खालील व्यक्तींचे देहावसान झाले.



- ★ जेष्ठ संघ स्वयंसेवक ऋषीतुल्य - नानाजी देशमुख
- ★ जेष्ठ संघ स्वयंसेवक पुणे विद्यापिठाच्या इतिहास विभागाचे निवृत्त विभाग प्रमुख- डॉ. श्रीपती शास्त्री
- ★ ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक - श्री. विंदा करंदीकर
- ★ पुण्याच्या येरवडा भागाचे संघचालक - दादासाहेब बेट्राबेट
- ★ श्री. विनायकराव लिमये
- ★ श्री. बबनराव पेठकर
- ★ श्री. बाळासाहेब तांबे
- ★ श्री. बंडोपंत हळबे
- ★ निवेदिता शाखेतील युवती सौ. संगीता यादव यांच्या मातोश्री - श्रीमती चंद्रभागाबाई बारणे
- ★ भारतीय मजदूर संघाचे प्रांत उपाध्यक्ष - श्री. शरदराव जोशी
- ★ स्वामी दयानंद शाखेतील वर्धक कुमार गौरव कानडे याचे वडील - श्री. राजेंद्र कानडे
- ★ वर्धिनीचे हितचिंतक आणि देणगीदार - डॉ. केवलकृष्ण
- ★ वर्धिनीत सहा.परिचर्या अभ्यासक्रमाची सुरुवात करणाऱ्या-श्रीमती जयवंती कलबाग.
- ★ जेष्ठ शिक्षणतज्ज्ञ व शिक्षणमंत्री- श्री. मधुकरराव चौधरी
- ★ जेष्ठ विचारवंत - डॉ. स. ह. देशपांडे
- ★ जेष्ठ ख्यातनाम कवी - श्री. नारायण सुर्वे
- ★ जेष्ठ पत्रकार व दै. तरूणभारतचे माजी संपादक- श्री. त्र्यं.ल उर्फ बापुराव कुलकर्णी
- ★ स्वामी सुबोधानंद शाखेचे कार्यकर्ते श्री. धीरज तारे यांचे वडील-श्री. माधव तारे
- ★ कु. आरती बाळ यांच्या मातोश्री - श्रीमती ललीता अरुणकुमार बाळ
- ★ सौ. विजयाताई कुलकर्णी यांचे वडील - श्री. गणेश नरहर लेले
- ★ स्वामी अखंडानंद शाखेचे कार्यकर्ते श्री. अद्वैत कुलकर्णी यांचे वडील - श्री. कृष्णराव कुलकर्णी
- ★ मुंबईच्या माडगावकर ट्रस्टचे विश्वस्त श्री. माधवराव पेंडसे यांचे वृद्धापकाळामुळे दु:खद निधन झाले. 'स्व'-रूपवर्धिनीच्या इमारतीचे काम सुरू झाल्याचे समजताच श्री. पेंडसे यांनी माडगावकर ट्रस्टकडून रु. १,५०,०००/- ची देणगी पाठवून वर्धिनीच्या कामाला प्रोस्ताहन दिले होते. हे नाते पुढे आणखीनच दृढ झाले व याच ट्रस्टच्या निधीतून सर्वोत्कृष्ठ वर्धक-वर्धिका पुरस्कार योजना वर्धिनीमध्ये सुरू झाली.
- ★ १३ फेब्रुवारी रोजी पुण्याच्या कोरेगाव पार्क भागात अतिरेक्यांनी केलेल्या बॉम्ब स्फोटामध्ये निरपराध ११ नागरिकांची हत्या झाली तर सुमारे ५० जण गंभीर जखमी झाले आहेत. या भ्याड हल्ल्याला बळी पडलेल्या नागरिकांना वर्धिनीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

**स्वदेशी आंदोलनातून हिंदुस्थानच्या स्वावलंबनाचे, पौरुषाचे निनाद ऐकू येत असतात. त्यात कोणाकडे भीक मागणे नाही अथवा मदतीची याचना नाही.**


## संस्कार गंगेचे भगीरथ... शाहीर विठ्ठल उमप



ज्यांच्या पहाडी आवाजामुळे महाराष्ट्राच्या लोकसंगीताला नवा बहर आला. त्या शाहीर विठ्ठल गंगाराम उमप यांचा आवाज नागपूरच्या दीक्षाभूमीवर २६ नोव्हेंबर २०१० रोजी 'जय भीम' असा शेवटचा नारा देऊन कालवश झाला. गायक, नट, नाटककार, याशिवाय शाहिरी क्षेत्रातही उमप यांनी पदार्पण केले. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताचे खेडोपाडी जाऊन विठ्ठल उमप आपल्या शाहिरीने लोकांना मंत्रमुग्ध करून टाकत. 'जांभूळ' आख्यानाने विठ्ठल उमप यांना लौकिक मिळाला आहे. शाहीर विठ्ठल उमप हे आयुष्यभर भारतीय संस्कृतीच्या लोककलांचा श्वास घेऊन जगत होते. त्यांना ८१ व्यावर्षीही ऐकताना त्यांच्या आवाजात आणि सादरीकरणात कुठेच व कधीही काजळी आल्यासारखे जाणवलेच नाही. त्यांनी भारतीय संस्कृतीतल्या मांगल्याची पूजा करणाऱ्या लोककला-प्रकारांना जसे उर्जित केले होते, तसेच त्यांनी प्रबोधनाची रंगभूमीसुद्धा अत्यंत निष्ठापूर्वक जपली होती. भारूड, गोंधळ असो की जांभूळ आख्यान यातील मनुष्यत्वाचे संस्कार करणारी मूल्ये जशी त्यांनी जोपासली होती तशीच त्यांनी आंबेडकरी जलशांचेही निष्ठापूर्वक जतन केले होते.

✻ ✻ ✻

## वर्धिनीचे आधारवड श्रॉफ सर



वर्धिनीचे संस्थापक अध्यक्ष श्री. पुरूषोत्तम वल्लभदास श्रॉफ यांचे वृद्धापकाळामुळे गुरूवार दि. ११ फेब्रुवारी रोजी दु:खद निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. एक अत्यंत यशस्वी उद्योजक म्हणून त्यांचे नाव उद्योगक्षेत्रात सुप्रसिद्ध होते. उद्योग क्षेत्रातील चमकदार कामगिरीबद्दल त्यांना माजी उपराष्ट्रपती श्री. हिदायतुल्ला यांच्या हस्ते गौरवण्यात आले होते. उद्योगक्षेत्राइतकेच त्यांचे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान फार मोलाचे होते. महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्था, शिक्षण प्रसारक मंडळी, ज्ञानप्रबोधिनी, रामकृष्ण मठ, गोपालकृष्ण मंदिर न्यास, नाथद्वार टेंपल ट्रस्ट अशा अनेक शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक संस्थांच्या कामात ते सक्रीय होते.

अलिकडेच झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांना सन्माननीय पूर्व अध्यक्ष (President Emiritus) हे पद द्यावे असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला होता. 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाला दिशा आणि आकार देण्याच्या कामात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली होती. वर्धिनीच्या कामाचा अधिक विस्तार व्हावा यासाठी त्यांनी त्यांची एक एकर जागा वर्धिनीला दानपत्राने दिली.

**वरील सर्व महनीय व्यक्तींच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!**

✻ ✻ ✻

**लोकमानसापर्यंत जाऊन भिडणारा कलेसारखा दुसरा आवाज नाही.**

# आर्थिक स्थिती आणि भविष्यातील आर्थिक गरज

नुकतेच काही पाहुणे वर्धिनी पहायला आले होते. वर्धिनीचे काम कसे चालते हे त्यांनी समजावून घेतले. काम पाहून त्यांना आनंद तर झाला होताच पण पहिल्या दिवसापासून शासनाची कोणतीही आर्थिक मदत न घेता संस्था टिकली कशी आणि वाढली कशी आणि संस्थेच्या एकूण खर्चापैकी उद्दिष्टांवर खर्च किती होतो हे जाणून घेण्यात त्यांना अधिक रस होता. तसे प्रश्नही त्यांनी विचारले. कुणाकडेही देणगी मागताना कै. किशाभाऊ पटवर्धन सर संबंधित दात्याला हे विश्वासपूर्वक सांगायचे की आपण जी देणगी द्याल, ती रक्कम ज्या कामासाठी आपण देणार आहात त्याच कामासाठी आम्ही खर्च करू. ते पुढे म्हणायचे ''There is no leakage in the tunnel' मिळालेल्या देणगीचा कोठेही अपव्यय होणार नाही व मूळ उद्दिष्टांवरच ती खर्च होईल याबाबत आपण खात्री बाळगावी.'' कै. किशाभाऊंचे हेच वाक्य मी त्या पाहुण्यांना सांगितले. ते हसले पण त्यांचे पूर्ण समाधान झालेले नाही हे माझ्या लक्षात आले म्हणून मी २००१ ते २०१० या दहा वर्षांचा आर्थिक आलेखच त्यांच्यासमोर मांडला. एकूण खर्चापैकी उद्दिष्टांवर व अन्य बाबींवर किती रक्कम खर्च झाली याची आकडेवारी/ टक्केवारी त्यांच्यासमोर मांडली. त्याने मात्र त्यांचे समाधान झाले. या कार्यवृत्ताच्या निमित्ताने या संबंधीचा आलेख खाली देत आहोत. उपलब्ध निधीचा विनियोग उद्दिष्टपूर्तीच्या कामांवरच प्राधान्याने होत राहील याची काळजी संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी कायमच घेतलेली आहे. हे या आलेखावरून लक्षात येईल. २००१ ते २०१० हे दशक जागतिक आर्थिक अस्थितरतेमुळे अडचणीचे होते. त्यामुळे अनेक सामाजिक संस्थांची स्थिती ही दोलायमान झालेली होती. खर्च करण्यातील प्राधान्यक्रम, काटकसरीची कायमच अनुसरलेली प्रणाली व आपल्यासारख्या वर्धिनीच्या हितचिंतकांनी केलेल्या साह्यामुळे याही काळात वर्धिनीचे काम सुरळीत चालू राहिले. वर्धिनीचे कामही वाढते आहे आणि खर्चही वाढतो आहे. हे काम वाढले पाहिजे, विस्तारले पाहिजे अशी आपल्या सर्वांची मनापासून इच्छा आहे हे आम्ही जाणतो. सर्व कार्यकर्ते त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतील. आपणही आजपर्यंत ज्या आपुलकीने या कामाला आर्थिक साह्य केले आहे ते यापुढेही चालू ठेवावे अशी आपल्याला विनंती आहे.

आपले मित्र, आप्तेष्ट यांनाही वर्धिनीला साह्य करण्याची आपण विनंती करावी, अशा सर्वांची ओळख आम्हाला करून द्यावी अशी आपल्याला प्रार्थना आहे. आपण 'स्व'-रूपवर्धिनीला आर्थिक साह्य धना-देशाद्वारे, बँक ट्रान्स्फर अशा वेगवेगळ्या मार्गाने करू शकाल. अशा मदतीचे सहर्ष स्वागत आहे.





**आर्थिक वर्ष २००९-१० : एकूण खर्च**

**करांपोटी झालेला खर्च** रु. ६०७५३.५०/- **(१.८१ %)**

**व्यवस्थापकीय खर्च/घसारा** रु. ३९१५४१.२५/-**(११.६१%)**

**उद्दिष्टांवर झालेला खर्च** रु.२९१८७५८.४५/- **(८६.५८%)**




''स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:'' म्हणून स्वदेशी हवे.

## दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागप्रमुख– श्री. विनोद बिबवे** ✆ : ९८५०८९०८२२ **विद्यार्थी विस्तारक : निलेश धायरकर** ✆ : ९०२९०७४५२१

**भाग १ : भागप्रमुख : श्री. चेतन पैलवान** ✆ : ९८८१२३०३०२

❖ **समर्थ रामकृष्ण शाखा**
२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे – ४११ ०११.
शाखाप्रमुख – **श्री. मंदार पोफळे**
✆ : ९८८११४७३८६३

❖ **स्वामी योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ,
पुणे – ४११ ०३०
शाखाप्रमुख – **श्री. संकेत मांढरे**
✆ : ९९६०२१५१६४

❖ **स्वामी श्रद्धानंद शाखा**
महर्षि आण्णासाहेब शिंदे विद्यालय
घोरपडे पेठ, पुणे – ४११ ०४२
शाखाप्रमुख – **श्री. निखिल नवले**
✆ : ९८९०४१६८१६

❖ **भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ,
पुणे – ४११ ०११
शाखाप्रमुख – **गौरी यद्रे**
✆ : ९३२५६९३०३३
शाखा पालक– **कु. लता टिळेकर**
✆ : ९९२२३८५८२९

**भाग २ : भागप्रमुख : श्री. चेतन महिंद्रकर** ✆ : ९७६७७२५२९४

❖ **स्वामी अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय
बिबवेवाडी, पुणे – ४११ ०३७
शाखाप्रमुख – **श्री. गणेश पवार**
✆ : ९९२१२९७४०२

❖ **स्वामी दयानंद सरस्वती शाखा**
विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर,
पुणे – ४११ ०३७
शाखाप्रमुख – **श्री.कृष्णा पिंगळे**
✆ : ७२७६८०६८०४

❖ **शिवानंद शाखा**
कै. वि. स. खांडेकर शाळा
सहकारनगर, पुणे–४११००९.
शाखाप्रमुख – **श्री. पवन पवार**
✆ : ९५९५१८४८४१

**भाग ३ : भागप्रमुख : श्री. धनंजय डोबे** ✆ : ९७६७७२३३२२

❖ **स्वामी सुबोधानंद शाखा**
पंडित दिनदयाळ उपाध्याय विद्यालय,
एरंडवणे गावठाण, पुणे – ४११ ०५२
शाखाप्रमुख – **श्री. रोहित गावडे**
✆ : ७२७६७८२२४२

❖ **स्वामी ब्रह्मानंद शाखा**
म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द,
पुणे – ४११ ०५१
शाखाप्रमुख – **श्री. गुरुप्रसाद मुळे**
✆ : ९९७००९०६२२

❖ **राजर्षी शाहू शाखा**
सरस्वती विद्यामंदिर,
कमिन्स कॉलेज जवळ, शाहू कॉलनी,
कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२
शाखाप्रमुख – **श्री. अनिकेत मडवळी**
✆ : ८०५५०९७२१७

**भाग ४ : भागप्रमुख : श्री. अमर वाबळे** ✆ : ९९२२०६६८२६

❖ **स्वामी विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय
पांडवनगर,वडारवाडी, पुणे–१६
शाखाप्रमुख – **श्री. विजय धोत्रे**
✆ : ९६०४७१७८१२

❖ **स्वामी अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय
गोखलेनगर, पुणे – ४११ ०१६
शाखाप्रमुख – **श्री. निशिकांत भालेकर**
✆ : ९७६७१२०२३५

❖ **आजोळ (दुपार शाखा)**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे – ४११ ०११
पालक– **सौ. मंजुषाताई कुलकर्णी**
✆ : ९८५०२०८००९
(संपर्क – सोम. ते शनि. दु. २ ते ५
रवि. सकाळी ७.३० ते १०.३०)

❖ **वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक,
पुणे – ४११ ०११
शाखाप्रमुख – **सौ. सुवर्णा शेडगे**
✆ : ९५४५५२१०७३

**शाखा संपर्काच्या वेळा :**
*सोमवार ते शुक्रवार*
सायं. ६ ते ८.३०,
*शनिवार*
दुपारी ४.३० ते ७.३०,
*रविवार*
सकाळी ७.३० ते १०.३०

**स्वदेशी म्हणजे नित्याच्या जीवनात पराक्रमाचे प्रचंड स्फुल्लिंग, अर्थशास्त्र दृष्ट्या स्वत:ला स्वावलंबी करण्याचे शिक्षण.**

## शारदामणि महिला विभाग

महिला विभाग प्रमुख – **श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

‘पाकोळी’ बालवाडी प्रमुख – **सौ. स्वातीताई कारेकर** ✆ : ०२०-२६१२१७०४

बचतगट समन्वयक – **सौ. वासंतीताई कुलकर्णी** ✆ : ९९७०२२७६४९

सह समन्वयक – **सौ. वंदनाताई कुलकर्णी** ✆ : ९८८१०८६२२४

❖❖❖

### उद्योगशिक्षण वर्ग

१) सहाय्यक परिचर्या (पुणे वर्ग १) – **सौ. विजयाताई कुलकर्णी, सौ. लता सत्तूर**
सहाय्यक परिचर्या (पुणे वर्ग २) – **सौ. कुंदा जोशी**
सहाय्यक परिचर्या (माले वर्ग) – **सौ. नंदाताई बेंडखळे, कु. प्रियांका चांदेरे**
सहाय्यक परिचर्या (वेल्हा वर्ग) – **श्रीमती अंजुम सय्यद, कु. स्वाती गायके,**
सहाय्यक परिचर्या (नसरापूर वर्ग)–**सौ. शशीकला वीटेकर**

२) शिवण वर्ग – **सौ. माधुरीताई गुरव, सौ. संगिता पाटील**

३) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग – **सौ. स्वातीताई कारेकर**

४) साक्षरता प्रसार – **श्रीमती सुगंधाताई कबीर**

❖❖❖

## प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका केंद्र**

सौ. मनिषाताई नरडेकर (०२०-२६१२१७०४)

**ग्रंथालय**

श्रीमती नीलाताई कुडलिंगार (०२०-२६१२१७०४)

**फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**

श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

**पुणे मनपा शिक्षण मंडळ आणि स्व-रूपवर्धिनी संयुक्त संचालित अभ्यासिका केंद्र**

शुक्रवार पेठ - श्री. वसंतराव भिडे ✆ : (०२०) २४४७१५०८

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

❖❖❖

**स्वदेशी हा आमचा जीवनमरणाचा संग्राम आहे.**

## असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८
२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
३) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) आजोळ प्रकल्प (दुपारशाखा) : दुपारी २ ते ५
३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र)- प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र - प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
९) बचतगट
१०) अभ्यासिका केंद्र

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळामध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

श्री. यशवंत देव

**कार्यालय विभाग**

सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट,
सौ. सुवर्णा पाठक, श्री. अशोकराव चिपळूणकर
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**कार्यालय**

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

**संपर्क**

सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**स्वदेशी बांधवांबद्दल आपल्याला जे काही प्रेम वाटत असेल त्याचे प्रतीक या स्वदेशी आंदोलनात दिसणार आहे.**

# प्रार्थना





नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।
हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।।१।।



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्सृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।।२।।



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ।।३।।



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।।४।।

''स्वामीजींचे दोन शब्द मंत्रासारखे झालेले आहेत. एक म्हणजे कर्मयोग आणि दुसरा शब्द म्हणजे अखंड भारत !! आमच्या सगळ्या कार्याची प्रेरणा या दोन शब्दांतून आहे.''

With best compliments from
Auto Hangar India Pvt. Ltd.

autohangar
Dealer for Mercedes-Benz Passenger Vehicles
An ISO 9001: 2008 Certified Company

metromotors
Auto Hangar Division

Prabhadevi: Ground Floor, Rajan House, Next to Century Bazaar, Mumbai - 400025.
Tel.: 6612 3800. Fax: 6612 3899
Hughes Rd.: METRO MOTORS AUTO HANGAR DIVISION Motor House, Ground Floor, 66, Mumbai - 400007.
Tel.: 6612 3500. Fax: 6612 3535
Andheri (W): Kotia Nirman, Ground Floor, Off New Link Road, Mumbai - 400053.
Tel.: 6710 6660/1/2/3. Fax: 6710 6664

'SWA'-ROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR / 2007 / 26609 24 / 12 / 2008
Concessional postage under Regd. No. PNCW / M-137 / 2011-2013
DT. of Publication - 25th every month
Dt. of Posting - at Pune R.M.S. on 25th of every month

WITH BEST COMPLIMENTS FROM

IIFL

PRIVATE WEALTH MANAGEMENT

Tel. : 020 25411684, 25411664, 25411563, 25455421
Email : pravin.bhalerao@iiflw.com
Web : www.iiflw.com

हे मासिक ‘स्व’रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग. १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११ येथे प्रसिद्ध केले